

# कशासाठी? पोटासाठी...

नासिक

सिन्नर

मालेगाव

# माणूस

५ मे ७३
५० पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

५ मे १९७३

# माणूस

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा — अंक : अठ्ठेचाळीस

## सप्रेम नमस्कार....

१५ एप्रिल, ७३.

□ श्री. अनिल बर्वे यांचा दि. १४ एप्रिलच्या अंकातील बावडा प्रकरणावरचा लेख वाचला. यापूर्वी बावडा प्रकरण खूप गाजले. डॉ. अनिल अवचट, डॉ. बाबा आढाव यांनी बावडा प्रकरणावर लेखन केले. त्यांच्या लेखनाचा निष्कर्ष एकच, तो हा की बावडा प्रकरणात श्री. शहाजीराव पाटलांचा हात होता. महाराष्ट्रात बहुतेक लोकांचा समज तसाच झालेला आहे.

श्री. बर्वे यांनी एका वेगळ्याच बाजूने प्रकाश टाकला आहे. श्री. शहाजीराव पाटलांना निर्दोष ठरविण्याचा प्रयत्न केलेला आहे. बर्वे यांच्या लेखनाचा एक फायदा झाला. तो असा की, या प्रकारची दुसरी बाजू प्रकाशात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय कार्याचे मूल्यमापन करताना काही दोष दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१. डॉ. आंबेडकरांच्या कार्याचे मूल्यमापन करताना तत्कालीन राजकीय परिस्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे. डॉ. आंबेडकर स्वातंत्र्याच्या चळवळीपासून दूर राहिले. हे सत्य सांगत असताना त्या काळचा इतिहास पाहणे आवश्यक आहे. राजकारणामध्ये यापूर्वीच जातीयवाद शिरला होता. १९०६ साली जन्मलेल्या मुस्लिमलीगने १९१६ साली 'लखनौ करार' केला. 'लखनौ करार' हीच जातीयवादी राजकारणाची पहिली ठिणगी होती. दलित समाजाच्या मानाने मुस्लिम समाज जागृत होता. दलितांची सावली पडली तर पुन्हा स्नान करणारा समाज अस्तित्वात होता. दलित समाज सर्व तऱ्हेने मागासलेला होता. राजकीय, सामाजिक व आर्थिक बाबतीत मागे होता. डॉ. बाबासाहेबांनी माणसासारखे जगण्याचे त्या समाजाला वळण दिले. दलितांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न केला. ज्या समाजाला स्वातंत्र्य काय आणि पारतंत्र्य काय याची मुळी जाणीवच नव्हती, त्यांच्याकडून राष्ट्रीय चळवळीत सामील होण्याची अपेक्षा करणे चूक आहे. डॉ. बाबासाहेबांच्या मागण्या सामाजिक अन्यायामुळे आगतिक बनल्या होत्या.

डॉ. बाबासाहेबांच्या नंतर दलित समाजातून त्यांच्या एवढे समर्थ नेतृत्व उभे राहिले नाही, ही बाब सत्य आहे. पण ही बाबासाहेबांची चूक नव्हे. स्वार्थासाठी सर्वच राजकीय पक्षांची स्थिती शोचनीय झालेली आहे. रिपब्लिकन पक्षाला दोष देण्यात अर्थ नाही.

भास्कर जोशी, कोपरगाव.

# कविसंमेलन

## रंगभवन मुंबई
## दिनांक १९ एप्रिल १९७३
## संध्याकाळी ६.३०

दुष्काळग्रस्तांना मदत करण्याच्या हेतूने भरवलेले हे संमेलन. मराठीतले श्रेष्ठ आणि मुख्य म्हणजे प्रतिष्ठित कवी आणि कवयित्री यांनी हजेरी लावलेली. त्याचबरोबर पांढरपेशा लोक (ज्यांना प्रेमाने 'रसिक' म्हणायचे ते) देखील हजर! त्यातही आणखी काही ठळक गोष्टी जाणवल्या. एक म्हणजे भरपूर तरुण मुलेमुली हजर होती. दुसरे म्हणजे लोक शेवटपर्यंत बसून होते. तिसरे म्हणजे कार्यक्रम चक्क साधा आणि आटोपशीर होता.

पण कवितांचे काय? माझ्या एका तरुण मित्राने मला बाहेर पडता पडताच सांगितले, 'खास काही नाही. निम्मा वेळ बोअरच होत होतो' अशा वेळी संयोजकांनी कवींचा लावलेला चतुर क्रम उपयोगी पडत होता.

चंद्र, सूर्य, तारे, वारे, तो, ती यांच्या ठरीव अंगणात घिरट्या मारणाऱ्या कवितांनी मीही चांगलाच बोअर झालो होतो. कित्येकांनी असल्याच आशयाला थोडीफार कल्हई केलेली जाणवत होती. ज्या कवितेत धग नाही ती याहून किती जिवंत असू शकेल? अशा कवींना आजची तरुण पिढी फार सिरियसली घेत नाही हे त्यांनी लक्षात ठेवावे.

याहून दुसरा प्रवाहही अस्तित्वात आहे. यातले कवी लोक समाजाशी नाते ठेवू इच्छितात—निदान या नात्याची काही जाणीव त्यांना आहे. पण हे नाते कित्येकदा केवळ काव्य जिवंत ठेवण्यासाठी आहे की काय असे वाटू लागते. तो त्यांच्या एकसंध जाणीवेचा भाग नसतो. त्यामुळे सिनिक-पणात कित्येकदा ते वाहून जात. अशा कवींना, ते इतर मध्यमवर्गीयांप्रमाणेच समाजापासून तुटलेले असल्यामुळे समारंभाला साजेशी म्हणजे दुष्काळ, भूक, मानवता, खपाटीला गेलेली पोटे इत्यादी छापाची कविता शोधण्याचे प्रयास करावे लागले असावेत आणि शोधून न मिळाल्यास घाईगडबडीत अशी कविता रचावी लागली असेल. हे सर्व त्यांच्या वाचनात स्पष्ट होत होते. दिलीप चित्र्यांनी आपल्या काव्यवाचनाची सुरुवातच अशी केली, 'माइकची आणि काव्याची पातळी खाली करून...' आणि आपली आणि लोकांची पातळी प्रथमच स्पष्ट केली. उगाच मागाहून कुणी तक्रार करायला नको. त्यानंतर चित्र्यांनी आपल्या खास 'सामाजिक' कविता म्हटल्या. मराठीतले जुने नवकवी पु. शि. रेगे यांनी आपल्या शब्दनादाच्या सामर्थ्याचा आणि सरलतेचा वापर करून एक नवी कविता म्हणून दाखवली. त्यातून त्यांनी काही जोडे हाणले असा तर्क आहे.

तर सांगायचा मुद्दा असा की,

समाजाच्या अस्वस्थतेविषयी आणि विद्रोहाविषयी एक सुप्त सिनिक तिटकारा हे या दुसऱ्या प्रवाहाचे वैशिष्ट्य आहे. 'तुम्ही कितीही काहीही करा, शेवटी तुम्हीच यात फसणार.' हे ठरीव मत आणि त्यासोबत एक निष्क्रियता यातून चाणाक्षाला त्याचे रंग ओळखता येतात. अर्थात् आपण कसे निराश आहोत, हतबल आहोत हेही दाखवण्याचा ते प्रयत्न करतात. पण ते आपल्याला किती समजते हा प्रश्न त्यांनी स्वतःला करावा.

आणि फक्त तिसऱ्या आणि महत्त्वाच्या प्रवाहालाच मराठी साहित्यात काही नवे घडवता येईल. व्यक्ती आणि समाज यांच्यातले गहन नाते स्पष्ट करणारी आणि म्हणून ते मान्य करणारी अशी ही कविता आहे. समाजाच्या नाडीच्या ठोक्यांना जाणणारी आणि सामान्य माणसाच्या खांद्याला खांदा भिडवणारी अशी ही कविता आहे. केवळ रस्त्यावर आल्यावर मगच आपल्याला समाजाबद्दल काही समंजसपणाने लिहिता येईल, दारिद्र्याचा खरा अर्थ कळेल एवढा साधा धडा जरी या लोकांपासून कोणी शिकायला तयार असेल तर मराठी कवितेला नवा तजेला येईल. नाहीतर ती नेहमीइतकीच 'गॅलरीतून केलेली कविता' ठरेल आणि अशा कवितेला फारसे भवितव्य नाही हे सांगायला पाहिजे काय ?

काव्य व्यक्त करण्याच्या पद्धतीवरून कवितांचा ताजेपणा आणि जूनपणा उघड होत होता. केशव मेश्राम, दिलीप चित्रे, नारायण सुर्वे, सतीश काळसेकर यांच्यापैकी काही कवितांत निराशेच्या कित्येक छटा असल्या तरी या कविता नव्या आशांचे सुप्तांकूर बाळगून होत्या. सुर्व्यांच्यासारख्याला, आपण कोणती कविता याप्रसंगी निवडावी हा प्रश्न कधीच पडला नसेल, कारण त्यांची कविता खऱ्या अर्थाने ताजी आहे, सामान्य माणसाची आहे. 'माझ्या देशाच्या नोंदबुकात माझाच अभिप्राय' ही त्यांची कविता म्हणजे या संमेलनाचा मुकुटमणी होय. (असे म्हणताच इतर कवींनी नाराज होऊ नये. फक्त अंतर्मुख व्हावे).

शेवटी डॉ. वि. म. दांडेकर यांच्या मध्यवर्ती दुष्काळ समितीस १०००/– रु. चा पहिला हप्ता दिला गेला. डॉ. दांडेकरांनी एक छोटी कविता म्हटल्यावर हा कार्यक्रम संपला.

हो, शलिल घोष नावाच्या बंगाली पत्रकाराने यात प्रमुख पुढाकार घेऊन हा कार्यक्रम घडवून आणला. याबद्दल तुम्हाला काय वाटते ?

—अशोक राजवाडे

कशासाठी ? पोटासाठी... कशासाठी ? पोटासाठी....

# दि. १७, २२, २३ एप्रिल....मालेगाव, सिन्नर, नासिक

रघुवीर मुळे

## मालेगाव

दिनांक १७ एप्रिल ! मालेगावमार्गे नासिकला येणाऱ्या एस्. टी. च्या गाड्या आलेल्या नव्हत्या. सेंट्रल बस स्टँड आणि दैनिक वृत्तपत्रांच्या कचेऱ्यांकडे चौकशी करणाऱ्यांची रीघ लागलेली. त्यातच मालेगावला 'काहीतरी' गडबड झाल्याचे वृत्त आणि खात्रीलायकरित्या पोलिसांनी सांगितलेले उत्तर (फक्त एव्हढेच की) मालेगावला गोळीबार झाला.

गेल्या वर्षभरापासून एक ना अनेक कारणावरून मालेगाव खदखदत होते. मधुनमधून स्फोटक बनत होते. वृत्तपत्रांच्या रकान्यांना वेधक–खळबळजनक बातम्यांचा पुरवठा करीत होते. संतप्त विद्यार्थ्यांवर लाठीमार, सूत-मोर्चा अडवला, मंत्र्यांच्या गाड्यांना अडथळा ! त्यातच गोळीबाराची बातमी. जातीय दंग्याच्या कुशंकेची पाल मनात चुकचुकली.

समाजवादी पक्षाचे नेते श्री. निहाल अहमद यांनी त्या दिवशी आग्रारोड बंदचा कार्यक्रम हाती घेतला होता. सत्याग्रहींनी आग्रारोडवर ठाण मांडून बसायचे. सरकारी अधिकाऱ्यांकडून शिजलेले अन्न मागायचे आणि ते मिळाले तरच उठायचे. असे का विचारले तर अहमद म्हणाले, रेशनकार्डावर पुरेसे धान्य सरकार देत नाही, उपाशीपोटी माणसे मरू लागली तर तो भूकबळी होत नाही. जोरजोरात घोषणा होतात एकही भूकबळी होऊ देणार नाही' म्हणून तयार अन्न हवे !

सकाळी १० ते १२ हा आग्रारोड बंद कार्यक्रम शांततेने पार पाडण्यात आला. कारण निदर्शक रस्त्यावर बसले की पोलीस ताकदीनं त्यांना व्हॅनमध्ये कोंबून घेऊन जात. अशाप्रकारे सत्याग्रहींची मागणी सरकारपर्यंत पोचली होती. निहाल अहमद यांनी कार्यक्रम बरखास्त केला. आपल्या कामासाठी ते निघून गेले.

हा कार्यक्रम जेथे घडला त्या ठिकाणापासून सुमारे दीड मैलावर धुळ्याच्या रस्त्यावर प्रचंड जमाव जमला. दरेगाव नाका, पिवळा पंप या बहुश: कामगार वस्ती आणि झोपडपट्टी विभागातील जमावाने हिंसक स्वरुप धारण केले. पोलिसांची संख्या कमी

होती. त्यामुळे लाठीमार होऊनही जमाव पांगला नाही. जमावाने वाहतुकीला अडथळा केला. दरेगाव नाके जाळून टाकले. चंदनपुरी पोलीस स्टेशनला आग लावण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. स्वस्त धान्याची आठ दहा दुकाने लुटली. परिस्थिती हाताबाहेर जात आहे असे पाहून पोलिसांनी गोळीबार केला. तिघे ठार झाले. त्यातला एक राजगिऱ्याचे लाडू ५ पैशाला विकणारा १५ वर्षाचा मुलगा होता. लोक अन्नान्न परिस्थितीत असताना लाडू विकण्याच्या गुन्ह्याबद्दल त्याला खासी सजा मिळाली. दोघे सुताअभावी बेकार झालेले विणकर होते. त्यांच्या धान्य पुरवठ्याचा, सुताच्या कोट्याचा प्रश्न तात्काळ संपलाच पण त्याहीपेक्षा देशातील बेकारी दोनने कमी झाली.

माणशी ७ किलो धान्याचे प्रमाण ठरलेले होते पण पुरेसा कोटा नसल्याने ४ किलो प्रमाणेच वाटप व्हावे असे आदेश होते. तेव्हा महिन्यात ४ किलो घोत्रायुक्त मिलो खाऊन जगणाऱ्या माणसांची शक्ती व असाच अन्याय पुढेही चालू देण्याची सहनशक्ती संपुष्टात आली. याचा उद्रेक धान्य दंगलीत झाला. बरे, साडे तीन किलो जे धान्य दिले जाते तेही ४।४ वेळा दुकानात चकरा मारून, रात्ररात्र रांगा लावून. तरी देखील जनतेने चिडू नये? गेल्या पंचवीस वर्षात आचार, उच्चार, विचार, संघटना या मूलभूत हक्कांवर बंधने आली. आता गोळीबारामुळे जनतेचा चीड व्यक्त करण्याचा अधिकारही संपुष्टात येऊ घातला आहे.

जी जी स्वस्त धान्याची दुकाने लुटली गेली, त्या दुकानांच्या आसपास आलिशान थिएटरे आहेत, मोठमोठी दुकाने आहेत, बँकाही आहेत पण प्रचंड जमावाने आपली गरज आणि विवेक सोडला नाही. फक्त धान्य दुकानेच लुटली. याचा अर्थच ती धान्य–दंगल आहे.

**दरेगाव नाका जेव्हा जमावाने उध्वस्त केला तेव्हा तेथील पालिका कर्मचाऱ्याला जमावाने मारहाण केली नाही. एव्हढेच नव्हे तर त्याच्याजवळ असलेल्या साडेसहा हजार रुपयांच्या रकमेपैकी एक पैसाही लुबाडला नाही. निःशस्त्र जनता आणि सशस्त्र शासन यांच्या विवेकबुद्धीतला फरक स्पष्ट करणारा हा जिवंत पुरावा आहे.**

मालेगावचा उद्रेक धान्याबरोबर सुतासाठीही होता. १२ हजार यंत्रमाग या शहरात आहेत. अपुऱ्या सुतामुळे ७ हजार बंद पडले. उरलेले ५ हजार यंत्रमागांच्या नाकी सूत धरले आहे. माजी आमदार व समाजवादी पक्षाचे नेते श्री. अहमद म्हणतात, 'जर एखाद्या वस्तुचा पुरवठा नीटपणे सरकारला करता येत नाही तर नियंत्रण आणून हजारो लोकांना बेकार करून उपासमारीची पाळी त्यांच्यावर आणण्याचा सरकारला कोणता अधिकार आहे? मालेगावची सुताची मागणी २० हजार गाठींची आहेत, दिल्यात फक्त २००! ना. चट्टोपाध्याय सुतावर नियंत्रण घातल्याची घोषणा करून मोकळे झाले. खासदारांनी त्याबाबतचे धोरण काय आहे याची विचारणा केली. नामदार म्हणाले, धोरण लवकरच जाहीर होईल. याचा अर्थ धोरण न ठरताच नियंत्रण?

आणि नामदारमहाशय परदेशवारीसाठी गेले देखील ! ज्या राज्यातून आपल्याला सूत मिळते ती राज्येच वीजकपातीने हातघाईस आलेली आहेत; तेव्हा सरकारने सूत पुरवठ्याबाबत कितीही आश्वासने दिली तरी ती पूर्ण होत नाहीत. सरकारपक्षाचे खासदार श्री. अण्णासाहेब कवडे म्हणाले, 'श्रीमती इंदिरा गांधी यांच्याशी मी सूतपुरवठ्याच्या प्रश्नाबाबत बोललो. सुतावर जे शंभर टक्के नियंत्रण आणण्यात आले आहे ते सदोष असल्याची कल्पना मी त्यांना दिली. एक ते चाळीस (नंबर) काऊंट सुताचे उत्पादन महाराष्ट्रात विपूल होते. तेव्हा त्यावर नियंत्रण कशासाठी ? विपुल उत्पादनावर देखील नियंत्रण आणले आहे तेही गडप झाले. १ ते ४० काऊंटवरचे नियंत्रण तातडीने शिथिल व्हावे !'

सूत–व धान्याच्या अपुऱ्या पुरवठ्याबाबतचा हा लाक्षणिक असंतोष जनतेने व्यक्त केला. आपल्या मागण्यांसाठी जनता रस्त्यावर आली. 'Streets are the only sacred thing' हे ओळखून ! पण आमचे (मालेगावचे) लोकप्रतिनिधी कुठेत ? श्रीमती आयेशा बेगम एम्. एल्. ए. आहेत. परभणीचे आमदार श्री. महंमद इकबाल यांच्याशी त्यांचा विवाह ८।९ महिन्यापूर्वी झाला, त्या हनीमूनसाठी गेल्या त्या परत मतदारसंघात परतल्याच नाहीत. मध्यंतरी विधानसभेच्या अधिवेशनाच्यावेळी 'तुम्ही मालेगावी का येत नाही ?' असे एका कार्यकर्त्याने विचारले तेव्हा 'मतदारसंघातले प्रश्न मी येथेच सोडविते' हे त्यांचे उत्तर !

एखाद्याला एकवेळ फसविता येते, अनेकांना अनेकवेळा फसविता येते पण सर्वांना सर्वकाळ /फसविता येत नाही म्हणतात ! कालमानाप्रमाणे जागतिक सत्यही असत्य भासू लागते. १ लाख मतदारांना ५ वर्षे फसविण्यास आमदार (आणि त्याही महिला) यशस्वी होत आहेत, असे दिसते. इंदिराराज झिंदाबाद.

दरेगाव नाक्याजवळ घडलेल्या प्रकाराचा व निहाल अहंमद यांनी आयोजिलेल्या सत्याग्रहाचा संबंध नाही ! सरकारी अधिकाऱ्यांनी मान्य केले की जमावाला शांत करण्याचे अहंमद यांनी प्रामाणिक प्रयत्नही केले पण मालेगावचे दुसरे आमदार डॉ. बळीराम हिरे यांनी ठोकून दिले 'दंगल पूर्व नियोजित होती.'

निहाल अहंमद 'हीरो' बनेल या भीतिपोटी ते बोलले पण यातले वेगळे अर्थ हिरे यांनी समजावून घेतलेत काय ? दंगल पूर्व नियोजित होती हे जर त्यांना ठावे होते तर गैरप्रकार घडू नये म्हणून त्यांनी काय काळजी घेतली हे त्यांनी सांगितले नाही. एव्हढेच नव्हे तर स्वपक्षीय सरकारने 'लॉ अँड ऑर्डर' ची जबाबदारी ज्यांच्यावर टाकली त्या पोलिसांची 'इंटेलिजन्स ब्रँच' निकामी आहे असाच हिऱ्यांचा आरोप आहे. मुळात तसे काही नाही. 'डॉक्टर' आमदारांना समस्यांचे नीट 'डायग्नोसिस' झालेले नाही ही वस्तुस्थिती आहे. ●

# सिन्नर

दिनांक २२ एप्रिल ! रविवार !!

महाराष्ट्रांतले सर्वात मोठे विडी उत्पादक केंद्र. बाजारचा दिवस. 'बंद' आवाहनाने अक्षरशः बंद. हा आदेश काँग्रेससह सर्वपक्षीयांनी दिलेला होता. पण नंतरच्या भीषण प्रकारामुळे जबाबदारी टाळणाऱ्या काँग्रेसपक्षाने आता बंद प्रकाराशी आमचा संबंध नाही म्हणून हात झटकले आहेत.

मी गेलो तेव्हा नुकताच गोळीबार झाला होता. मोर्चा प्रचंड होता. जमाव हिंसक होता. पोलीसबळ कमी होते. स्वसंरक्षणार्थ गोळीबार करावा लागला असे अधिकाऱ्यांनी सांगितले. बंद व मोर्चाचा कार्यक्रम जेव्हा जाहीर झाला तेव्हा गावात बंदोबस्त नव्हता. होता फक्त तहसिलीवर. मोर्चात वीस हजार लोक सामील झाले होते. गेल्या १०० वर्षांपासून सातत्याने या तालुक्यात दुष्काळ आहे. समस्या अनेक आहेत. शासन सोडविण्यास असमर्थ ठरले म्हणून मोर्चा प्रचंड. जेव्हढे अन्याय मोठे तेव्हढे मोर्चे मोठे हे मापक आता ठरूनच गेले आहे. मोर्चा अपुऱ्या धान्याचा पुरवठा पद्धतशीर व पुरेसा व्हावा यासाठी होता.

सुरक्षिततेचे उपाय म्हणून गुंडप्रवृत्तीच्या व समाज विघातकांना पोलीसांनी अडकवून ठेवलेले नव्हते. दगडफेकीला कोणी सुरुवात केली असेल ते उघडपणे कळते. तुफान दगडफेक व मोर्चाचे हिंसक स्वरूप म्हणून आत्मरक्षणार्थ गोळीबार केला असा सरकारी खुलासा.

कार्यकर्ते म्हणतात, गोळीबाराचा इशारा दिलेला नव्हता. अश्रुधुराचा वापर हाच मुळात गोळीबाराचा इशारा मानला जावा. अधिकारी व पोलीस यांच्यावर दगडफेक करून धान्याचा पुरवठा होणार नाही याची मोर्चेवाल्यांना जाणीव होती. पण जाणीवपूर्वक मोर्चाला हिंसक वळण लावणारा एक गट त्यात होता हे निश्चित. हा गट बाजूला राहिला आणि खऱ्या 'पोट' तिडिकेने पुढे असलेली बालके व म्हातारी माणसे मारली गेली. मालेगावात तीन सिन्नरमध्ये सहा—एकदम भूकबळी !!

सरकारी अधिकाऱ्यांनी जर वेळीच दखल घेतली नाही तर मालेगावची पुनरावृत्ती घडेल असा इशारा मोर्चाचे संयोजक श्री. सूर्यभान गडाख यांनी दिला होता. राजकारणात आपल्याला बदनाम करण्याची संधी काही लोक घेत आहेत व निनावी, प्रेसलाईन नसलेली पत्रके छापून लोकांना भडकावण्याचे उद्योग काही छुपे पुढारी करीत आहेत. याचा बंदोबस्त व्हावा अशी फिर्यादही त्यांनी नोंदविली होती पण पोलीस थंड राहिले.

गोळीबार झाला. दोघे तात्काळ ठार झाले. त्यांच्या तंगड्या धरून त्यांना फरफटत पोलिसांनी नेले. ही घटनाच मुळात चीड आणणारी नाही काय ? मरणांतानी वैराणी या उक्तीप्रमाणे आपली संस्कृती वैऱ्याच्या मृत्युनंतर वैर न जपणारी आहे. पोलीस तर जनतेचे मित्र ! मित्र—मित्राचे प्रेत मग फरफटत नेईल काय ?

सिन्नर तालुक्यावरील अन्यायाचे परिमार्जन होत नसल्याने सत्ताधारी काँग्रेसविरोधी वातावरण येथे प्रथमपासून आहे. जवळजवळ तीन वेळा काँग्रेस आमदार निवडले पण परिस्थितीत बदल झालेला नाही. गोळीबार होऊन गेल्यावरही जमाव चिडलेलाच

होता. पण एकाही काँग्रेसवाल्याची हिम्मत पुढे होण्याची झाली नाही. विरोधी पक्ष नेत्यांनीच जमाव शांत केला. त्यात शेकाप आमदार विठ्ठल हांडे, भाक्रांद आमदार मूळचंद गोठी, आ. ए. टी. पवार, खा. धैर्यशीलराव पवार यांचा समावेश आहे. काँग्रेस आमदार रामकृष्ण नाईक नासिकला डाक बंगल्यात 'डी आयजी'शी संपर्क साधून होते. काँग्रेसचे सरचिटणीस, जि. प. सदस्य सुदाम सांगळे उपाध्यक्षपदाच्या वाटाघाटी 'ऑन बिहाफ' करीत होते. तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. विष्णूशेठ वंजारी जातीने घरी थांबून 'सीएम्'ला परिस्थिती आटोक्यात आल्याचे आश्वासित होते.

## आंदोलन एकीकडे तर विध्वंसन दुसरीकडे

मालेगावला जो प्रकार तोच सिन्नरला.आंदोलन एकीकडे तर विध्वंसन दुसरीकडे. जमावाचे एका गटाने कोर्टाची इमारत जाळून टाकली. तहसिल गावाबाहेर आहे! कोर्ट गावात. हा प्रकार मात्र जाणून बुजून केलेला असावा. अन्नासाठी झगडणारे लोक आंधळ्या न्यायदेवतेच्या निऱ्यांना हात घालणार नाहीत. हा प्रकार पुढेमागे हातकड्यांचे मानकरी ठरणाऱ्यांनीच केला असावा यात शंका नाही.

अखेरी हे सर्व घडले ते पोटासाठी! स्वातंत्र्याच्या पंचविसाव्या वर्षी जनता आपल्या हक्कासाठी जागृत झाली आहे. अक्कलदाढ फुटलेली पिढी आता टाचा घासून मरणार नाही. आपला वाटा मागून घेईल. त्यासाठी मग ती वाटेल तो मार्ग पत्करील याची दखल घेण्यासाठीच तर हे दोन प्रकार घडलेत! ●

## नासिक

महागाई विरोधी कृतीसमितीने २३ एप्रिलला नासिक बंदचा आदेश दिला होता. जनसंघ-कम्युनिस्टांच्या विचित्र शय्या सोबतीतून निर्माण झालेले हे अपत्य! प्रसंग पाहून केकाटते. जनसंघाची शहारातली ताकद फार मोठी अन् विधायक आहे. कम्युनिस्ट व समाजवादी आता उरले नावापुरते. मालेगाव सिन्नरच्या धसक्यानेच सर्व व्यवहार बंद झाले होते. समितीने एक मोर्चा काढला. हिंसक बनला तेव्हा नुसती विसर्जनाची आरोळी दिली गेली. नेते घरोघर गेले, अनुयायांनी दगडफेक करून शहर कावीज केले. कम्युनिस्ट पुढाऱ्यांनी आधीच भडक भाषणे करून लोकांची माथी भडकाहोती. निष्पाप नागरिक, छोटे धंदेवाले, प्रामाणिक, सेवाभावी डॉक्टर दगडफेकीत होरपळले. याचे पाप एका राष्ट्रवादी पक्षाच्या वाटेला आले. यातून बरेचसे त्यांना शिकता येण्यासारखे आहे. दुसऱ्या दिवशी तर अफवांचा सुळसुळाटच होता. अफवा पसरली की तीन-चार तास वातावरण तंग होई. एस्. टी. वाहतूक विस्कळित झाली. सुमारे ५-७ लाखाचे खाजगी व्यापाऱ्यांचे नुकसान झाले. झाले ते वाईटच. सर्वात वाईट म्हणजे जनसंघ निष्कारण बदनाम झाला. पुढच्या आंदोलनात तरी यश-अपयशाची पर्वा न करता 'एकाला चलो रे!' दुसरे काय सांगणार!!

● ● ●

# दुष्काळकथा

# एक, दोन तीन...

## :१ :

केज तालुक्यातील शंभर-दीडशे घराचे गाव. नाव साळेगाव. जवळ जवळ पूर्ण गाव शेती मजुरांचे. तालुक्यात १५०० विहिरींचे काम चालू. साळेगावला एकूण १५ विहिरींचे काम चालू आहे. सुरुवातीपासून गावात राजकीय दोन गट. त्यामुळे या विहिरीत विभाजन होऊन सरपंच श्री. विठ्ठलराव पाटील (आमदार आडसकर गट) यांच्या गटाला अकरा विहिरी व दुसऱ्या गटाला चार विहिरी असे काम जवळ जवळ एकदमच चालू झाले.

विठ्ठलराव सरपंच असल्यामुळे कामाची (सर्व विहिरीवरील) देखरेख व पेमेंट त्यांच्याकडेच होते. या संधीचा फायदा त्यांनी राजकीय हेतूने करून घेतला. कारण...

सर्व विहिरींच्या वरील कामाचा पगार ते पंचायत केजमधून प्रत्येक आठवड्याला उचलून आणीत, परंतु प्रत्यक्ष वाटप मात्र त्यांच्या गटाला मिळालेल्या अकरा विहिरीवर काम करणाऱ्या मजुरांना प्रत्येक आठवड्याला वेळेवर करीत परंतु ..

दुसऱ्या गटाच्या चार विहिरीवरील सर्वच मजुरांना मात्र चोवीस दिवस पगार दिला गेला नाही. पंचायत ऑफिसमधून मात्र त्या चार विहिरीवरील झालेल्या कामाचा पगार त्यांनी प्रत्येक आठवड्याला न चुकता आणला. पण २४ दिवसापर्यंत मजुराच्या हातावर पैसाही नाही.

याच भागातील जनतेचे कैवारी आणि गरीब मजुरांचे मित्र असे स्वतःला म्हणवून घेणारे आमदार बाबुराव अडसकर यांच्याकडे या विहिरीवर काम करणारे मजूर पगार मिळावा म्हणून गेले. परंतु त्यांनीही आपल्या कानावर हात ठेवून सांगितले की, मी काहीच करू शकत नाही. तुम्ही कलेक्टरकडे जा.

हताश होऊन लोकांनी तहसिलदार केज व कलेक्टरसाहेब बीड यांना लेखी अर्ज केला त्यामुळे स्वतः कलेक्टरसाहेब साळेगावला आले चौकशी केली. कलेक्टर समोर सरपंचांनी मजुरांना, "मी थोड्या वेळात पगार वाटप करतो' असे सांगितले त्यांचे आश्वासन ऐकून कलेक्टरसाहेब दुसरीकडे दुष्काळी कामाच्या दौऱ्यावर आले तसे गेले.

साहेबांची जीप दृष्टीआड होताच विठ्ठलरावांची नियत फिरली. आतातर मी तुम्हाला पैसाही देत नाही. काय करायचे असेल ते करून घ्या या शब्दात त्यांनी मजुरांना दम भरला.

मजूर बिचारे ! काय करणार ?

पोटासाठी काम केलेले. त्यांना फक्त

घामाचा पैसा हवा होता.

आणखी एकदा जनतेचे कैवारी श्री. अडसर यांना सांगावे म्हणून दि. १३।४।७३ ला काही मजूर पोटात पोटभर अन्न नसताना गेले. केजच्या स्टँडवरच त्यांची व विठ्ठलराव पाटलांची भेट झाली. पाटलांची व मजुरांची तिथे थोडिशी कुरबुर झाली. पोटतिडकीची मजुराची भाषा त्यांना अवघड लागली. मी गावात आल्यावर एकएकाला पाहून घेईन असा त्यांनी मजुरांना दम भरला.

१४ तारखेला संध्याकाळी गावातली राजकीय टोळी या मजुरांच्या घरासमोरून चार चमचे बरोबर घेऊन फिरू लागली.

दि. १५ तारखेस सकाळी सैयद नूर इमामसाहेब या मजुराच्या घरी काही लोक गुंड बरोबर घेऊन गेले व केजला पैसे का मागितलेस म्हणून त्याला त्यांनी मारहाण चालू केली.

ही वार्ता क्षणात या चार विहिरीवरील सर्व मजुरांना समजली. लोक जमू लागले. आता प्रकरण चिघळू पहात होते. नुरला मार लागला होता. मजूर इकडे येऊ नयेत म्हणून त्यांच्यावर दगडफेक चालू झाली. पोटतिडकीने पेटलेला मजूर पण या अनपेक्षित हल्ल्याने बेभान झाला.

काम करून पैसा तर नाहीच उलट अशी गुंडगिरी. त्यांच्यानेही हे सहन झाले नाही, त्यांनी प्रतीहल्ला केला. दगड, गोटा हाती पडेल ते उचलले की फेकले. एकमेकावर दगडगोटयांचा वर्षाव चालू झाला.

आणि पोटतिडकीने पेटून उठलेल्या या वणव्यात कोणाचा तरी दगडाचा मारा लागून श्री. गंगाराम येळवे हा जागीच ठार झाला. झाले. सर्व वादळ दोन्हीकडील १६ लोकांना जखमी करून शमले. त्यामध्ये श्री. नूर याची आजी वय वर्षे ७० हिलापण हातावर दगडाचा मार लागला.

अखेर खुनाचा गुन्हा पोलीस स्टेशन केजला दाखल झाला व एकूण १६ लोकांना अटक झाली.

आज दि. २४।४।७३ पर्यंत या चारीही विहिरीवरील मजुरांना पगार नाहीच उलट त्यांच्या घरातील कर्ती माणसे सध्या अटकेतच आहेत. त्यामुळे घरातील आयाबहिणींची व लहान चिमुरडया मुलांची अन्न अन्न दशा चालू आहे.

लातूर येथे झालेल्या फोरमच्या सभेत श्री. बाबुराव आडसकर यांनी आपल्या मिशीवर हात फिरवून सांगितले की, ' गरीब मजुरांच्या जवळ कसे जावे हे सर्वांपेक्षा मला जास्त चांगल्या प्रकारे माहीत आहे, त्यामुळे मी बापूसाहेब काळदातेंसारख्या माणसाचा पराभव करू शकलो. आताच पहा— माझ्या तालुक्यात एकूण १५०० विहिरींचे काम चालू आहे. '

बाबुरावजी ! किती दुष्काळी कामे चालू आहेत याला महत्त्व नाही, महत्त्व आहे ती कशी चालतात याला. जर प्रत्येक गावात तुम्ही असा राजकीय खेळ मजुरांच्या जीवनाशी खेळणार असाल तर हीच जनता, जिने तुम्हाला

एवढे मानाचे स्थान दिले, तीच जनता तुम्हाला केव्हा, कुठे व कसे बसवील याचा विचार करा!

गरीब जनतेच्या जीवनाशी असा राजकीय खेळ खेळला जाऊ नये. नसता वाळून पाचोळ्यासारखी झालेली ही माणसे केव्हा व कसा पेट घेतील याची कल्पनाच करू नका. मग त्यांना शांत करणे, आवरणे हे काम निवडणुकीतील आश्वासनाएवढे सोपे नाही.

पी. एम्. जोगदंड
(केज. जि. बीड)

## : २ :

ठाणे जिल्ह्यातील न्याहाळे–केळघर–नांदगाव व कोलारे–झाप या जव्हार मोखाडे तालुक्याच्या भागात दोन रस्त्यांवर दुष्काळी कामे म्हणून खडी केंद्र सुरू करण्यात आली होती. या केंद्रावर २६० आदिवासी मजुर काम करीत होते. ठाणे जिल्ह्यातील हा भाग अतिशय मागासलेला व दळणवळणाचे दृष्टीने अतिशय बिकट. अशा या भागात नांदगाव गावच्या सरपंचाचेच राज्य. तो करील तो कायदा. या सर्व आदिवासी मजुरांना शासनातर्फे मंजूर झालेल्या खडी केंद्रावर स्वतः कंत्राटदार म्हणून याने कामावर लावले, उपाशी पोटी व अर्धपोटी राहणाऱ्या आदिवासींना काम मिळाले म्हणून हायसे वाटले व ते सरपंचाला दुवा देऊ लागले.

या २६० आदिवासी मजुरांची दररोजची हजरी लावली जात होती व त्यांचे सरकारने दुष्काळी मजुरांना ठरवून दिलेल्या दराने (पुरुषांना २॥ रुपये व स्त्रीयांना २ रुपये) मजुरीचे पगारपत्रक तयार होत होते. दर आठवड्याला या पगारपत्रकांवर आंगठे घेतले जात होते. पगार मात्र या मजुरांना न देता पगार देणारा इसम, ओव्हरसिअर व सरपंच यांच्या संगनमताने हा पैसा दर आठवड्याला नांदगाव ग्रामपंचायतीच्या सरपंचाच्या एका हस्तकाकडे दिला जात असे. या आदिवासी मजुरांना मात्र आठवड्याला ५ रुपयाचे पीठ व काही रक्कम खर्ची म्हणून दिली जात असे. या प्रकरणी श्री. यशवंत गोडे यांनी पंचायत समितीकडे लेखी तक्रार करून या अन्यायाला वाचा फोडली. या प्रकरणी बरीच ओरड झाली. त्यामुळे जिल्हा परिषदेने एका खास अधिकाऱ्याची या प्रकरणी चौकशी करण्यासाठी नेमणूक केली. ही चौकशी सुरू झाली व या चौकशी अधिकाऱ्याकडे श्री. दामू देऊवड या आदिवासीने आपल्यावरील अन्यायाबद्दल माहिती देऊन जबाब दिला म्हणून सरपंच व त्याच्या हस्तकांनी त्याला बेदम मारहाण केली व आता त्याची झोपडी जाळून त्याला बेघर करण्यात आल्याची माहिती नुकतीच हाती आली आहे. या कामी चौकशी करण्यासाठी आमदार दत्ता ताम्हणे हे तातडीने रवाना झाले आहेत. या २६० आदिवासी मजुरांनी १६ आठवडे काम करून चार हजार ब्रासपेक्षा अधिक खडी फोडलेली

आहे. सरकारी दराप्रमाणे (१५ रुपये ब्रास) आज सुमारे ६० हजार रुपये मजुरीचे या आदिवासींनी काम केले आहे. त्यांना फक्त खर्चापोटी देण्यात आलेली रक्कम यापेक्षा अधिक काही मिळालेले नाही.

खेड्यापाड्यांतून सत्ताधारी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून दुष्काळी मजुरांची होणारी ही लूटमार भयानक आहे. नांदगाव ग्रामपंचायतीचे सरपंच हे सत्तारूढ काँग्रेस पक्षाचे आहेत व ते फार वजनदार असल्याचे बोलले जाते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर खेड्यातील आदिवासी गरीब मजुरांची धनदांडग्यांकडून व सत्तेवर असलेल्या काही लोकांकडून गेल्या २५ वर्षांमध्ये अनेक प्रकारे पिळवणूक होत आहे. जिथे जागृत व समर्थ समाजसेवक असतात त्याभागातील अन्यायाला वाचा फुटते या धनदांडग्यांकडून या आदिवासींना संरक्षण मिळणे आवश्यक आहे. आज ठिकठिकाणी चालू असलेल्या दुष्काळी कामांवरील मजुरांची फसवणूक होणार नाही या कडेही अधिकाऱ्यांनी लक्ष देणे जरूरीचे आहे. □

## : ३ :

ठाणे जिल्ह्यातील सफाळा या गावी (ता. पालघर) एक पाणी योजना जिल्हा परिषदेतर्फे राबवली जात असून सुरुवातीला जरी या योजनेचा खर्च दोन लाखांचा धरलेला असला तरी ही पाणी योजना पूर्ण होण्यासाठी आता सुमारे चार लाखांपेक्षा अधिक खर्च येईल असा तज्ज्ञ मंडळींचा अंदाज आहे.

कंत्राटदार व बड्या भांडवलदारांकडून आदिवासी, गरीब, श्रमजीवी मजुरांची आर्थिक पिळवणूक थांबविण्यासाठी ठाणे जिल्ह्यात ४–५ मजूर सहकारी सोसायट्या स्थापन झाल्या असून त्यापैकी ३ मजूर सहकारी सोसायट्या या एका पालघर तालुक्यात आहेत. या सोसायट्यांचे एक फेडरेशन असून या फेडरेशनच्या अध्यक्षपदी श्री स. तु. कदम हे आहेत. सफाळा येथील पाणी योजनेचे काम पालघर तालुक्यातील सफाळा येथील मजूर सहकारी सोसायटीला न देता ते धनसार मजूर सोसायटीला देण्यात आले आहे. या सोसायटीच्या चेअरमनपदी श्री. स. तु. कदम हेच असल्यामुळे गावच्या मजूर सोसायटीला हे काम न देता ठाणे जिल्हा मजूर सहकारी सोसायटीच्या फेडरेशनच्या अध्यक्षांनी आपल्या पोळीवरच तूप ओढून घेतले आहे. या सोसायटीच्या कारभाराबद्दल अनेक तक्रारीही आहेत.

कंत्राटदारांकडून किंवा बड्या भांडवलदारांकडून मजुरांची होणारी पिळवणूक थांबविण्यासाठी मजूर सोसायटीला प्रोत्साहन देणे केव्हाही इष्ट आहे. परंतु धनसार मजूर सहकारी सोसायटीला जरी हे काम दिलेले असले तरी मजुरांची पिळवणूक थांबलेली नाही, असे आम्ही काही पत्रकारांनी दि. ५ एप्रिल १९७३ रोजी सफाळा पाणी योजनेच्या कामास भेट दिली त्या

वेळी दिसून आले. त्या ठिकाणी चालू असलेल्या माती भरावाच्या कामावर धनसार मजूर सहकारी सोसायटीचा एकही सभासद मजूर कामावर नव्हता. त्या ठिकाणी असलेल्या जळगाव येथील श्री. भवसार या गृहस्थांनी आपण सोसायटीचे सभासद असल्याचे व २०० रुपयांवर मुकादम म्हणून काम करीत असल्याचे सांगितले.

ज्या मजूर सोसायटीच्या नावाने सफाळे पाणी योजनेचे काम मिळविण्यात आले आहे, ते केवळ दिखावू स्वरूप असून प्रत्यक्षात काही छुपे कंत्राटदार या सोसायटीच्या बुरख्याखाली या योजनेचे काम करीत असून त्या ठिकाणी मजुरांची भयानक पिळवणूक केली जात आहे.

या पाणी योजनेच्या कामावर माती भरावाचे काम चालू आहे. त्यासाठी वापरण्यात आलेले ब्रासचे माप हे सव्वा पटीने मोठे आहे. १० × १० × १$\frac{१}{४}$ फूट. अशा प्रकारे १०० घनफुटांऐवजी १२५ घनफूट म्हणजे एक ब्रास कामाऐवजी सव्वा ब्रास काम करून घेऊन मजुरी मात्र एक ब्रास कामाची द्यावयाची, अशाप्रकारे एका मजूर सोसायटीकडून गरीब, अज्ञानी व नडलेल्या मजुरांची घोर फसवणूक व पिळवणूक चालू आहे ही होणारी पिळवणूक अपुरी वाटते म्हणून की काय १० × १० × १$\frac{१}{४}$ फूट लाकडी फळीचे दोन भाग केले असून एक भाग उंचीला ७ इंच व दुसरा भाग ८ इंच. परंतु अडाणी आदिवासी व गरीब मजुरांना हे दोन्ही भाग सारखे आहेत असे भासवून ८ इंचीच्या फरीनेच माती भरावाचे काम घेतले जाईल, अशाप्रकारे कंत्राटदारापेक्षाही अधिक भयानक लूटमार व पिळवणूक मजुरांच्या नावाने काम करणाऱ्या धनसार मजूर सोसायटीने करावी यापेक्षा अधिक चीड आणणारी आणखी कोणती बाब असणार ?

या पाणी योजनेच्या कामावरील मजुरांचे पगार करण्यासाठी एक धनिक आठवड्यातून एक दिवस येतो व तो पगार करून जातो. हा कोण आहे ? या धनिकाचा व धनसार मजूर सोसायटीचा काय संबंध ? की धनसार मजूर सोसायटीने हे काम आपल्या नावाने घेऊन ते जादा नफा घेऊन एका बड्या कंत्राटदारास दिले ? कंत्राटदारांच्या पिळवणुकीतून मजूर मुक्त व्हावा म्हणून मजूर सोसायट्या स्थापन करण्याचा व त्यांना काम देण्याच्या शासनाच्या धोरणाची क्रूर विटंबनाच त्यामुळे होत आहे. मजुरांच्या अज्ञानाचा व गरिबीचा फायदा घेऊन मजुरांचे शोषण व पिळवणूक करणाऱ्या धनसार मजूर सोसायटीच्या या कारभाराची चौकशी झालीच पाहिजे. त्यामुळे काँग्रेसच्या नावाने सत्ताधारी, गरीब मजुरांची कशा प्रकारे पिळवणूक व शोषण करीत आहेत हे दिसून येईल.

पंढरीनाथ चौधरी (विरार)

● ● ●

# आ ले पा क

■ 'किर्लोस्कर मासिकाच्या मार्च १९७३ च्या अंकात य. दि. फडक्यांनी घेतलेली बाळ ठाकऱ्यांची मुलाखत आहे. ठाकऱ्यांनी मुलाखतीत दिलेल्या उत्तरांपैकी काही वेधक उत्तरे मुलाखतीच्या आरंभी जाड ठशात छापली आहेत. ती अशी : मी संघाचा अजूनही अभिमानी आहे. संघटनेत निर्णायक शब्द माझा...मी आयुष्यात कधीही निवडणुका लढवणार नाही...मी मिशनरी आहे....मला वाईटपणाने वागवणारे फक्त मद्रासीच नव्हते...मी कलावंत असल्याने माझा कम्युनिस्टांना विरोध आहे...

असो.

■ मुंबई कॉंग्रेसचे अध्यक्ष रजनी पटेल एका निवेदनात म्हणतात : मुंबई महापालिकेत कॉंग्रेसची जी पीछेहाट झाली तिला वाढती महागाई, दुष्काळी परिस्थिती, दुधाच्या भावात अचानक केलेली वाढ अशी कारणे आहेत.

रजनीभाईंनी पटेल अशी कारणमीमांसा का करू नये ?

■ नाट्यसंमेलनातील एका परिसंवादात माधव मनोहर म्हणाले : नाटक दोन घटका करमणुक करते की नाही हेच फक्त पाहिले पाहिजे.

आम्ही तर एवढेच म्हणतो की नाटक फक्त पाहिले पाहिजे.

■ बाळ कोल्हटकर एका परिसंवादात म्हणाले : माणसाने माणसाला धक्का द्यावा; पण पावित्र्य कायम ठेऊन.

अशा धक्क्याला 'भाऊचा धक्का' म्हणावे.

■ रविवार दि. २२ एप्रिल १९७३ च्या 'केसरी'तील 'मटक्याचे जग' या लेखात म्हटले आहे : आकड्यावरील हा खेळ बिनबोभाट आणि पद्धतशीरपणे चालतो. त्याला कारण एकच आणि ते म्हणजे या जुगारातील प्रामाणिकपणा. नावागावाची निशाणी नसतानाही बोटभर चिठ्ठीवर हजारो रुपये देण्याघेण्याचा हा व्यवसाय चालतो तो या प्रामाणिकपणाच्या जोरावरच.

म्हणून तर या मटक्याला खत्रीचा आणि खात्रीचा मटका म्हणतात.

■ ७ एप्रिलच्या 'नवशक्ती'त 'तिसरे वेतन मंडळ' या विषयावर लिहिलेल्या अग्रलेखात पुढील माहिती दिली आहे : मुंबईतील एका कंपनीत तर कारकुनाची

वेतनश्रेणीच रु. बाराशे अशी आहे !

तरी या कंपनीतले कारकून घरच्या मुलांच्या कामासाठी कंपनीचीच स्टेशनरी वापरत असतील, याविषयी माझ्या मनात शंका नाही.

■ गव्हात आढळलेल्या काळया बियांबद्दल खुलासा करून घेण्यासाठी वार्ताहरांनी पुरवठामंत्री वर्तक यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला; परंतु वर्तकांनी ही भेट नाकारली. त्यावर भाष्य करताना 'नवशक्ती 'चे संपादक म्हणतात: पुरवठामंत्री श्री. वर्तक वार्ताहरांची भेट घेत नाहीत याबद्दल आम्ही त्यांना दोष देत नाही.

आम्ही इकडे वार्ताहरांना दोष देऊन मोकळे झालो.

■ सेतु माधवराव पगडी 'नाना फडणीस : एक समालोचन ' या विषयावरील व्याख्यानात म्हणाले : नाना रात्री एक-दोन वाजेपर्यंत कामात मग्न असत. तर परत सकाळी पहाटे चार वाजता ते उठत असत.

'घाशीराम कोतवाल ' या नाटकातील नानासुद्धा कामसूच आहेत.

■ ' माणूस 'मधील ' जुलुस ' या काव्यसंग्रहाच्या परीक्षणात केशव मेश्राम म्हणतात : आजकालच्या तरुण कवितेचा रंग हा दिवसेंदिवस बदलतो आहे.

काव्यटीकेचा ढंग मात्र मागे होता तसाच आजही आहे.

■ त्याच परीक्षणात पुढे म्हटले आहे : कविता ही एक गंभीर घटना म्हणून कवीने स्वीकारली आहे.

हाच एक मोठा विनोद आहे, असे काहीजणांना वाटेल.

■ रेल्वे खात्याचे उपमंत्री कुरेशी यांनी लोकसभेत अशी माहिती दिली की गेल्या तीन वर्षांत रेल्वे गाड्यातून ३८९ खून झाले.

खून करणाऱ्यांजवळ अधिकृत रेल्वे तिकिटे होती की नाही ही माहिती, आमच्या मते, अधिक महत्त्वाची आहे.

■ आजच केले पाहिजे असे एखादे काम उद्यावर ढकलले तरी चालते, हे लक्षात असूद्या म्हटलं. ●

## रहस्यकथाकार जॉर्ज सिमेनो

जार्ज सिमेनो या फ्रेंच रहस्यकथाकाराने आता कथालेखनाला रामराम ठोकला आहे. वार्धक्य आणि प्रकृती-अस्वास्थ्य या कारणांसाठी त्याला हा निर्णय नाइलाजाने घ्यावा लागला. सिमेनोने स्वत:च्या नावाने २१४ रहस्यकथा लिहिल्या; वेगवेगळ्या टोपण नावाचा उपयोग करून त्याने लिहिलेल्या कथांची संख्या किमान ५० असेल.

त्यांच्या पुस्तकांचे अनेक भाषांतून अनुवाद झाले होते. इन्स्पेक्टर मारग्रे हे त्याने निर्माण केलेले पात्र कमालीचे लोकप्रिय झाले होते. इन्स्पेक्टर

मायग्रेच्या करामती आता वाचायला मिळणार नाहीत म्हणून सिमेनोचे असख्य चाहते दु:खी झाले आहेत.

आम्ही सिमेनोच्या रहस्यकथा वाचलेल्या नाहीत. त्यामुळे वाचकांच्या आनंदात आम्हाला सहभागी होता येत नाही; पण त्यांच्या दु:खात आम्ही सहभागी आहो. ●

## कॉपी : राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक

परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी, आपली उत्तरे समजवण्यासाठी, हव्या त्या पद्धती अवलंबण, ही गोष्ट आता अपूर्वाईची राहिलेली नाही. कृष्ण तेथे गोपी आणि परीक्षा तेथे कॉपी, असा नवा संकेत आता रूढ झाला आहे कॉपीची इतकी सवय आपल्याला होते आहे की तिच्यात काही गैर आहे असे आपण आता मानीत नाही शैक्षणिक उत्क्रांतीचा तो एक आवश्यक भाग आहे, असे एखाद्या बुद्धीजीवी शिक्षणतज्ञाने सांगितले तर ते आपल्याला सहज पटेल.

आपल्या राष्ट्रीय एकात्मतेची जी थोडी प्रतीके आहेत त्यात कॉपीचा अंतर्भाव केला पाहिजे, हे आम्ही आज यथं प्रथमच जाहीरपणे सांगत आहोत. कारण राज्यपरत्वे आविष्कार वेगळे असले तरी स्वातंत्र्यातील नव्या पिढीच्या साऱ्याच उपक्रमशील भारतियांनी कॉपिस्ट्री किंवा कॉपीकारी हे एक अगदी नवे हुन्नर वा तंत्र आत्मसात केले आहे. याची एक झलक 'हिंदुस्थान स्टँडर्ड' वृत्तपत्रातून 'माणूस'च्या जिज्ञासू वाचकांना सादर करत आहे.

कलकत्ता विद्यापीठाच्या १९७२ सालच्या कायद्याच्या अंतिम परीक्षेच्या परीक्षक मंडळाच्या अध्यक्षाने विद्यापीठ कार्यकारिणीला सादर केलेल्या अहवालात म्हटले होते : परीक्षेला बसलेल्या ६०० विद्यार्थ्यांपैकी जवळ जवळ सर्वांनीच कॉपी केली कॉपी करण्यात हे विद्यार्थी एवढे दंग आणि तल्लीन झाले होते की आधारभूत पुस्तकातील मुद्रणदोषसुद्धा त्यांनी आपल्या उत्तरपत्रिकातून प्रामाणिकपणे नकलून काढले आहेत.

इंदिरा गांधींना सत्तेवरून खाली खेचल्याशिवाय शिक्षणक्षेत्रातील हा भ्रष्टाचार नष्ट होणार नाही, असे आमचे स्पष्ट मत आहे !

—अनंतराव

भिवंडी, वसई ....इत्यादी

# एस. टी. स्थानकांवरील फेरफटका

प्रभाकर म्हात्रे

एस्. टी. चा सर्वात मोठा पसारा ठाणे डिव्हिजनमधे. कुणालाही नवल वाटेल पण ज्या मुंबई सेंट्रलवरून रोज दिवसरात्र महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात बसेस सुटतात, एवढेच नव्हे तर इंदूर, सुरत, बेळगाव, मंगलोर, कोचीन सारख्या तीन तीन दिवसांच्या प्रवासाच्या बसेस सुटतात ते बाँबे सेंट्रल, ठाणे डिव्हिजनचा उपविभाग आहे.

या ठाणे डिव्हिजनच्या ठाणे जिल्ह्यात मात्र एस्. टी. शेष महाराष्ट्राच्या मानाने साफ मागासलेली राहिली आहे. जोपर्यंत वर्टी एस्. टी. वर होते तोपर्यंत त्यांच्या योजना साऱ्या महाराष्ट्रात कार्यान्वित झाल्या पण या जिल्ह्याचे ते विरोधी आमदार असल्यामुळे त्यांना श्रेय मिळू नये म्हणून काँग्रेसच्या स्थानिक नेतृत्वाने हीन राजकारण खेळून या जिल्ह्यांत एस्. टी. चे खच्चीकरण केले. खुद्द ठाणे स्टँडवरून साधारणतः रात्रौ १२ वाजेपर्यंत दर मिनिटाला एक गाडी जाते व एक गाडी येते. पण ही साखळी जर पाच मिनिटं कोसळली तर ठाणे शहराचे रस्ते क्षणार्धात ब्लॉक होतात. डिव्हिजनच्या या मोठ्या स्टँडवर अत्यंत अपुऱ्या जागेमुळे गाड्या वळवायला, उभ्या करावयाला, धुवावयाला कशासाठीच तिळमात्र जागा नाही. प्रवाशांना बसण्यासाठी, शौच्यास लघवीस कश्याचीच कसलीही सोय नाही. ठाण्यासारख्या स्टँडवर पिण्याचे स्वच्छ पाणी मिळत नाही.

ठाणे डिव्हिजनमध्ये सर्वात मोठा डेपो म्हणजे भिवंडी होय. महाराष्ट्रात सर्वात श्रीमंत आणि मोठी नगरपालिका भिवंडी, ठाणे डिव्हिजनमधे सर्वात मोठा डेपोही भिवंडीच. महाराष्ट्रात सर्वात गलिच्छ, मागासलेले, बकाल शहरही भिवंडीच आणि ठाणे डिव्हिजनमध्ये सर्वात गलिच्छ, भकास विद्रूप स्टँडही भिवंडीच.

आताच, दीड-दोन वर्षांपूर्वी ८।१० लाख रुपये खर्चून येथे अत्याधुनिक स्टँड बांधला आहे. कँटिन आहे. पण दर टेबलागणिक माश्यांचे थवेच्या थवे गोंगाट करून वैतागलेल्या प्रवाशाला घटकाभर विश्रांती देण्याऐवजी पिटाळून लावतात. तोंड धुवायची जागा छातीभर ऊंचीवर आहे. नळाला हात लावावयाची सोय नाही. नळ आहेत

पण ते फक्त पहाण्यासाठी. तोंड धुवायाच्या जागेत गरगरून भरलेला चिखल आहे. टेबलावरील पाण्याचे ग्लास घेवून चूळ भरावी लागते. चूळ भरून आत टाकली की छातीपासून वरच्या कपड्यावर माशाएवढ्या आकारचे तारे उगवतात. संडास आणि मुतारी पाण्याअभावी अक्षरशः नरकपुरी बनली आहे. भिवंडी डेपोची रोजची आवक १७।१८ हजार रुपयांपेक्षा जास्त आहे. बसेस, श्येड्युल्स, कर्मचारीवर्ग यादृष्टीने सर्वात ठाणे जिल्ह्यात हा डेपो मोठा.पण उतारूंच्या आणि स्वतःच्या कर्मचाऱ्यांच्या सुखसोयीत हा डेपो नेहमी दरिद्रीच राहिला आहे.

वसई डेपो म्हणजे अनाथ खुरटलेले पोर ! वीस वर्षांपूर्वी या डेपोचा जन्म झाला. त्यापूर्वी येथे 'पाटकर सर्व्हिस' म्हणून एका गृहस्थाची ४०–५० बसेसची उतारू वहातूक कंपनी होती. कोकणच्या तीन जिल्ह्यात, पाटकर सर्व्हिस ठाणे जिल्ह्यात, शिर्के सर्व्हिस रत्नागिरीस, आणि तेण्डोलकर सर्व्हिस मालवण, सावंतवाडीस त्या काळात प्रख्यात होत्या. कोल्हापूर दरबारात वजन असलेल्यांची लक्ष्मी सर्व्हिसही त्यावेळी कोकणात संचारत होती. या चार कंपन्यांनी उतारूंच्या बजावलेल्या सेवा जुनी माणसे आजही मोठ्या अभिमानाने सांगतात. निव्वळ उतारूंच्या सेवा पार पाडून या मंडळचा काळाच्या ओघात विलीन झाल्या नाहीत तर नव्याने संसार थाटणाऱ्या महामंडळाला आपलेकडील अनुभवी ड्रायव्हर, तंत्रज्ञही पुरवून ए. टी. चा संसार चालताबोलता झाल्यावर सुखाने काळपुरुषाचा त्यांनी निरोप घेतला.

या पाटकरांच्या तत्रज्ञांची आणि ड्रायव्हर्संची सेवा अगदी काल काल पर्यंत म्हणजे १९६५ पर्यंत वसईकरांना मिळत होती. पण आता केरुमामा म्हात्रे हे मारुतीचा टिळा लावून ठराविक


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरी सराय (गया)**

वसई–ठाणे गाडी हाकलणारे म्हातारे ड्रायव्हर सोडले तर पाटकरांच्या काळातला तिथे कुणी दिसत नाही.

वसईला जन्मकाळची मूळ शेडयूल्स २२ होती. आता त्याची झालीत ६४. सुरुवातीच्या २०–२५ गाडयांवरून आता ८५ च्या घरात गाडया गेल्या आहेत. शिवाय अर्नाळयाला एक स्वतंत्र डेपो थाटून विरार भाग अलग काढण्यात आला आहे. रोजची आवक १० हजारांपेक्षा जास्त आहे.

वसई स्टँड आणि वसई स्टेशन स्टँड असे दोन मोठे वाहतूक स्टँड या डेपोला आहेत. भाऊसाहेब वर्तकांचा हा तालुका. या स्टँडवरच्या या सुखसोयी पहा. कामगारांसाठी निवासस्थान चांगले नाही. एकाच खोलीत दाटीवाटीने कंडक्टर झोपतात. उतारूंना बसण्याची सोय नाही. एवढया मोठया स्टँडवर–जिथून चाळीस हजारापेक्षा जास्त उतारू जा ये करतात–त्या स्टेशन स्टँडला उतारूंना बसण्याची, लघवीची, संडासची सोय नाही.

वसई शहर स्टँडवर एकुलता एक संडास आहे. या संडासाबाहेर उघडया-वर उतारूंच्या रांगेला लागूनच लोक नैसर्गिक विधी पार पाडतात.

या एकुलत्या एक संडासाची एक गमतीदार कथा एस्. टी. तील जुनी माणसे सांगतात,

कुणी एका जाडजूड एस्. टी ऑफिसरला पोटात कडकडून आले. स्टँड-वरच्या नोकराने लगबगीने त्या चिचोटया संडासांत टमरेल भरून ठेवले. आणि साहेबास आत जाणेचा इशारा दिला. नैसर्गिक घाईगडबडीमुळे साहेब आत गेले आणि त्या वास्तुत फिट बसल्यामुळे त्यांना टमरेलचा उपयोग करता येईना. एवढेच नव्हे तर मागाहून बाहेरही येणे त्यांना कठिण झाले. अशा या एकुलत्या एक संडासात त्यानंतर कित्येक वर्षे कुणी जाण्याचे धाडस करीत नाही. त्या संडासाच्या दरवाज्यातच विधी आटोपून मोकळे होतात. ऐकीव गोष्टींवर विश्वास नसावा म्हणून मी प्रात्यक्षिक म्हणून पाय बरबटत असताही त्या वास्तूत शिरण्याचा प्रयत्न केला, पण बाहेर पडताना आत फिरता येईना. म्हणून मागच्या पावलांनीच बाहेर आलो. कुणीही येवून वसईतील हे नाविन्य पाहून जावे.

गाडया वळवावयाची, उभ्या करा-वयाची जागा तयार केलेली नाही. त्यामुळे ४ फूट खोल खड्डे पडलेले आहेत. कामगारांच्या सुखसोयी तर नावालाही आढळणार नाहीत.

तसा या डेपोचा इतिहास लहानसहान नाही. एस्. टी. मध्ये आता मोठया पदावर चढलेले आणि कामगारात अफाट लोकप्रिय झालेले डी. सी. एम. पी. कोल्हटकर (एस्. वाय कोल्हट-करांचे भाऊ) डी. सी. धामणकर (खासदार धामणकरांचे पुतणे) अॅ. मॅनेजर शिर्के याच डेपोतून पुढे आले आहेत. आज ९०० पेक्षा जास्त तंत्रज्ञ ४५० च्या दरम्यान ड्रायव्हर, कंडक्टर्स, ४०।४५ ऑफिस स्टाफ असा या डेपोचा

संसार आहे. पण कर्मचाऱ्यांच्या आणि उतारूंच्या सुखसोयींच्या नावाने ठणाणा. वसई स्टेशनवर तर एस्. टी. चे कँटीन नाहीच. पण वसई डेपोला जे कँटीन आहे, त्याच्या बाह्य भकास अंगाकडे नजर गेली की उतारूला आत पाऊल ठेवण्याची छाती होणार नाही. हा मजकूर लिहिण्यापूर्वी मी मुद्दाम त्या कँटीनमध्ये शिरण्याचा प्रयत्न केला. धुरळयाने माखलेल्या मोडक्या खुर्चीवर बसलो. पिण्याच्या पाण्यापासून कुठचेही थंड पेय तिथे मिळत नाही. फक्त चहा आणि कॉफी मळकटलेल्या कपबशीतून ऑर्डर दिल्यापासून तीस मिनिटानंतर केव्हातरी मिळते.

ठाणे डिव्हिजनमध्ये तिसरा महत्त्वाचा डेपो म्हणजे कल्याण. उत्पन्नाच्या दृष्टीने कल्याण डेपोचा नंबर डिव्हिजन मध्ये दुसरा आहे. पण उतारू वा कर्मचाऱ्यांच्या सुखसोयीच्या दृष्टीने येथेही काही राम नाही.

यानंतर पालघर, अर्नाळा, विठुलवाडी, जव्हार ह्या लहान डेपोंचा या डिव्हिजनमध्ये समावेश होतो. पण शेष महाराष्ट्रातील इतर डिव्हिजनसारखी सुखसोय यापैकी एकाही डेपोत नाही.

काही वर्षांपूर्वी दापोडीचे एस्. टी.चे मुख्य वर्कशॉप पालघर येथे हलवावे असे जवळजवळ निश्चित झाले होते. पण या जिल्ह्याचे नेतृत्व ठिसूळ आणि उर्मट निपजल्यामुळे पालघरचे पाणी मचूळ निघाले.

एकंदरित महामंडळाचा कारभार इतर निमसरकारी कॉर्पोरेशन्सपेक्षा सरस व प्रगतशील असला तरी या जिल्ह्यात स्थानिक नेतृत्व थिटे पडल्यामुळे ठाणे डिव्हिजन एस्. टी.ला नेहमी अडचणीची व तोटयाची होत राहिली आहे.

दरवर्षी ठाणे डिव्हिजनचे ड्रायव्हर-कंडक्टर जिल्हा परिषदेच्या रस्त्यावरून गाड्या हाकलण्यास नकार देतात. केवळ ड्रायव्हर-कंडक्टरचा चांगुलपणा म्हणूनच जीव धोक्यात घालून जिल्हा परिषदेच्या रस्त्यावरून गाड्या हाकलण्याचे धाडस कर्मचारी दाखवीत असतात.

ठाणे जिल्हा परिषद ही म्हणावयाला काँग्रेसपक्षाच्या हातात आहे. पण खऱ्या अर्थाने ती वर्तक गटाकडे आहे. त्या परिषदेकडील बांधकाम खाते, शिक्षणखाते, रस्ते, शेतकी यात 'भाऊसाहेबांची माणसे' या पालुपदाने ओळखल्या जाणाऱ्या द्विपाद प्राण्यांचा एवढा सुळसुळाट आहे की, जनहिताच्या नावाखाली सारापैसा हे द्विपाद प्राणी स्वतःच्या वेल्फेअरसाठी फस्त करतात.

• • •

मद्रास मेल

# धरले तर चावते सोडले तर पळते...

चंद्रकांत अंबाडे

नुकतीच मुंबईच्या इकॉनामिक टाईम्सने, भारतातील उद्योगधंद्यांच्या कंपन्यांची नंबरवारी प्रसिद्ध केली. हिंदुस्थान स्टीलची १०२६ कोटींची गुंतवणूक असल्याने क्रमांक पहिला. अर्थात पहिले नऊ क्रमांक सरकारी प्रकल्पांचे, दहावा टाटा स्टील आणि दोन सरकारी प्रकल्प. १५५ कोटींची गुंतवणूक असणारा (घसारा वजा जाता) नेवेली लिग्नाईट कार्पोरेशन लि. हा सरकारी प्रकल्प चौदाव्या क्रमांकावर आहे.

मद्रासपासून जेमतेम दीडशे मैलावर नेवेली आहे. विरूधाचलम आणि कुडालोर ह्यांच्यामध्ये हा प्रकल्प आहे. आजवर सुमारे १८० कोटी रुपये खाऊन बसलेला हा प्रचंड प्रकल्प, आजतरी अर्धामुर्धा बंदच आहे. त्याबाबतीत सरकारची परिस्थिती खरोखरच 'धरलं तर चावतं आणि सोडलं तर पळतं' अशी झालेली आहे. चालवावा तर भरमसाठ तोटा, अन् बंद करावा तर आजवर घातलेल्या १८० कोटींची काय वाट ?

तसा विचारच केला तर नेवेली लिग्नाईट कार्पोरेशन लि. ही १९५५ मध्ये स्थापन झालेली एक जॉईंट स्टॉक लिमिटेड कंपनी आहे. हजाराचा एक प्रमाणे आठ लाख शेअर्स विक्रीस काढले आणि सगळेच्या सगळे भारत सरकारने खरेदी केले. लिग्नाईट हा दगडी कोळशाचा धाकटा भाऊ. नेवेली भागात त्याचा पृथ्वीच्या पोटात प्रचंड साठा आहे. कारखान्याची व खाणीची क्षमता सध्याच्या दुप्पट झाली तरी आणखी पस्तीस वर्षे तो पुरेल. म्हणूनच अठरा वर्षांपूर्वी भारतीय सरकारने एक मोठे आव्हान स्वीकारले अन् हा कारखाना उभा राहिला. एकावर आधारलेला दुसरा असे करता करता मग द्राक्षाच्या घडाप्रमाणे अनेक उद्योग तेथे निर्माण झाले. नेवेलीचा मुख्य उद्योग म्हणजे वीज निर्मिती, आणि खाणीतून लिग्नाईट काढणे, खत उत्पादन, डांबर, फिनाईल, कॉर्बालिक ॲसिड इ. अनेक बाय-प्राडक्टस्. तामिळनाडूतील सात वीज केंद्रांपैकी दोनच थर्मल आहेत—बाकीची पाच हायड्रो म्हणजेच पाण्यावरची. दोन थर्मल म्हणजे एन्नोर व नेवेली. सध्या तामिळनाडूमध्ये ७५% वीज कपात झालेली आहे. मध्यंतरी फेब्रुवारी-मार्चमध्ये ९०% कपात म्हणजे तर आख्ख्या भारतातील एक उच्चांकच होता. अगदी संध्याकाळी बाजार, दुकाने सारे मेणबत्त्यावर आणि पेट्रोमॅक्स् बत्त्यावर, एकुलता एखादा पंखा फिरत असतो तेवढेच वीजेचे अस्तित्व. धोबी इस्त्रीला कपडे घेईनात, ना पिठाच्या

गिरणीत दळण! किलोभर गव्हाला तीस पैसे हा काय दळणाचा भाव झाला? वीज कपातीचे निमित्त पुढे करून भाववाढ. जेथेजेथे म्हणून विजेचा प्रश्न येतो तेथे टंचाई झाली. घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरसाठी किमान आठ दिवस नंबर लावा. पेट्रोल पंपावर डिझेलची टंचाई, छपाईची कामे बंद. सिनेमाचे शो बंद–कारखान्यांना ले ऑफ अन् आडवारी सुट्टया. त्यामुळेच मग ह्या २५० मेगॅवॅट क्षमतेच्या ३० कोटी रुपयांच्या पॉवर हाऊसकडे लक्ष गेले, तर तेथेही सारा अंधारच! कारखान्याची आणि खाणीची अपेक्षित क्षमता धरली होती दरसाल आठ टनांची–पण प्रत्यक्षात तो आकडा ४५ चे वरती कधीच गेला नाही. गतसालचे उत्पादन ३६ वर येताच सरकार खडबडून जागे झाले. पण वेळ निघून गेली आहे–वीज कपात ७५% पर्यंत आणण्याशिवाय दुसरा कोणताच मार्ग शिल्लक नव्हता.

खाणीतून लिग्नाईट काढून, त्याचा दगडी कोळशाऐवजी जळणासाठी उपयोग करून वीज–खते–ॲसिडस् बनवणे हे तत्व. खाणीचे उत्पादन जसजसे कमी कमी होऊ लागले तसतसे अवलंबून असणारे उद्योग मंदावले. परिणामतः फायद्यामधून मध्यवर्ती सरकारचे कर्ज फेडण्याची जी अपेक्षा होती, ती साफ झाली. उलट कर्जाचा डोंगर वाढू लागला. सन १९६९–७० मध्ये कारखान्याने रु. २,३१,१७,९१४ घाटा दाखविला तर हाच आकडा १९७०-७१ मध्ये झाला १०,९८ २९,२८३! आता तर १९७२ चे हिशेब पुरे होत आलेत व तोटा आहे फक्त ३३ कोटी एकूण.

कारखान्याची पाहणी व सुधारणा करण्यासाठी नेमलेल्या सुब्रह्मण्यम् कमिटीने आपल्या अहवालात व्यवस्थापनावर मनसोक्त ताशेरे झाडलेत. अपेक्षित क्षमता जरी समजा यदाकदाचित् गाठली तरीही हा मागील तोटा भरून येणे



अशक्य आहे असा अहवाल कमिटीने देताच, व्यवस्थापक म्हणू लागले "मग राईट-ऑफ करा! नाहीतरी हेवी इलेक्ट्रिकल्सला तेच केलेय!"–आहे की नाही तोडगा! आता सरकार लिग्नाईट ऐवजी तेल इंधन वापरण्याची योजना मान्य करून बसले आहे. त्यामुळे सध्याच्या भट्टया बदलण्याची तिसरीच डोकेदुखी निर्माण झाली आहे. एकट्या फर्टिलायझर विभागात ह्या बदल करण्यास ३ वर्षे हवीत. वीज निर्मितीचे बॉयलर्स लिग्नाईटऐवजी तेलाचे करण्यासाठी सुमारे दीड कोटी रुपये खर्च येईल व पूर्ण एक वर्ष लागेल. कार्पोरेशन म्हणते 'आम्ही हा खर्च इले. बोर्डाकडून वसूल करू' इले. बोर्ड अर्थातच दोन-सव्वादोन कोटींची दरवाढ करणार हे नक्की.

सरकार विचार करीत होते कारखाना बंद करावा काय? पण सुमारे वीस हजार कामगार बेकार होतील. तेवढ्यात एक नवीनच आफत आली. जपानच्या टायो इंजिनियरींग कार्पोरेशनतर्फे देशात एकूण पाच खत कारखाने टाकण्याबद्दलची पाहणी झाली– त्या समितीलाही नेवेली हेच ठिकाण आवडले, आता सरकारपुढ दोनच पर्याय आहेत. आहे तसाच पुढे चालवावा किंवा आणखी भांडवल घालून, उत्पादन सुधारून प्रकल्प फायद्यात आणावा. त्यासाठी एकूण २०० कोटी लागतील व पहिला टप्पाच ३३ कोटींचा आहे. आतापर्यंतच्या १८० कोटीच्या गुंतवणुकीवर अर्धा टक्काही व्याज सुटले नाही, उलट ३३ कोटी घाटाच–आणि तोही म्हणे 'राईट-ऑफ करा!' ह्या अधोगतीस जी कारणे आहेत, त्यापैकी महत्वाचे म्हणजे लेबर ट्रबल्स! मान्य असणाऱ्या पाचही युनियन्सनी मार्च ७० मध्ये करार करून, सरकारवर दरसाल ९२ लाखांची पगारवाढ लादली व तरीही मे ७० त कारखाना थंड पडलाच. तेव्हापासून आजवर–मे ७३ पर्यंत– कुठल्या ना कुठल्या विभागात रोज संप आहेच. जिथे नाही तेथे 'गो स्लो' किंवा 'वर्क टू रूल' म्हणजेच मुद्दाम कमी काम करणे. आक्टो, ७२ पासून काही विभाग वीजकपातीमुळे बंद–तर काही लॉकऔटमुळे. अन् म्हणूनच आजतरी सरकारची परिस्थिती धरलं तर चावतं, सोडलं तर पळतं अशी काहीशी झालेली आहे!

● ● ●



# वेडी माता वेडी ममता

दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान केव्हा-तरी एका हिंद पलटणीनं 'जंगल प्रशिक्षणासाठी' उत्तर हिंदुस्थानातील एका जंगलाच्या कडेला तळ ठोकला होता. तिथ सैनिकांची युद्धविषयक भीती नाहीशी करण्यासाठी नवनवी प्रात्यक्षिकं घेतली जात होती. वर्षातून एकदोन वेळा कधीतरी पलटणी इथं

यायच्या आणि महिनाभर राहून परत जायच्या. जीवंत काडतूसं आणि बाँम्स फायरिंगसाठी उपयोगात आणले जात होते. सकाळी आठ वाजल्यापासून दुपारी दोन-तीन वाजेपर्यंत जंगलभर सतत लहानमोठ्या हत्यारांचा मारा होत असे या बरसत्या, जळत्या गोळीबारातून स्वतःला चुकवून कशी कूच करायची नि शत्रूवर कसा हमला करायचा हे सैनिकांना शिकविले जात होते. ते जंगल गर्द झाडी, दऱ्या आणि कडे यांनी भरलेले होते. सैनिकांच्या तळापासून अर्ध्या कोसावर एक लहानसं गाव होतं, चाळिसेक घरांचं.

अशीच एक सकाळ, सातआठचा समय. फायरिंगच्या क्षेत्राबाहेर धोकादर्शक लाल बावटे रोवले होते. पहारेकरी चहूबाजूंनी डोळ्यात तेल घालून पहारा देत होते. फायर चालू असता कुठल्याही इसमाला आत न सोडण्याचा सक्त हुकूम होता. प्रात्यक्षिकांची सगळी जय्यत तयारी झाली.

एका टेकडीवरून लष्करी अधिकाऱ्याच्या तोंडातून बिजलीच्या चमकाऱ्याप्रमाणे आर्डर सुटली,

"सेक्शन्, सामनेवाले दुष्मनपर फायर!"

काही झाडं झुडूपाचं लक्ष करून सैनिकांनी ढाऽऽ धडाम ढाऽऽ फायर सुरू केली. सर्व लहानमोठी हत्यारं आग ओकू लागली. पर्वत मोडून पडावा तसा आवाज जंगलातून दणदणून घुमला. आणि त्याचबरोबर विरुद्ध दिशेच्या उंचवटयावरून एक केविलवाणी मरण किंकाळी वातावरण चिरीत सैनिकांच्या कर्णरंध्रावर येऊन आपटली. क्षणात फायर बंद झाला.

हत्यारं तशीच टाकून सैनिक उठले आणि आवाजाच्या दिशेने जीव खाऊन धावू लागले. समोरची अरुंद दरी उतरून पुढच्या टेकडीवर आवाजाच्या दिशेने सरसावले. एका झाडाच्या बुंध्यापाशी एक बारा-तेरा वर्षांचा कोवळा, सुकोमल मुलगा त्या सर्वव्यापी फायरिंगला बळी पडला होता. सर्व शरीराचा चेंदामेंदा होऊन रक्ताच्या थारोळ्यात तो इवलासा जीव बुडून गेला होता.

सैनिकांच्या ताठर, कठोर शरीराचा थरकाप उडाला. नेत्रात वेदनेचं पाणी झाकाळून आलं. एकानं ते प्रेत अलगद उचलून गावाच्या वेशीवर आणलं. सर्व गावात अग्निशलाकाप्रमाणे ही वार्ता पसरली. मुलाची आई पण अस्पष्ट खबर मिळताच पडत, ठेचाळत गावच्या वेशीच्या बाजूने पळत सुटली.

तिचा हा एकुलता एक मुलगा भोला! बापाविना पोरका झालेला. काल सकाळी गाय गोठ्यात आली नाही. झुंजुमुंजु होताच आईला सांगून तो गाईच्या शोधार्थ जंगलाकडे निघाला. गाभीणी गाय, कुठं राहिली कुणास ठाऊक याच विवंचनेत तो सर्व जंगल तुडवीत सुटला. कड्या-कपारीमधून,

म. द. शैल

झाडा-झुडपातून आपल्या प्रिय गाईला शोधत तो इथ टेकडीवर येऊन पोचला आणि नकळत फायर सुरू झाला. तो जंगलात शिरल्यानंतर या गोळीबार क्षेत्राबाहेर सैनिक पहारेकरी लागले होते.

एकुलत्या एका मुलाची आई आली. तिचं मूल रक्तात न्हाऊन शरीराची चाळणी होऊन मरून पडलं होतं. तिला वाटलं ते आपलं मूल नव्हे सारं ब्रह्मांडच आपल्यासमोर मरून पडलं आहे. काही क्षण तिचे डोळे रखरखीत निखाऱ्यासारखे विस्फारीतच राहिले. दुसऱ्याच क्षणी अंगात कली संचारल्यासारखी एक कर्कश किंकाळी फोडून ती मूर्छित होऊन बाळाच्या अंगावर कोसळून पडली.

शुद्ध आली तेव्हासुद्धा ती रडली नाही, भेकली नाही. रडलो नाही म्हणून अंतरीचा आगडोंब विझला नाही. मुद्रा अधिकच भकास झाली. रडावं तरी कोणत्या इंद्रियानं? सगळीच बधीर झालेली! रडली असती तर फार बरं झालं असतं, हंबरडा फुटला असता तर हृदयावरचा बोझा हलका झाला असता, पण डोळ्यातून एकही थेंब ओघळला नाही. सगळं दुःख सगळी व्यथा आतल्याआत गुदमरू लागली. शोकानं सतप्त होऊन पिसाट झालेली बाळाची आई भेसूर हास्य करीत सैरावैरा पळत सुटली. लोक पाठलाग करू लागले. त्यात मुलंही सामील झाली. ती जास्तच पळू लागली. शहाण्यांचा आणि वेड्याचा सनातन झगडा येथे सुरू झाला.

वात्सल्याचो फुलं कोमेजून काष्ट झालेल्या या जीवनवृक्षाला लोक वेडी म्हणून हिणवू लागले. तिची मातृत्वाची चूक वेडात जमा झाली. थोरानं ठरवलं वेडी, लहानानं म्हटलं वेडी, मग समाजात वेडीच्या शक्ति, असहाय्य जीवनात जे वाटचाला येतं ते सर्व तिच्या नशीबी आलं. वेड्यांचा मेंदू सडत नाही—ती भावनांची तीव्र दुखापत होय. विद्ध हृदयातून ओघळणारे रक्ताचे पाट सर्व भावसंवेदना व्यापून टाकतात. मग एकच वेड! एकच ध्यास! सन्यस्त होऊन भटकत राहणे, सगळी बंधनं झुगारून देणे, थोरांच हिडीस फिडीस, मुलांचं हातात मिळेल ते घेऊन पाठलाग! वेडी पळते आहे, मुलं हातात दगड धोंडे घेऊन कुत्र्यासारखी मागं लागली आहेत. आरोळ्या! गोंगाट! कोलाहल! हृदयविदारक दृश्य! तिच्या भोलाबरोबर कालपर्यंत अंगणात खेळणारी, बागडणारी मुलं आज वेडीच्या पाठी लागली आहेत, हातात दगड घेऊन.

वेडी मिळतील त्या चिंध्या गोळा करून बोचक्यात कोंबू लागली. सगळ्या चिंध्याच चिंध्या! अंगावरच्या कपड्यांच्याही चिंध्याच झालेल्या. आयुष्याच्याही चिंध्या. तासन्तास ती त्या चिंध्या उकलीत बसून राहो. मग लगबगीनं त्या चिंध्या बोचक्यात कोंबून कासोटीला मारून चालू लागे. न पेलणारं, न झेपणारं ते बोचकं तिच्या दुःखासारखंच. भग्न स्वप्नांच्या चिंध्यानं भरलेलं.

आताशा वेडीच्या वेडानं पिसाट रूप धारण केलं. महिनामहिना ती खाता-पिताना कुणाला दिसली नाही. झोपलेली कुणी पाहिली नाही. कृश शरीर किडकिडीत पायावर तोलून ती फिरत राही. रात्रीच्या वेळी आपला मूळ मधुर आवाज भेसूर करून ती अगाई गात राही– विचित्र स्वरात अर्थहीन शब्द घेऊन, एका झाडाला तिनं एक फाटक पाळणं बांधलं होतं. तिच्यात ती चिध्याचं बोचकं ठेवून हिसके देऊन पाळणं हालवीत राही, भेसूर आवाजात बाळाला जोजवीत राही. लोकांनी तक्रार केली-वेडी रात्रीचं झोपू देत नाही.

एक दिवस मुलं तिच्या मागं लागली. वेडी पळू लागली. मुलांना चेव आला. वेडी एकदम थांबली. तिनं मागं वळून भारावलेल्या दिठीनं एक वेळ मुलाकडं पाहिलं. वेडीत घडलेला हा बदल अनपेक्षित होता, नवा होता. सप्तसिंधूची वात्सल्यता तिच्या डोळ्यातून ओसडत होती. दोन्ही हात पसरून ती मुलांच्या घोळक्यात मंद पावले टाकीत जाऊ लागली. मुलांच्या हातातले दगड गळून पडले. हरिणीच्या नजरेनं ती तिच्याकडे भिरीभिरी पाहू लागली. एक निःशब्दता सर्वत्र पसरली. मुलं हालचाल विसरली. मात्र ती एकदम जवळ येताच कानात वारा भरल्यासारखी धूम ठोकली.

वेडी पुत्र पिपासेनं वेडी झाली होती. वैराण वाळवंटात रक्त ओकीत पडलेली वेडी, दिवसरात्र बोलबोल बोलत राही, न थांबता, न थकता, न थबकता. मुक्या जनावराच्या शरीरातून रक्त ओघळावे तसे ते शब्द! करुणेनं सर्वथैव ओथंबलेले असूनही अनाकलनीय, अगम्य.

एक वर्ष निघून गेलं. वेडाच्या झटक्यात वेडीनं एक वर्ष घालवलं. वेडाची साथ होती म्हणून सुसह्य झालं तिला ते वर्ष. पुन्हा पलटणीनं तिथं तळ ठोकला युद्धाच्या त्याच प्रात्यक्षिकासाठी. सर्वांत प्रथम वेडीला समजलं. वेडी साऱ्या गावाला सांगत सुटली, हर्षानं खिदळत. साऱ्या गावानं तिला वेड्यात काढलं.

प्रात्यक्षिकं सुरू झाली. फायरिंगचा आवाज असमांतात घुमू लागला. लोकांनी म्हटलं आपली मुलं सांभाळा आपली जनावरं सांभाळा. यावेळी मात्र गोळीबार क्षेत्राभवती सैनिकांचा पहारा भक्कम होता. चिटपाखरूही आत जंगलात नजर चुकवून जाऊ शकत नव्हते. हाकेहाकेवर एकेक जवान हातात लाल बावटा घेऊन उभा होता. वेडी तिकडेच घुटमळू लागली. सैनिकांनी तिला पिटाळून लावलं.

त्या रात्री वेडीचं बदसूर गाणं कुणाला ऐकू आलं नाही. शब्दांची धोंगडी शिवता शिवता अपुरीच राहिली. लोकांना वाटलं, आता वेडी ताळ्यावर येत आहे. रात्रीच्या अंधारात फाटकं पाळणं झाडाला लोंबत होतं – आत्महत्या केलेल्या माणसाच्या प्रेतासारखं. जवळच चिध्याचं बोचकं पडलं होतं. झाडाच्या फांदीवरून घुबडांचा चित्कार घुमत होता. जंगलाच्या बाजूनं किर्रर्र आवाज गावाकडे येत होता. गाव आज शांत होते कारण आज वेडी अंगाई गात नव्हती.

दुसऱ्या दिवशी सकाळी फायरिंग सुरू झालं,

ढाऽऽ धडाम ढाऽऽ!

तोच एक मरण किंकाळी विरुद्ध दिशेनं घुमली. हृदय पिळवटून सोडणारी ती किंकाळी, जणू मृत्यूच्या दारातून यमानं मारलेली डरकाळी!

वेडी रात्रीचीच जाऊन झाडीत लपून बसली. त्याच ठिकाणी ज्या ठिकाणी तिचा मुलगा बळी पडला होता. कुणालाही पत्ता लागू न देता ती इथं आली आणि तिनं आपला अलौकिक जीवनयात्रा अशा रीतीनं संपवली.

नवरा मेला त्यावेळी ती मेली नाही. 'सती' गेली नाही. पाच वर्षांच्या भोलाला कवटाळून खूप रडली. रडून रडून हलकी झाली आणि दुप्पट जोमानं कामाला लागली, ज्याच्यासाठी ती रडून रडून जिवंत राहिली त्यानं चकवलं मग आता रडावं कुणासाठी? स्वतःसाठी? छे स्वतःसाठी कधी रडायचं असतं? शेवटी रडण्यासाठी कोणी उरला नाही म्हणून ती वेडी झाली आणि वेळ मिळताच निघून गेली. एक वर्षभर ती मरण्यासाठीच जगली. पतीबरोबर गेली असती तर लोकांनी 'सती' म्हटलं असतं. आता काय म्हणतील? म्हणतील वेड्या माउलीची वेडी माया!

प्रेताजवळ सर्व सैनिक जमा झाले. एका आईचं पवित्र रक्त मातीत सांडलं होतं. मुलाच्या वात्सल्यापाई सांडलेलं ते परमपवित्र रुधीर! ती आता फक्त एकट्या भोलाचीच आई राहिली नाही. साऱ्या विश्वाची आई रक्तानं भिजून धरतीवर शांत पहुडली होती. तिच्या रक्ताचा कणान् कण मातृप्रेमाची महती गात होता. त्या रक्तानं भिजलेल्या मातीलासुद्धा वात्सल्याचा उमाळा आला होता. या मातीत एखादं बीज रुजलं असतं तर त्या झाडालासुद्धा मातृप्रेमाची अमृतफळंच आली असती — अमर वात्सल्यरसानं डबडबलेली!

सैनिकांनी तिला आपल्या शस्त्रांनिशी सलामी दिली. शोक प्रदर्शित करण्यासाठी त्याच्या शस्त्रांच्या नळ्या जमिनीकडे झुकल्या. त्या 'शोकशस्त्रां'-बरोबर ते अधोमुख होऊन टिपं गाळू लागले. त्यांना दूर दूर असलेल्या आपल्या आयांची आठवण झाल्याशिवाय राहिली नाही. साऱ्या सैनिकांनी सैनिकी इतमानानं तिच्या प्रेतयात्रेत भाग घेतला. त्यांच्यामागे तिच्या गावचे लोकही चालत होते. कधी न झालेला हा भव्य अभूतपूर्व सोहळा गावकऱ्यांनी प्रथमच पाहिला. तिला वेडी हिणवणारे आज तिच्या प्रेतामागे मुसमुसून रडत होते.

एका सैनिकाने पुढं होऊन तिला भडाग्नी दिला. चिता धडधडू लागली. ज्वाळा उंच उंच झेप घेऊ लागल्या, मातृप्रेमाचा संदेश घेऊन आसमंतात पसरल्या. वात्सल्याचा अथांग सागर आटून पंचमहाभूतात विलीन झाला.

● ○ ●

## पुस्तके

अपेक्षा निर्माण करणारा संग्रह

# प्रवासिनी

केशव मेश्राम

श्री. प्र. श्री. नेरूरकर हे तसे परिचयाचे नाव. ' अनवाणी चाल ' हा ललित लेखसंग्रह, ' गोवा माझा सुखाचा ' आणि ' किरीस्तांव ' या कादंबऱ्या आणि वृत्तपत्रांतून त्यांनी घेतलेल्या ' विशेष साहित्यिक मुलाखती ' ह्यामुळे ते ओळखीचे झाले आहेत. ' प्रवासिनी ' हा त्यांच्या बारा कथांचा पहिला लघुकथा संग्रह.

' घंटा घणघणते आहे ' ही संग्रहातील पहिली कथा. ' करमळा ' गावच्या रामेश्वराच्या देवळाची मध्यरात्री अभावितपणे घणघणणारी घंटा. तिच्या आवाजाने दचकून उठलेली काका गुरवाची बायको, काकीबाय...आणि देवळाच्या दिशेने जाणारे काका गुरव. आयुष्य देवपूजेत गेलेले, पण स्वत: मात्र निपुत्रिकच आणि ह्या घंटानादाने त्यांचे उद्‌ध्वस्त झालेले संथ मन आणि स्वत:चे नावगाव विसरून, शरीवर–पाण्यात बेभान डुंबणारे; भान हरवलेले काका आणि त्यांच्याकडे अवाक् बघत थांबलेली काकी; अशी ही अद्‌भुताची डूब असलेली कथा. निपुत्रिक आणि भाविक अशा दोन मनांचा अलौकिक पातळीवरचा संघर्ष नेरूरकर येथे शब्दात बांधू बघताहेत असे वाटते.

' बंगला ' ही प्रवासी मनाची बेबंद कथा आहे. मध्यप्रदेशातल्या दूरवरच्या या नगरीत ' त्याने ' घालविलेले दिवस. पैसा, प्रतिष्ठा आणि माणसांनी गजबजलेली ही वास्तू, पुन्हा पंधरा वर्षांच्या पुनर्दर्शनाने त्याच्या मनाला हेलावून सोडते आणि काळ सरकताना सारे सारे धुवून टाकते. देखणे, खंबीर, रुबाबदार चुलते असेच कुठेतरी मरण पावलेले. चुलतीही लाचार अवस्थेत सरकारी हॉस्पिटलात खंगत खंगत खपली आणि तेथे सारे नवे आले. ह्या बंगल्याभोवती घोटाळणाऱ्या ' तो 'च्या साऱ्या भग्न

स्मृतींचे मोहळ नेरूरकर संथपणे रंगवून गेले आहेत.

'कोपरा' ह्या हलक्याफुलक्या कथेतील विषय साधाच आहे. निवेदकाच्या कंटाळलेल्या रित्या मनासमोर बाहेरची भरगळलेली दुपार आणि मांजरीसोबत प्रणयक्रिडा करणारा बंड्या बोका आणि हेच, नंतर बदलणारे वातावरण; त्यांनी उभे केले आहे. प्रत्येकाच्या मनातल्या प्रणयातुर कोपऱ्यातली रिती जागा, भरून काढण्याचा हा प्रयत्न आहे.

'आवडा' ही एक भडक कथा आहे अत्यंत कुरूप, बेढब असलेल्या अमा देवदासीची लेक आवडा. अनंतनाना शेणवींचा आधार संपल्यावर निराधार झालेली अमा. तिची भावुक व सामान्य आवडा आणि तिचे कौमार्य घसमुसळेपणाने ओरबाडून भावीण म्हणून पत्करणारा वामनभटजींचा वासू. कामातुर व स्त्रीशरीरासाठी वेडावलेल्या बधीर, दगडी मनाचे आणि भावुक पण स्त्रीशरीराच्या रस्सीखेचीतून निर्माण झालेले द्वंद्व नेरूरकर मांडू पाहतात.

'शोध'मधला 'मी' आहे एक नामवंत शिक्षित व पदवीविभूषित तरुण. आपल्यावर विद्यादानाचे महान उपकार केलेल्या आणि लौकिक आचरणात ढासळत गेलेल्या, मोठ्या मनाच्या निष्ठावंतांचे अधःपतन आणि त्यांच्या शोधासाठी वणवणणारा 'झाला' पारितोषिक विजेता, अस्वस्थ शिवेश्वरकर; याच्या निष्फळ शोधाला त्यांनी कथारूप दिले आहे.

'मी जीनिअस' ही एक आत्मतृप्त असलेल्या किरट्या मनोवृत्तीच्या पण योगायोगानेच मोठेपणा मिळत गेल्याने, आपण महान असल्याचा साक्षात्कार झालेल्या एका लेखकाच्या मानसिक विकृतीला त्यांनी कथारूप दिले आहे. घरादारातल्या साऱ्यांनीच आपल्याला 'जीनिअस' म्हणावे, 'वाङ्मय क्षेत्रातला चिंतामणी' असे अभिधान द्यावे, म्हणून चाललेल्या निरर्गल प्रलापाचे त्यांनी रेखाटन केले आहे.

## 'जाळ' वेगळा विषय

'एका वाड्याची न संपणारी गोष्ट' आणि 'कळ' या चांगल्या कथा आहेत. एका 'बाधिक' वाड्यात वावरणारी प्रेमळ माणसे आणि कमलाकर यांचे सरमिसळ झालेले भावजीवन पहिल्या,तर घरगडी म्हणून राबणाऱ्या 'पांड्या'ची पूर्ण दुर्लक्षित अशी मनोवेदना, त्यांनी दुसऱ्या कथेत नेटक्या शब्दांनी साकार केल्या आहेत. 'जाळ' ही वेगळ्या विषयावरली कथा आहे. उपभोग आणि सत्ता हाच ज्यांचा स्थायीभाव आहे, अशा स्तरातून आलेला आणि मरणाची शिकार बनलेला, सॅनिटोरियमच्या खाटेवर मृत्यूची वाट पाहणारा कान्त, तेथे भेटलेला विश्वजीत रॉय, तेथेच एकदोन दिवसात विझलेली लीला, भेटायला येणारे नातलग आणि मृत्यूची अटळता याचे गभीर सूत्र नेरूरकरांनी हाताळले आहे.

कथासंग्रहाचे शीर्षक बनलेली 'प्रवासिनी' आणि 'बाहुल्या' या दोन कथा शालेय विश्वाचे दर्शन घडवणाऱ्या आहेत. सवलत मिळते म्हणून ठिक-

ठिकाणी, कॉन्फरन्सच्या निमित्ताने, प्रवासाला जाणाऱ्या शिक्षिका, प्रवासिनीमध्ये आहेत. अविवाहित शालू चित्रे आणि सर्वच आघाडीवर तृप्त असलेली सुधी आणि प्रवासात भेटलेले गुंजीकर – एकाकी प्रवास करणाऱ्या शालूच्या भित्र्या पण प्रेमलोलुप मनोवृत्तीला नेरुरकरांनी सहजतेने चित्रित केले आहे. 'बाहुल्या'मध्ये शाळेतली 'स्टॉफ रूम', तेथल्या बहुसंख्य शिक्षका; त्यांचे हेवेदावे, कुतूहलविषय त्यांनी खेळकरपणे मांडले आहेत.

'वाडयाची गोष्ट', 'कळ', 'जाळ' याप्रमाणेच 'एक काळाकूट्ट विदूषक' ही लक्षात राहणारी व चटका लावणारी कथा आहे. श्री. नेरूरकर सर्कसवाल्यासोबत गेली वीस वर्षे स्वदेशातच नव्हे तर देशातही भटकन्ती करीत असतात. त्यातून निर्माण झालेली ही कथा. आपल्या उतार वयात आपले सगळे पूर्वायुष्य आठवणाऱ्या यादवराव विदूषकाची ही व्यथा आहे. वयात न आलेल्या किशोरीवर केलेला बलात्कार, अनेक जणींशी आलेला शरीरसंबंध. सोबतचे दाम्या देशमुख व कृष्णा काखे हे विदूषक, त्यांच्या आयुष्याशी बांधलेले आपले भवितव्य आणि 'ग्रेट सदर्न सर्कस'ची चढती कळा व आपल्या मनातली भळभळती जाब मागणारी जखम अशा विरोधी ताणातून ही कथा निर्माण झाली आहे.

सबंध संग्रहातील बारा कथांपैकी उपरोक्त चार कथा ह्या चांगल्या कथा म्हणाव्या लागतील.

## पसरट, पाल्हाळिक

'प्रवासिनी' या संग्रहाची काही वैशिष्टये काही मर्यादा प्रथम वाचनातच जाणवल्याशिवाय राहत नाहीत. एक म्हणजे बारा कथांपैकी सात कथा या प्रथमपुरुषी निवेदनाचा आश्रय करणाऱ्या आहेत. प्रथम पुरुषी निवेदनाने लेखनात खूप बारीकसारीक तपशील जरी भरता आले, तरी लांबण व पाल्हाळही घुसण्याची शक्यता असते. नेरूरकरांचेही असेच घडले आहे. त्याचे लेखन व चिंतन; पसरट, पाल्हाळिक व त्यामुळे विस्कळीत झालेले दिसते.

श्री. नेरूरकरांचे अनुभवविश्व व्यापक आणि समृद्ध आहे; पण शैली मात्र जुन्या वळणाची आहे. त्यामुळे ते कधीकधी इतके घटक संपृक्तपणे एकत्र आणतात की, मनात काही आकारायला ती वावच देत नाही. अर्थात अशा आलंकारिक शैलीदार लेखनात काही बद्द वाजणारी वाक्येही त्यामुळेच ते लिहून जातात.

१. 'काकी फुलवती होती, फळवती होती. पण काकी मूलवती नव्हती.'

२. 'कोकणातल्या मातीतला त्यांचा पिंड अकोकणातल्या कुठल्या परक्या निर्जीव मातीत मिसळून गेला असेल.'

३. 'आवडा हे नाव होतं म्हणून; नाहीतर आवडा ही सर्वांचीच नावडा होती.'

४. 'मी माझ्या सख्या आजीचा नातू नव्हतो, तितका राधेआजीचा नातू होऊन आजही राहिलो आहे. पुढेही राहीन.'

५. 'जे आजवर शक्य झालं नाही व ज्या कारणामुळे शक्य झालं नाही, त्या कारणामुळंच अशक्य ते शक्य होणं आता कायमचं अशक्य होतं.'

६. आता माझ्या आत्म्याची अलबेली सिंगार करून राहिली आहे. ती मृत्यू-रूपी सजनाच्या घरी जाण्यासाठी. मग तिथे माझी शादी लागेल.'

अशा वाक्यांनी कथासूत्र ठिसूळ होते.

श्री. प्र. श्री. नेरूरकरांचे कथालेखक म्हणून सामर्थ्य खऱ्या अर्थाने ह्या 'प्रवासिनी' संग्रहातून प्रकट झालेच नाही. पण ज्या चार कथा या संग्रहात त्यांनी घातल्या आहेत त्याच त्यांच्या पुढल्या कथालेखनाचा पल्ला सुस्पष्ट करणाऱ्या आहेत. म्हणून त्यांच्या नव्या संग्रहाकडे अपेक्षेने पाहिले पाहिजे. □

प्रवासिनी

प्र. श्री. नेरूरकर

ग. पां. परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई ८

किंमत १० रुपये.

# मार्गदर्शक अभ्यास

जातिनिर्मूलन संस्था व राष्ट्रसेवा दल संस्थांनी सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ व विचारवंत प्रा. डॉ. वि. म. दांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली १९६९–७० साली महाराष्ट्रातील दलित कुटुंबांची केलेली पहाणी या पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्यात आली आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही सामाजिक राजकीय, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील तज्ज्ञांनी जातिसंस्थेच्या विरुद्ध पर्यायी संघटना उभारण्याचे प्रयत्न केले आहेत. शासनाने देखील घटना, कायदा, यांच्या आधाराने दलित समाजाला खास सवलती देऊन जातीयवादाची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या सर्व प्रयत्नांमुळे दलित माजाच्या परि-स्थितीत खरोखरीच काही अमूलाग्र बदल झालेला आहे काय? हा या पहाणीचा मुख्य हेतू आहे. या पहाणी-साठी महाराष्ट्रातील आठ जिल्हे व आठ तालुके व त्यातील २०६ गावे व ४४७५ दलीत व अस्पृश्य कुटुंबांची अभ्यासासाठी निवड केली. गाव पहाणी व कुटुंब पहाणी अशा दोन स्वतंत्र प्रश्नावल्या तयार करून अधिक माहिती मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

दलितांची लोकसंख्या, कुटुंबसंस्था आर्थिक सामाजिक जीवन जगताना येणाऱ्या अडीअडचणी, अस्पृश्यतेचे सार्वजनिक स्वरूप, राजकीय नेतृत्व, दलितांच्याकडे पहाण्याचा समाजाचा दृष्टिकोण या प्रमुख बाबींवर अभ्यास-पूर्ण माहिती गोळा केली आहे.

बहुसंख्य दलितांनी हिंदुधर्माचा त्याग करून बौद्धधर्माचा स्वीकार केलेला आहे; परंतु या पहाणीत धर्मांतरामुळे या लोकांच्या जीवनात सामाजिक, आर्थिक व धार्मिकदृष्टया महत्त्वाचा फरक झाला नसल्याचे आढळून आले. तर केवळ मानसिक समाधानासाठी धर्मांतर ही कल्पना वस्तुस्थितीशी विसंगत वाटते. महार जातिव्यतिरिक्त मांग, चांभार,


भंगी यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार मोठ्या प्रमाणात का केला नाही याचा खुलासा या पुस्तकात नाही. या समाजातील सर्वसामान्य व्यक्ती व सार्वजनिक क्षेत्रातील कार्यकर्ते यांच्या मुलाखती घेतल्या असत्या तर या प्रश्नाचे उत्तर सापडले असते. उद्योगधंद्याच्या निमित्ताने बाहेरगावी गेलेल्यांचा गावकीबद्दलचा अनुभव त्यांचा या प्रश्नाकडे पहाण्याचा दृष्टिकोण याविषयी माहिती गोळा केली असती तर ती अधिक उपयुक्त ठरली असती.

२० व्या शतकात देखील औद्योगिककरण, शिक्षणाचा प्रसार, शहरी जीवनाचा परिणाम, पुरोगामी विचारसरणीचे नेतृत्व, सरकारी सवलती इत्यादींमुळे दलितांचे जीवनमानात थोडाफार फरक पडला असला तरी अस्पृश्यता समूळ नष्ट झालेली नाही हे या पहाणीने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना व कार्यकर्त्यांना हा अभ्यास मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही.

—वा. ना. दुंगार

महाराष्ट्रातील दलित-शोध आणि बोध
डॉ. गोविंद गारे
श्री. शिरूभाऊ लिमये
सहध्ययन प्रकाशन, मुंबई ४०००२८.
पृष्ठे २६३
किंमत १५ रुपये.

आंब्या आंब्यावर लिहीलेले असते चोखणाऱ्याचे नांव!





परंतू आंब्याच्या उत्तम लोणच्यावर लिहीलेले असते फक्त ठाकूरांचेच नांव!!

ठाकूर लोणची, पापड, मसाले, चटण्या.
माहीम मुंबई.

निनाद कलाकेंद्राचा

# आजचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आपल्या सहकार्याची गरज आहे




पुष्पा भावे

'निनाद कलाकेंद्र' हे संस्थेचे नाव मराठी नाट्यरसिकांना नवे आहे. यापूर्वी या संस्थेने इतर कार्यक्रम केलेले असले तरी त्यांचा नाट्यक्षेत्रात हा पहिला प्रवेश आहे. संस्था नाट्यक्षेत्रात नवी असली तरी दिग्दर्शक अच्युत देशिंगकर व इतर नटवर्ग हौशी नाट्यप्रयोगांना जाणाऱ्या प्रेक्षकांच्या परिचयाचे आहेत. 'आजचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आपल्या सहकार्याची गरज आहे' हे लांबलचक शीर्षक प्रथम दर्शनी विलक्षण वाटते. अनेक दैनिकी नाट्यसमीक्षकांनी या शिर्षकाचा काहीसा कुचेष्टेने उल्लेख केलाही होता. परंतु भिन्नभिन्न भाषांतील अनेक नाट्यकृतींच्या शीर्षकाचा विचार करता आज अशी शीर्षके देण्याकडे पुष्कळ कल दिसतो. त्यामागे वर्णनात्मक वा तात्पर्यात्मक शीर्षक टाळण्याचा हेतू असावा. प्रस्तुत नाट्यकृतीला हे शीर्षक काही विशिष्ट हेतूने दिलेले असावे. या नाट्यलेखनामागील हेतू नाट्यप्रयोग व मूळ जीवनानुभव, नाटककार आणि त्याची पात्रे, प्रेक्षक व नाट्यप्रयोग यातील नाते संशोधिण्याचा असल्यामुळे प्रेक्षकांना विश्वासात घेणारे हे शीर्षक अन्वर्थक वाटते.

प्रस्तुत नाट्यकृती मूळ कन्नड असून त्यांचे लेखक 'श्रीरंग (रंगाचार्य जहागिरदार) हे मराठी वाचकांना, प्रेक्षकांनाही परिचित आहेत. 'श्रीरंग' हे वयाच्या दृष्टिकोणातून कालच्या पिढीचे असले तरी त्यांचा नाट्यविषयक दृष्टिकोण अत्याधुनिक आहे. संस्कृत वाङ्मयाचा विशेषतः संस्कृत नाट्यशास्त्राचा व्यासंग आणि आधुनिक पाश्चात्य रंगभूमीचा विलक्षण अभ्यास यातून 'श्रीरंगां'च्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाला आकार आलेला आहे. नाटकाचा आधुनिक भारतीय आविष्कार शोधण्याची त्यांची धडपड त्यांच्या अनेक नाट्यकृतीत दिसते. एका निवेदनात

आजची हौशी रंगभूमी (भारतीय) फार करमणूकप्रधान आहे, केवळ विषय, नेपथ्यादी उपांगे यांचे नवेपण मिरवणारी आहे अशी तक्रार ते करतात. नागेश जोशी यांनी प्रस्तुत कानडी नाटयकृतीचा मराठी अनुवाद केला आहे. पाच-सहा वर्षांत भाषांतराच्या मार्गाने मराठी कलावंतांचा व रसिकांचा हिंदी, बंगाली, कन्नड या भाषेतील रंगभूमीशी जो परिचय होत आहे तो अत्यंत श्रेयस्कर आहे. जरा थांबून आत्मविश्लेषण करता असे लक्षात येईल की इतर भाषेतील प्रायोगिक कृती मराठी प्रायोगिक कृतीपेक्षा नाटयरचनेच्या व कथानकस्वरूप नाकारण्याच्या संदर्भात अधिक धीट आहेत.


'आजचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आपल्या सहकार्याची गरज आहे' या नाटकाचा प्रारंभ नाटयलेखनाच्या त्यामागील प्रश्नांच्या जाणीवेतून होतो. 'लेखक–सूत्रधार' अशी एकच व्यक्ती (अमोल पालेकर) आणि प्रेक्षकातला एक (बाळ कर्वे) यांच्या संवादातून नाटकाविषयीच्या पारंपरिक अपेक्षा आणि खरं नाटय यांतील अंतर स्पष्ट होते. सत्य, खरं, वास्तव या संज्ञातील विरोध नाटयात्मकतेने मांडले जातात. तसे कथासूत्र या नाटकात निमित्तमात्र आहे. रूक्मांगद आणि त्याची पत्नी, रूक्मांगद आणि टायपिस्ट, टायपिस्ट व कामगार पुढारी, रूक्मांगदाची पत्नी व पुढारी या वेगवेगळया नात्यांचा गुंता म्हणजे माणूस काय मानतो, काय बोलतो, कसे वागतो यांतील विसंगतीचे दर्शन आहे. यामुळे नाटयाची रचना काहीशी विस्कळीत वाटते. परंतु हा


शनवारवाडयातील श्रमदान

ब. मो. पुरंदरे

किंमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

विस्कळीतपणा त्या नाट्यानुभावाचा स्वभाव आहे.

अच्युत देशिंगकर या तरुण दिग्दर्शकाने नाटकाचे दृश्यसंकल्पन चाणाक्षपणे केले होते. प्रेक्षक व नाटकातील पात्रांचे नाते सुचविण्यासाठी प्रेक्षकाच्या द्योतराचा 'दशावतरी' पद्धतीचा पडदा म्हणून केलेला उपयोग चतुर होता. अमोल पालेकर व बाळ कर्वे या दोन्ही नटांनी जाणीवपूर्वक संयत अभिनय केला. दिलीप खांडेकर या 'अमृतनाट्यभारती'च्या माजी विद्यार्थ्याने आपली रूक्मांगदाचे अनेक चेहरे दर्शविणारी भूमिका अत्यंत जाणकारीने केली. संपूर्ण शरीर रंगमंचावर लवचिकपणे वापरण्याची त्यांची कुवत यापूर्वीही लक्षात आली होती. 'लोभ नसावा ही विनंती' या नाट्यप्रयोगापासून अनुया पालेकरांची भूमिकेची समज मराठी रसिकांनी टिपली असेल. परंतु त्यांचे शब्दोच्चारण सदोष असायचे. शब्दांच्या उच्चारात अनावश्यक ठिकाणी जिव्हास्पर्श वापरण्याची त्यांची लकब कानांना खटकत असे. परंतु आश्चर्य असे की प्रस्तुत नाट्यप्रयोगात त्यांनी आपल्या शब्दोच्चारावर इष्ट संस्कार केलेले आढळले. दुसऱ्या एका संदर्भात मी कलावंताच्या शरीरयष्टीविषयी लिहिले होते. या नाट्यप्रयोगात अनुया पालेकरांना पाहताना त्यांनी आपली स्थूलतेकडे झुकणारी शरीरयष्टी सावरलेली दिसली. त्याचा त्यांच्या रंगभूमीवरील हालचालींवर योग्य परिणाम झाला होता. रूक्मांगदाची पत्नी व कचेरीतील टायपिस्ट या दोन भूमिका करताना त्यांनी वेषभूषेतील फरकही कमीतकमी वेळात सफाईने दर्शविला. दिलीप कुलकर्णी हा 'रंगायन'चा एक चांगला अभिनेता या नाटकात कामगार पुढाऱ्याची भूमिका करतो. मानसिक ताण व्यक्त करण्यास, आगळे व्यक्तिमत्त्व चित्रित करण्यास सुयोग्य असा चेहरा घेऊन आलेला हा नट कोणतीही छोटी भूमिका समरसून रंगवतो. सुधीर जोशी हे 'कांचेचा चंद्र'च्या व्यावसायिक प्रयोगात छोट्या भूमिकेत पूर्वी दिसले होते. त्यावेळेला अभिनयाला प्रतिकूल असा चेहरा व शरीर घेऊन आलेला नट अशी प्रतिक्रिया झाली होती. परंतु देशिंगकरांनी त्यांच्याकडून अधिक मेहनत करून घेतलेली दिसली. जरा वेगळ्या पद्धतीचे नाटक असल्यामुळे सर्वच कलावंत आतून बावरलेले वाटले. परंतु प्रयोग मात्र कार्यक्षमतेने सादर झाला.

वेगवेगळ्या संस्थांतील कलावंत या निमित्ताने एकत्र आले हाही एक सुयोगच!

• • •

सुलभा ब्रह्मे
शंकरराव खरात
माधव गाडगीळ
रा. प. नेने
आणि

# दलितांचे प्रश्न

शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालयातर्फे ६ मे १९७३ या दिवशी पुण्याला एक परिसंवाद आयोजित करण्यात आलेला आहे. या परिसंवादाचा लाभ 'माणूस'च्या सर्व वाचकांना व्हावा या उद्देशाने परिसंवादात वाचल्या जाणाऱ्या काही निबंधांना येथे पूर्वप्रसिद्धी दिली आहे.

गेल्या वर्षी (८ जुलै १९७२) जुळी मुंबई अंकाचा असाच उपक्रम वरील संस्थेच्या साहाय्याने 'माणूस'ने केला होता हे वाचकांच्या स्मरणात असेलच.

—संपादक

# महाराष्ट्रातील अनुसूचित जातींची आर्थिक स्थिती



सुलभा ब्रह्मे

महाराष्ट्रातील अनुसूचित जाती किंवा हिंदू समाजव्यवस्थेमध्ये परंपरागत 'अस्पृष्ट' मानल्या गेलेल्या जातींचे आर्थिक व सामाजिक स्थान आणि त्यांचो आजची आर्थिक स्थिती याबद्दल थोडक्यात आढावा घेण्याचा प्रस्तुत लेखात प्रयत्न केला आहे.

महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येच्या सुमारे आठवा हिस्सा अनुसूचित जातींच्या लोकांचा आहे. १९७१ मध्ये महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या ५०३ लाख होती. त्यापैकी ६५ लाख लोक बौद्ध व महार, मांग इत्यादी अनुसूचित जातींचे होते*. यामध्ये बौद्ध ५६ टक्के व महार १६ टक्के हे प्रमुख होत अनुसूचित जातींच्या लोकसंख्येमध्ये ह्यांचे एकूण

*प्रस्तुत लेखात उल्लेखाच्या सोई-करता 'अनुसूचित जाती' या वर्गात बुद्ध धर्मीयांचाही समावेश केलेला आहे.

प्रमाण शेकडा ७२ होते तर मांग १५ टक्के, चांभार १०टक्के, ढोर ७टक्के, खाटिक ३ टक्के व भंगी १ टक्का असे प्रमाण आढळले. इतर अनुसूचित जाती एक टक्क्याहूनही कमी असल्याचे आढळले.

सेवाचाकरी हेच महारांचे परंपरागत काम. गावगाड्यातील जमीनीची अनेक कामे महारांना नेमून दिलेली असत. महार हे गावच्या पाटील-कुलकर्ण्यांचे हरकामे शिपाई सरकारी कामानिमित्त ज्या इसमांची गरज लागेल त्यांना बोलावून आणणे, जनन-मरण व गावातील गुन्हे ह्यांची वर्दी पाटील-कुलकर्ण्यांना देणे, काळी-पांढरीतील सरकारी मालमत्ता, झाडे, हद्दनिशाण्या यामध्ये विगाड झाला तर त्याची बातमी पाटील-कुलकर्णी ह्यांना पोचविणे, साऱ्याचा तगादा लावणे अशी जबाबदारीची कामे महारांना नेमून दिलेली असत. त्याबरोबरच, गावचावडीची सफाई, मेलेली जनावरे ओढणे, त्यांचे कातडे काढणे, प्रेताचे सरण वाहणे यासारखी अनेक हलक्या प्रतीची कामे महारांच्या वाट्यास आलेली होती. शिवाय पाटील-कुलकर्णी, देशमुख-देशपांडे, श्रीमंत कुणबी अशा मातबर लोकांकडे गोठे साफ करणे, घरापुढे झाडणे, सरपण पुरविणे यासारख्या घरकीच्या कामासाठीही महार राबविले जात. महारांच्या वाट्याला हलकी कामे असल्याने त्यांची वसाहत गावापासून अलग ठेवणे आणि त्यांचेसाठी पाणीपुरवठ्याची सोय वेगळी करणे हेही परंपरागत चालत आलेले आहे.

पश्चिम महाराष्ट्रामध्ये गावकीच्या कामाबद्दल बहुतेक गावी महारांना वतन म्हणून इनामी जमीन नेमून दिलेली असे, तर मराठवाड्यात वतन जमिनीची प्रथा आढळत नाही. विदर्भामध्ये त्यांच्या कामाबद्दल मुशाहिरा रोखीत निश्चित केलेला आढळतो. महारांची वतनी



जमीन सामान्यत: मध्यम अगर हलक्या प्रतीची असल्याचे आढळते. थोडी व हलक्या प्रतीची जमीन आणि जमीन कसण्याकरता आवश्यक असलेल्या अवजारांची आणि बैलांची वाण ह्यामुळे स्वत: जमीन कसूनही त्यापासून फारसे उत्पन्न मिळणे दुरापास्तच. त्यामुळे महारांचे मुख्य उत्पन्न म्हणजे गावकीच्या निरनिराळ्या कामाबद्दल ठरवून दिलेले बलुते आणि धार्मिक व इतर कार्याचे वेळी जो वाटा मिळे ते त्याचे उत्पन्न होय* सण, दिवस, लग्नकार्य ह्यानिमित्ताने त्यांना वाढण मिळे. याशिवाय लग्नामध्ये वराचा शेला, ग्रहणाचे वेळी धान्य व पैसे, जनावर ओढण्याबद्दल 'घाटा' (२ ते ६ पायली धान्य) इत्यादी उत्पन्नाच्या बाबी असत. गावच्या मुख्य पिकांच्या उत्पादनाचा सुमारे पाच टक्के हिस्सा महारांच्या वाट्याला येत असावा असा अंदाज श्री. त्रि. ना. आत्रे यांनी आपला 'गाव-गाडा'** ह्या पुस्तकात मांडलेला आहे. महारांनी गावाकरता गुलामाप्रमाणे राबावे आणि ह्या गावगुलामीच्या बदल्यात नेमून दिलेले असे रोखीचे उत्पन्न नाही; उलट बलुते आणि इतर किरकोळ वाट्यांची कमाई पदरात पडण्यासाठी मात्र त्यांना दारोदार जाऊन हात पसरावे लागत अशी महारांची गावगाड्यामध्ये दुरवस्था होती.

आज जेथे महारांच्या जमिनी आहेत तेथे काही वेळा औतकऱ्याकडून नांगरट वगैरे करून घेऊन महार जमिनी कसताना आढळतात, तर काही ठिकाणी जमिनी दुसऱ्यास कसावयास दिलेली आढळते. वतनाच्या जमिनीतील हिस्सेदार वाढत गेल्याने जमिनीचे नाममात्र तुकडे महारांच्या वाट्याला राहिलेले आढळतात.*१९५८ पर्यंत महारवतनाचे हक्क जारी असल्याने तोपर्यंत वतनाची जमीन जातीबाहेर जाणे कायद्याने शक्य नव्हते. त्यानंतर मात्र महारांच्या वतन जमिनीही हळूहळू नाहीशा होत चाललेल्या दिसतात विशेषत: कर्जापोटी ह्या जमिनी मोठ्या प्रमाणात गमावल्या गेल्याचे दिसते.

जमिनीप्रमाणेच महारांच्या इतर उत्पन्नातही हिस्सेदार वाढत गेले. एकूण गावकीच्या उत्पन्नातील वाटेकरी वाढत गेल्याने गावकीची पाळी लांबत गेलेली आणि गावकीचे उत्पन्न कमी होत गेल्याचे आढळते. त्यातून जसजसा गावगाडा

---

*महारांच्या काही बलुत्यांची नावे खालील प्रमाणे : सीतादेवी (उभ्या उसाचा भाग), वेशीवरील देणगी, खळ्यावरील दाणे, पेवाच्या तळचे दाणे, ओलीपाती, लगीनटक्का, घरटक्का, हात शेकणे (गुऱ्हाळावरील भट्टीचे बलुते) होळीचा नैवेद्य, दफनाचे खड्डे खणण्याचे पैसे, मृत जनावरांचे अवशेष, गावराखणीचा वर्षाकाठी जोडा इत्यादी. तपशीलासाठी पाहा 'अस्पृष्टांचा प्रश्न' श्री. म. माटे, पुणे, १९३३.

**'गाव-गाडा', त्रि. ना. आत्रे, पुणे, १९१५.

*पाहा, 'महाराष्ट्राची ग्रामीण समाजरचना', त्रि. म. दांडेकर, म. भा. जगताप, पुणे, १९५७.

खिळखिळा होत गेला तसतशी खुद्द गावकीची कामेही कमी होत गेली. उदाहरणार्थ, स्थावरांचे कागद नोंदले गेल्याने हद्दनिशाण्या राखण्याचे काम गेले तर गावोगावी पोष्ट झाल्याने सरकारी लखोटे पोहोचविण्याचे काम मर्यादित झाले. सडका, रेल्वे, तारायंत्रे झाल्याने जासूदकी सुटली, वाटाड्याचे काम संपले. सरकारी पोलीस पाटील आल्याने गावचा गस्त संपली आणि जंगले सरकारी मालकीची झाल्याने सरपण पुरविण्याचे काम सुटले. अशा प्रकारे महारांच्या गावकीच्या कामांचा परिस्थितीजन्य संकोच झाला. १९५६ मध्ये डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली बुद्धधर्म स्वीकारल्यानंतर गुरे ओढणे व त्यांची फाड करणे ह्यासारखी जातिधर्माची गलिच्छ कामे महारांनी मोठ्या संख्येने सोडून दिली आणि गावातील अपमानाचे व लाचारीचे जिणे जगण्याचे नाकारले.

महारांना व्यक्तिगत अशी हक्काची जमीन नव्हतीच. म्हणजेच ग्रामीण अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचे उत्पादनाचे साधन त्यांचेपाशी नव्हते. ग्रामीण अर्थव्यवस्थेत महत्त्व असलेल्या अन्य कारागिरांचे कसबही त्यांचेपाशी नव्हते. थोडक्यात ग्रामीण उत्पादन व्यवस्थेत त्यांना स्थान नव्हते. त्यांच्या परंपरागत सेवाचाकरीचे महत्त्व जसे कमी होत गेले तसा त्यास उदरनिर्वाहासाठी कोणताच व्यवसाय राहिला नाही. त्यामुळे मिळेल तेव्हा शेतमजुरी, बांधबंदिस्ती यासारखी मोलमजुरीची कामे एवढाच खेडोपाडी चरितार्थाचा मार्ग उरला. एवंच ग्रामीण अर्थव्यवस्थेतून ही जात जवळ-जवळ हुसकून काढली गेली. ग्रामीण व्यवसायाबाहेर रेल्वेचे काम, रस्त्याचे काम, लष्कर, पोलीस ह्यातील कनिष्ट कामे आणि काही प्रमाणात गिरणी कामगार ह्या व्यवसायांमध्ये महार शिरलेले आढळतात. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये शिक्षणाच्या सोयी झाल्या. परंतु आर्थिक, सामाजिक अवनत स्थानामुळे शिक्षणाची संधी मिळण, शिक्षण पुरे करणे आणि शिक्षण घेतले तरी नोकरी मिळणे त्यांना कठीण होते. सरकारी नोकरीतील राखीव जागांमुळे शिपाई, शिक्षक, कारकून ह्या व्यवसायांमध्य त्यांना जागा मिळालेल्या आढळतात. परंतु त्यांच्या एकूण कामकऱ्यांमध्ये हे प्रमाण अल्प आहे. बौद्ध व महार कामकऱ्यांमधील सुमारे एक टक्का कामकरी सरकारी नोकरीत असल्याचे आढळते.

अनुसूचित जातींमधील दुसरी महत्त्वाची जात म्हणजे मांग. पारंपारिक अर्थव्यवस्थेमध्ये केरसुण्या, शिंकी, कासरे, नाडे इत्यादी बनविणे, प्रेताची सुतळी पुरविणे, मरी आईची पूजा, डफ वाजविणे, फाशी देणे इत्यादी कामे मांगजमातीच्या वाट्याला आलेली असत. गावगाड्यामध्ये ह्या कामाबद्दल त्यांना ठराविक बलुते मिळत असे. त्यांना वतनाच्या जमिनीची प्रथा आढळत नाही. त्यांच्या पारंपारिक व्यवसायामध्ये काहीही सुधारणा झालेली नाही. घायपात, अंबाडीचे वाख, बांबू

ह्यासारख्या आवश्यक कच्च्या मालाची वाढती चणचण व चढत्या किंमती यामुळे उत्पादन जिकीरीचे होऊ लागले. आधुनिक यंत्रोत्पादित वस्तूंच्या उपलब्धतेमुळे आणि शेतीच्या उत्पादनातील तांत्रिक सुधारणांमुळे. उदाहरणार्थ मोटेच्या ऐवजी ऑईल इंजिनांचा वापर यामुळे त्यांच्या मालाची मागणी घटत जाऊन त्यांचे व्यवसाय हळूहळू बसत चाललेले आढळतात. यामुळे प्रामुख्याने शेतमजूरीवरच त्यांना अवलंबून रहावे लागत आहे.

तिसरा महत्त्वाचा वर्ग म्हणजे चांभार-ढोर यांचा. ढोरांचा व्यवसाय कातडी कमावणे तर चांभारांचे परंपरागत काम कातड्याच्या वस्तू बनविण्याचे आणि दुरुस्तीचे. मोट शिवणे, तिला ठिगळ लावणे, गोफणीला टवळे लावणे, जुना जोडा व आसूड सांधणे यासारख्या कामांबद्दल त्यांना ठराविक बलुते मिळे. चांभारांचे बलुते मुख्य पिकाच्या उत्पादनाच्या सुमारे दोन टक्के असे याशिवाय नवीन जोडा, मोट, आसूड इत्यादी वस्तू चांभार रोखीने विकत. तसेच त्यांना वतनाची जमीनही आढळते. चांभारांजवळ थोडेफार परंपरागत कसब असल्याने चांभारकीच्या धंद्यांतील किमान कमाई त्यांना मिळू शकत आहे, वा चांभारकीच्या आधुनिक उद्योगातही त्यांच्यापैकी काहीजणांनी कामधंदा मिळविलेला आहे. खेड्यांमधून मात्र कच्ची कातडी कमावण्यासाठी बाहेर जात असल्याने आणि थोड्याफार सुधारित पद्धतीने व्यवसाय करावा तर हातात पैसा नाही, अशा स्थितीमध्ये ढोर-चांभारांना तग धरून राहणे बिकट होत आहे.

महार–मांग–चांभार यांच्या आर्थिक स्थितीबद्दल आकडेवारी फारशी उपलब्ध नाही जनगणनेमधून त्यांच्या व्यवसायाबद्दल काही माहिती मिळते. त्यांच्या विविध समस्यांविषयी खास संशोधनात्मक अभ्यास झालेले नाहीत. १९७० साली जाती-निर्मूलन संस्थेमार्फत अस्पृश्यतेची एक पाहणी झाली.* ह्या पाहणीमध्ये महाराष्ट्रातील आठ जिल्ह्यांतील २०६ खेडेगावांमधून माहिती गोळा करण्यात आली. आर्थिक स्थितीबाबतची थोडीफार माहिती ह्या पाहणीतून मिळू शकते. गोखले अर्थशास्त्र संस्थेमार्फत १९५५ ते १९६२ या वर्षांत झालेल्या खेडेगावांच्या पाहणीतून काही माहिती उपलब्ध होते. ह्या माहितीच्या आधारे महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या आर्थिक प्रश्नांचे स्वरूप स्थूलमानाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

१९७१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रामध्ये अनुसूचित जातींची लोकसंख्या सुमारे ६५ लाख होती. त्यातील ५० लाख लोक खेडोपाडी आणि १५ लाख लोक नागर विभागात रहात होते. अनुसूचित जातींमध्ये नागर लोकसंख्येचे

*' महाराष्ट्रातील दलित–शोध आणि बोध ', गोविंद गारे व शिरूभाऊ लिमये, सहाध्ययन प्रकाशन, मुंबई, १९७३. (या अभ्यासाचा पुढे ' दलितांची पाहणी ' म्हणून निर्देश केला आहे.)

प्रमाण २४ टक्के आढळते तर महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येत ३१ टक्के लोकसंख्या नागरी विभागात रहात आहे. म्हणजे अनुसूचित जातींमध्ये अजूनही ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण विभागात अनुसूचित जातींची लोकसंख्या सुमारे १४ टक्के तर नागर विभागात ती सुमारे १० टक्के आणि मुंबईसारख्या महानगरामध्ये फक्त सात टक्के असल्याचे आढळते. नागरीकरणाचेबाबत अनुसूचित जाती किती मागे पडलेल्या आहेत हे ह्या आकड्यांवरून स्पष्ट होईल.

१९७१ च्या जनगणनेचा तपशील अजून उपलब्ध नसल्याने १९६१ च्या जनगणनेतील माहितीचा उपयोग पुढे केला आहे. १९६१ साली अनुसूचित जातींची लोकसंख्या सुमारे ५० लाख होती व त्यापैकी २१ टक्के लोक नागर विभागात रहात होते. नागरी लोकसंख्येच्या प्रमाणात निरनिराळ्या अनुसूचित जातीत तफावत आढळते. २१ टक्के बौद्ध, १४ टक्के महार, १६ टक्के मांग तर २८ टक्के चांभार नागर विभागात होते. भंगी व्यवसाय हा नागर व्यवसाय असल्याने ८८ टक्के भंगी नागर विभागात असल्याचे आढळले. चांभार व्यवसायासही नागर अर्थव्यवस्थेमध्ये वाव असल्याने शहरामधून त्या मानाने त्यांची वस्ती अधिक आढळते. महार–मांगांचे मानाने शहरामध्ये बौद्ध अधिक प्रमाणात आढळतात. याचे एक कारण, शहरातील महारांनी अधिक मोठ्या प्रमाणावर धर्मांतर केले असावे हे असण्याची शक्यता आहे.

अनुसूचित जातींचे १९६१ च्या जनगणनेतील व्यवसायानुसार वर्गीकरण तक्ता क्रमांक १ मध्ये दिले आहे. बौद्धांचे व्यवसायानुसार वर्गीकरण उपलब्ध नसल्याने त्यांचा येथे समवेश केलेला नाही.

तक्ता क्र. १ : महाराष्ट्रातील अनुसूचित जातींचे व्यवसायानुसार विभाजन (१९६१)

| व्यवसाय | सर्व जाती | महार | मांग | चांभार | ढोर | सव अनुसूचित जाती |
|---|---|---|---|---|---|---|
| | (कामकऱ्यांचे शेकडा प्रमाण) | | | | | |
| शेतकरी | ४६.१ | २४.१ | ९.५ | २७.४ | १७.२ | १८.६ |
| शेतमजूर | २३.८ | ५४.४ | ५७.८ | ३१.० | २४.१ | ४८.३ |
| कारागीर | ४.४ | ३.१ | १५.० | २१.१ | ३३.१ | ११.९ |
| कामगार | ६.९ | २.४ | २.२ | ११.१ | ११.३ | ४.६ |
| व्यापार | ४.५ | ०.८ | १.० | १.५ | ३.२ | १.२ |
| सेवानोकरी | ८.५ | ८.८ | ९.१ | ४.५ | ६.६ | ९.९ |
| इतर | ५.८ | ६.४ | ५.४ | ३.४ | ४.५ | ५.५ |
| एकूण | १००.० | १००.० | १००.० | १००.० | १००.० | १००.० |

महार-मांग यामध्ये निम्म्याहून अधिक कामकरी शेतमजूर आहेत. चांभार कामकऱ्यांपैकी २१% पारंपारिक धंद्यात आणि ११% कारखान्यात कामगार आहेत, तर ढोरांमध्ये २१% पारंपारिक धंद्यात व ११% कारखान्यात आढळतात. महार-मांगांपैकी मात्र फक्त २% कामकरी कारखान्यात काम करीत असलेले आढळतात.

अनुसूचित जातींचे व्यवसायानुसार वर्गीकरण एकूण कामकऱ्यांच्या व्यवसायानुसार वर्गीकरणाशी तुलना करता किती मागास स्वरूपाचे आहे हे पुढील तक्त्यावरून लक्षात येते.

तक्ता क्र. २ : महाराष्ट्रातील कामकऱ्यांचे व्यावसायानुसार विभाजन (१९६१)

| व्यवसाय | अनुसूचित जातातील कामकरी | | एकूण कामकरी | |
|---|---|---|---|---|
| | ग्रामीण (शे. प्र.) | नागर (शे. प्र.) | ग्रामीण (शे. प्र.) | नागर (शे. प्र.) |
| शेतकरी | २४·१ | ३·३ | ५७·३ | ५·३ |
| शेतमजूर | ५७·३ | १२·३ | २८·९ | ४·९ |
| कारागीर | ७·० | ७·० | ४·० | ५·८ |
| कामगार | १·१ | १९·५ | १.१ | २७·८ |
| व्यापार | ०·४ | ५·५ | १·४ | १५·८ |
| सेवानोकरी | ५·६ | ३५·८ | ३·७ | २६·३ |
| इतर | ४·५ | १६·६ | ३·६ | १४·१ |
| एकूण | १००·० | १००·० | १००·० | १००·० |

नागर विभागामध्ये एकूण लोकसंख्येपैकी सुमारे २८ टक्के कामकरी कारखान्यात कामगार म्हणून काम करतात तर अनुसूचित जातींच्या नागर लोकसंख्येपैकी १९ टक्के कामकरी कारखान्यामध्ये काम करतात. मुंबईतील एकूण कामकऱ्यांमध्ये कारखान्यांमधील कामगारांचे प्रमाण ३९ टक्के आहे तर अनुसूचित जातींचे मध्ये ते प्रमाण ३१ टक्के आढळते. पुणे शहर व पुणे जिल्ह्यातील इतर नागरकेंद्रे यामध्ये एकूण कामकरी व अनुसूचित जातीतील कामकरी दोहोंतही कारखान्यातील कामगारांचे प्रमाण सारखेच म्हणजे सुमारे २१ टक्के असल्याचे आढळले. अनुसूचित जातींमध्ये सेवानोकरीतील कामकऱ्यांचे प्रमाण अधिक आढळते तर व्यापारधंद्यामध्ये त्यांच्यातील फारच थोड्या कामकऱ्यांचा प्रवेश झालेला दिसतो.

ग्रामीण विभागामध्ये एकूण कामकऱ्यांतील ५७ टक्के कामकरी शेतकरी आहेत तर अनुसूचित जातीत हे प्रमाण २४ टक्के एवढेच आहे. याबाबत महाराष्ट्रातील निरनिराळ्या विभागात बरीच तफावत आढळून येते हे खालील तक्त्यावरून लक्षात येईल.

तक्ता क्र. ३: ग्रामीण कामकऱ्यांमधील शेतकरी व शेतमजूर यांचे प्रमाण

| विभाग | मुंबई | पुणे | मराठवाडा | विदर्भ |
|---|---|---|---|---|
| शेतकरी | (एकूण कामकऱ्यांमध्ये शेकडा प्रमाण) | | | |
| अनुसूचित जाती | ३३·५ | २९·९ | १०·५ | २०·० |
| सर्व जाती | ६२·८ | ६७·४ | ५१·० | ४६·७ |
| शेतमजूर | | | | |
| अनुसूचित जाती | ३४·९ | ४५·७ | ७१·७ | ५४·६ |
| सर्व जाती | २३·२ | १८·१ | ३६·० | ३९·८ |
| अनुसूचित जातींचे एकूण लोकसंख्येतील शेकडा प्रमाण | ७·३ | १२·४ | १७·३ | १७·९ |

मराठवाडा व विदर्भामध्ये अनुसूचित जातींचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण इतर विभागांपेक्षा बरेच अधिक असल्याचे आढळते व यामध्ये बहुसंख्य कामकरी शेतमजूर आहेत. मराठवाड्यामध्ये तर ७२ टक्के कामकरी शेतमजूर आहेत. एकूण कामकऱ्यातही मराठवाड्यामध्ये शेतमजुरांचे प्रमाण बरेच असले (३६ टक्के) तरी अनुसूचित जातींमध्ये ते त्याच्या दुप्पट असल्याचे आढळते.

अनुसूचित जातींपैकी निरनिराळ्या जातीमधील लोक किती प्रमाणात आपापल्या पारंपारिक व्यवसायामध्ये राहिलेले आहेत यासंबंधीची माहिती गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या ग्रामीण पाहणीमधून उपलब्ध होते. त्यावरून असे दिसून येते की सुतार, लोहार, चांभार-ढोर यासारख्या उत्पादकांमध्ये पारंपारिक व्यवसायात अजूनही मोठ्या प्रमाणावर कारागीर टिकून आहेत. कुंभार, सोनार, मांग ह्यासारख्या कारागीरांचे पारंपारिक व्यवसायातील काम त्यामानाने कमी झालेले आढळते. चांभारांमध्ये ६५ टक्के कुटुंबात कातड्याचे काम हा मुख्य व्यवसाय व १५ टक्के कुटुंबात तो दुय्यम व्यवसाय म्हणून आढळला, तर ढोरांच्या बाबतीत सुमारे ७५ टक्के कुटुंबात कातडी कमावण्याचा व्यवसाय हाच अजूनही मुख्य व्यवसाय आढळला. मांगांपैकी सुमारे २५ टक्के कामकऱ्यांमध्ये त्यांचे पारंपारिक काम मुख्य व्यवसाय म्हणून आढळले. त्यामानाने दुय्यम व्यवसाय म्हणून हा व्यवसाय अधिक प्रमाणात (३५ टक्के) टिकून राहिलेला दिसतो. बहुसंख्य मांगांचेबाबत शेतमजुरी हाच मुख्य व्यवसाय झालेला आढळतो. महारांच्या पारंपारिक व्यवसायाचे आज काहीच महत्त्व राहिलेले नाही. फक्त दोन ते चार टक्के महार गावकीचे काम

## तक्ता क्रमांक : ४* अनुसूचित जातीतील जमीनधारकांचे मालकीच्या जमिनीच्या क्षेत्रफळानुसार विभाजन

| जिल्हा | नासिक | धुळे | जळगाव | अमरावती | बीड | कोल्हापूर | सातारा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मालकीच्या जमिनीचे क्षेत्रफळ (एकर) | जमीनधारकांचे शेकडा प्रमाण | | | | | | |
| १ एकर पर्यंत | ६·७ | २·१ | १·५ | ०·४ | ६·२ | ६०·५ | २०·१ |
| १·० ते २·४ | २४·० | २६·३ | १८·३ | २७·७ | १८·६ | २४·३ | ४२·४ |
| २·५ ते ४·९ | ३३·२ | २६·३ | १७·६ | ३९·३ | २०·६ | ८·९ | २१·७ |
| ५·० ते ७·४ | २३·२ | २४·२ | २४·४ | १७·९ | २१·६ | ४·३ | ७·८ |
| ७·५ ते ९·९ | ६·७ | ९·४ | ११·५ | ५·८ | १५·५ | १·३ | ३·५ |
| १० एकर किंवा अधिक | ६·२ | ११·७ | २६·७ | ८·९ | १७·५ | ०·९ | ४·५ |
| सरासरी क्षेत्रफळ | ४·४ | ४·९ | ७·६ | ४·५ | ५·८ | १·३ | २·७ |
| अनुसूचित जातीमध्ये शेतकऱ्यांचे शेकडा प्रमाण | ३८·० | २३·० | १४·० | २५·० | ९·० | ३५·० | ३०·० |

* दलितांच्या पाहणीमध्ये गोळा केलेली माहिती उपलब्ध करून दिल्याबद्दल डॉ. गारे व श्री लिमये यांचे आभारी आहोत.

करताना आढळले. शेती व शेतमजुरी हेच त्यांचे आजचे प्रमुख व्यवसाय. इतर अनुसूचित जातींच्या मानाने महार कामकऱ्यांच्या व्यवसायामधे अधिक विविधता आढळते. महारांनी ग्रामीण विभागामध्ये सुतारकी, शिपीकाम, न्हावीकाम ह्या व्यवसायांमध्ये थोडाफार शिरकाव केलेला आढळतो. तसेच नोकरीमधीलही त्यांचे प्रमाण अधिक असल्याचे आढळते.

अनुसूचित जातींमध्ये शेतकऱ्यांचे प्रमाण जरी सुमारे २५ टक्के असले तरी त्यांच्याकडे असलेल्या जमिनीचे प्रमाण पाहता त्यांच्या आर्थिक जीवनात शेती व्यवसायाचे स्थान किती गौण आहे हे लक्षात येईल. दलितांच्या पाहणीमधील यासंबंधीची आकडेवारी उदबोधक आहे (पाहा तक्ता क्र ४) (पृ. ४६ वर)

अनुसूचित जातीमध्ये पाच एकरापेक्षा कमी जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण सातारा, कोल्हापूर जिल्ह्यात ८० टक्क्यांहून अधिक तर नाशिक, अमरावती जिल्ह्यात सुमारे दोन तृतीयांश इतके आढळले. जळगाव, बीडमध्ये हे प्रमाण ४० टक्क्यांचे आसपास आहे, परंतु या जिल्ह्यात अनुसूचित जातीमध्ये शेतकऱ्यांचे प्रमाण अल्प आहे. गावातील एकूण जमिनीपैकी फार थोडी जमीन ही महार, चांभार, ढोर आदींच्या मालकीची आढळते. मराठवाड्यामध्ये तर हे प्रमाण नाममात्र आहे. इतर भागातून गावातील एकूण जमिनीच्या साधारण दोन ते चार टक्क्यापर्यंत जमीन अनुसूचित जातीकडे असल्याचे आढळते. गावातील इतर शेतकऱ्यांच्या मानाने महार-चांभार आदीकडे असलेल्या जमिनीचे सरासरी क्षेत्रफळ निम्म्याने किंवा त्याहूनही कमी असल्याचे गोखले अर्थशास्त्र संस्थने केलेल्या ग्रामीण पाहणीवरून आढळून येते. तसेच स्वतः जमीन न कसणाऱ्यांचे प्रमाण इतरापेक्षा बरेच अधिक असल्याचे आढळते. अनुसूचित जातीतील एकूण जमीनधारकांपैकी २० ते ४० टक्के जमीनधारकांनी जमीन खंडाने दिलेली आढळते. जमिनीचे फार लहान लहान तुकडे, बैल व अवजारांचा अभाव ही जमीन स्वतः न कसण्याची प्रमुख कारणे होत. याशिवाय कामधंद्यासाठी परगावी जावे लागल्यामुळे जमीन खंडाने दिलेली आढळते. खंडाचे उत्पन्न मात्र नाममात्रच येते. अशा रितीने अनुसूचित जातीतील शेतकऱ्यांचे शेतीव्यवसायापासूनचे उत्पन्न मर्यादित आहे व ह्या सर्वांचा प्रमुख व्यवसाय म्हणजे शेतमजुरी. एकूण उत्पन्नातील सुमारे २५ टक्के उत्पन्न शेतीपासून तर ४० ते ५० टक्के उत्पन्न शेतमजुरीचे असल्याचे दलितांच्या पाहणीमध्ये आढळून आले. शेतमजुरीचे निकृष्ट दर, कामाची अनिश्चितता आणि कामाचे मर्यादित दिवस यामुळे शेतमजुरीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांना अत्यंत अपुरे उत्पन्न मिळते. १९७० सालातील उत्पन्नासंबंधीची दलितांच्या पाहणीतील आकडेवारी तक्ता क्र. ५ मध्ये दिली आहे.

तक्ता क्र. ५ : अनुसूचित जातीतील कुटुंबांचे वार्षिक उत्पन्नानुसार विभाजन

| वार्षिक उत्पन्न (रुपये) | कुटुंबांचे शेकडा प्रमाण |
| --- | --- |
| ५०० पर्यंत | २५.४ |
| ५०१ ते ७०० | १७.९ |
| ७०१ ते १००० | २२.६ |
| १००१ ते १५०० | १४.४ |
| १५०१ ते २००० | ७.५ |
| २००१ ते ३००० | ७.३ |
| ३००१ च्या पेक्षा अधिक | ५.९ |
| एकूण | १००.० |

अनुसूचित जातीतील कुटंबांचे सरासरी वार्षिक उत्पन्न सुमारे ११६० रुपये आढळले' एकूण कुटुंबापैकी सुमारे दोन तृतीयांश कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न एक हजार रुपयापेक्षा कमीच होते दरडोई वार्षिक उत्पन्न २०० रुपये आढळले. किमान जीवनमानाठी दरडोई वार्षिक सुमारे ३३० रुपये उत्पन्नाची आवश्यकता धरल्यास ग्रामीण विभागात सुमारे ४० टक्के कुटुंबांना किमान आवश्यक उत्पन्नापेक्षा कमी उत्पन्न मिळत असल्याचे आढळते. हेच प्रमाण अनुसूचित जातींच्या बाबतीत ७० टक्क्यांचे वर असल्याचे दिसते. इतर ग्रामीण कुटंबाशी तुलना करता अनुसूचित जातींचे राहणीमान सरासरीने निम्म्या पातळीवर किंवा त्याहूनही निकृष्ट असल्याचे दिसून येते.

अनूसूचित जातींमध्ये उत्पादनाच्या साधनांचा अभाव, कसब व शिक्षणाचा अभाव आणि अवनत सामाजिक स्थान यामुळे ते काही मर्यादित स्वरूपाच्याच व्यवसायांमध्ये शिरकाव करू शकतात आणि अशा व्यवसायांमध्ये उत्पन्नाची पातळी निकृष्ट असल्याने त्यांचे राहणीमानही निकृष्ट राहिलेले आहे. ह्या दृष्टीने अनुसूचित जातींच्या प्रगतीसाठी झालेल्या प्रमुख मागण्या म्हणजे शिक्षणविषयक सोयी-सवलती. उदा. फीमधील सवलत, विद्यावेतन, वसतीगृहांची सोय. याबाबत शासनाने काही प्रमाणात सोयी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. परंतु अनुसूचित जातींमधील कुटुंबांना आपल्या मुलांच्या शिक्षणाचा खर्च झेपणे कठीण होते. एक तर फीची सूट मिळाली तरी शिक्षणाबरोबर कपडे, पुस्तके इत्यादींचा खर्च करणे शक्य नसते. निकृष्ट आर्थिक परिस्थितीमुळे अर्थार्जनासाठी मुलांच्या मदतीची जरूर असल्यानेही मुलांना शिक्षण देणे परवडत नाही. घरामध्ये शिक्षणाची परंपरा नसल्याने अभ्यासात मदत करणे अशक्य

असते. अशा अडचणींमुळे मुलांना अनेकदा शिक्षण घेणे जमत नाही किंवा शिक्षण अर्धवट सोडावे लागते.

अनुसूचित जातींमध्ये शिक्षणाचा प्रसार कसा होत आहे याविषयी महाराष्ट्राच्या निरनिराळ्या विभागातील खेड्यांमध्ये* केलेल्या पाहणीवरून काहीशी कल्पना येते. (पाहा तक्ता क्र. ६)

**तक्ता क्र. ६ : महाराष्ट्रातील शिक्षणाची प्रगती**

| | पुरुष | | स्त्रिया | |
|---|---|---|---|---|
| | शिक्षितांचे एकूण लोकसंख्येत शे. प्रमाण | ७ वी इयत्ता किंवा अधिक शिक्षण (शिक्षितात शे. प्रमाण) | शिक्षितांचे* एकूण लोकसंख्येत शे. प्रमाण | ७ वी इयत्ता किंवा अधिक शिक्षण (शिक्षितात शे. प्रमाण) |
| सर्व जाती | | | | |
| १९५४–५७ | ५८·६ | ७·१ | २७·७ | १·२ |
| १९६०–६३ | ६५·० | ११·८ | २८·५ | ४·५ |
| अनुसूचित जाती | | | | |
| १९५४–५७ | ३९·८ | २·४ | ८·७ | १·० |
| १९६०–६३ | ४८·५ | ५·९ | १२·५ | २·४ |

* ४ वर्षांवरील लोकसंख्येत.

* पाहणी केलेली खेडी पुढीलप्रमाणे : मिठबाव (ता. देवगड, जि. रत्नागिरी), वाघोदे (ता. रावेर, जि. जळगाव), पुसेगाव (ता. खटाव, जि. सातारा), कसबे सुकेणे (ता. निफाड, जि.नाशिक), धाड (ता. चिखली, जि. बुलढाणा), मुरुड (ता. लातूर, जि. उस्मानाबाद), बोरी (ता. जिंतूर, जि. परभणी) या खेड्यांतून प्रथम पहाणी १९५४–१९५७ ह्या दरम्यान झाली व पुनर्पाहणी १९६०–१९६३ ह्या दरम्यान झाली.

१९६१ च्या जनगणनेनुसार निरनिराळ्या अनुसूचित जातींमध्ये शिक्षणाचा प्रसार किती प्रमाणात झालेला आहे यासंबंधीची माहिती तक्ता क्र. ७ मध्ये दिलेली आहे. (पृ. ५० पाहा)

अनुसूचित जातींमध्ये शिक्षणाचा प्रसार होत आहे; तरी इतर जातींचे मानाने अनुसूचित जातीतील लोक अजून फार मागे आहेत. तसेच सुशिक्षितांच्या संख्येच्या मानाने नोकऱ्यांची संख्या

तक्ता क्र. ७ : महाराष्ट्रातील साक्षरांचे प्रमाण (१९६१)*

| | साक्षर एकूण (शे. प्र.) | साक्षर पुरुष (शे. प्र.) | साक्षर स्त्रिया (शे. प्र.) |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र राज्य | २९·८ | ४२·० | १६·८ |
| अनुसूचित जाती | १५·८ | २५·५ | ५·७ |
| महार | १५·७ | २५·७ | ५·३ |
| मांग | १०·० | १७·० | २·५ |
| चांभार | २१·० | ३२·९ | ९·० |
| ढोर | २७·१ | ४०·८ | १३·७ |
| भंगी | २६·८ | ४०·१ | ११·२ |

*१९७० सालच्या दलितांच्या पाहणीत १४ वर्षे वयावरील लोकसंख्येत ४४ टक्के पुरुष आणि ८ टक्के स्त्रिया साक्षर असल्याचे आढळते व दर हजारी फक्त चार व्यक्ती शालान्त शिक्षणापुढील शिक्षण घेतलेल्या असल्याचे आढळते.

फार मर्यादित असल्याने शिक्षण घेऊनही उपजीविकेच्या समस्या सुटत नाहीत. इतर शिक्षितांशी स्पर्धा करून नोकरी मिळविणे जवळ जवळ अशक्य असल्याने नोकरीमध्ये काही जागा अनुसूचित जातींसाठी राखीव ठेवलेल्या आहेत. एकूण नोकरी शोधणाऱ्यांच्या संख्येच्या मानाने त्या कमी आहेत. त्या भरल्या जाण्यातही अनेकदा अडचणी उपस्थित होतात. पैशाचे बळ नसल्याने नोकरी शिवाय व्यापार-धंदा अशा अन्य कोणत्याही व्यवसायामध्ये शिरकाव होणे अशक्य आहे. त्यामुळे नोकरीशिवाय नागरी विभागात तरणोपाय नाही. परंतु सरकारी नोकरीतील थोडयाफार राखीव जागांमुळे फक्त थोडया जणांच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटू शकणार. मुख्य प्रश्न बहुसंख्येने ग्रामीण विभागात राहणाऱ्या दलितवर्गाच्या दुरवस्थेचा आहे.

महाराष्ट्राच्या लोकसंख्येमध्ये अनुसूचित जातींचे प्रमाण १२·७ टक्के, महाराष्ट्रातील कामकऱ्यांमध्ये १३·५ टक्के तर शेतकऱ्यांमध्ये फक्त सहा टक्के आहे. अनसूचित जाती आणि जमाती लक्षात घेतल्या तर महाराष्ट्रातील एक पंचमांश मनुष्यबळ त्यांचे आहे आणि समाजातील ह्या दुर्लक्षित आणि दडपलेल्या वर्गातील लोकांमधून शेतमजुरांचा मोठ्या प्रमाणात भरणा होत असून शेतमजुरातील त्यांचे प्रमाण ४१·३ टक्के एवढ आहे.

ग्रामीण भागातील तळचा वर्ग, शेतमजुरांचा, भूमिहीनांचा वर्ग, यांनाही देशातील आर्थिक विकासाच्या कार्यक्रमात सामावून घेण्याच्या उद्दीष्टाने

भूमिहीनांना जमीन वाटप करण्याच्या घोषणा गेली वीस वर्षे होत आहेत, यामध्ये काही राज्यांतून दलितांना अग्रक्रमही जाहीर झालेले आहेत. परंतु भूमिहीनांना देण्यासाठी जमिनी उपलब्ध कोठून होणार ही महत्त्वाची अडचण ह्या कार्यक्रमामध्ये येते. सरकारी पडजमिनी, कमाल मर्यादिपर्यंतच्या जमिनी शेतमालकांकडे ठेवून त्यांनी सोडलेले निकृष्ट जमिनीचे काही तुकडे अशासारख्या हलक्या जमीनीच प्राय: वाटपासाठी उपलब्ध होतात. गरजेच्या मानाने उपलब्ध होणाऱ्या जमिनी नाममात्रच. आणि त्याही निकृष्ट असल्याने त्या सुधारण्याची ऐपत भूमिहीनांसारख्या गरीब वर्गाकडे कोठून असणार? परिणामी त्यांना शेतमजुरीवरच अवलंबून रहावे लागत आहे.

ग्रामीण विभागातील आर्थिक, राजकीय सत्ताधारी आणि अनुसूचित जाती जमाती यांच्यात जवळीक नाही. परिणामी या वर्गांना समाजाच्या वेशीबाहेरच ठेवले जात आहे. जमिनीसारख्या महत्त्वाच्या उत्पादन साधनात त्यांना भागीदारी मिळू शकत नाही. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत त्यांना स्थान नाही. परतु ग्रामीण चौकटीतील आर्थिक-सामाजिक पिळवणुकीतून बाहेर पडण्याची कुवत त्यांचेजवळ आज नसल्यामुळे त्यांचा विकास खुंटलेला आहे.

वास्तविक हा प्रश्न फक्त अनुसूचित जातींचाच नाही तर ग्रामीण विभागातील सर्व शोषित वर्गाचा आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये स्थान नसणारे शेतमजूर, लहान शेतकरी, कारागीर अशा सर्व वर्गांची ही समस्या आहे. परंतु आज सामाजिक तणावामुळे समान हितसंबंध असलेले दलित आणि अन्य शोषित यांची एकजूट होत नाही. ह्या सर्व अन्यायाचे मूळ शोषणाधिष्ठित अर्थव्यववस्थेमध्ये आहे आणि आर्थिक सत्तेचे मक्तेदार हे राजकीय–सामाजिक सत्ताधारी आहेत हे शोषित वर्गांनी जाणले पाहिजे. आर्थिक व राजकीय मक्तेदारी मोडण्यासाठी सर्व शोषितांची अशी एक भक्कम फळी उभारली पाहिजे. स्वतंत्र भारताचा नागरिक म्हणून जगण्याचा, स्वाभिमानाने श्रम करून पोट भरण्याचा आणि श्रमातून निर्माण होणाऱ्या संपत्तीचा विनियोग कसा करावा, याबाबत निर्णय घेण्याचा आपला हक्क प्रस्थापित केला पाहिजे हेच दलित-शोषितांच्या चळवळीचे उद्दिष्ट होय.

● ● ●



# स्वातंत्र्याच्या काळातील अस्पृश्यांचा, दलितांचा प्रश्न

आपल्या स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत अस्पृश्यता नष्ट करण्यासंबंधीच्या खास तरतुदी आहेत. त्याचप्रमाणे अस्पृश्यवर्ग–दलितवर्ग यांच्या प्रगतीसाठीही खास तरतुदी आहेत. या संबंधित तरतुदीने अस्पृश्यांचा–दलित वर्गांचा प्रश्न सुटला आहे का? या तरतुदीने 'अस्पृश्यता' नष्ट झाली आहे का? या प्रश्नांचे उत्तर स्पष्टपणे द्यावयाचे म्हणजे 'अद्यापही राज्यघटनेमुळे अस्पृश्य वर्गांचा–दलित वर्गांचा प्रश्न सुटला नाही.' असेच स्पष्ट उत्तर द्यावे लागते. त्याची कारणमीमांसा अशी :–

## अस्पृश्यांची–दलितांची अवस्था

'अस्पृश्यता' ही भारतीय हिंदुसमाजाला शतकानुशतके लागलेली समाजघातकी, राष्ट्रघातकी कीड आहे. 'अस्पृश्यता' हा सामाजिक विषमतेचा अर्क आहे. एक वर्ग दुसऱ्या वर्गाला

शंकरराव खरात

कोणत्या अवस्थेप्रत नेऊ शकतो, याचे एक हिडीस व भेसूर चित्र म्हणजेच 'अस्पृश्यता' होय. भारतात अस्पृश्यतेच्या भयानक गुलामगिरीत कोट्यावधी जीव खितपत पडलेले आहेत. अस्पृश्यतेच्या आगीत एका मोठ्या मानव–अस्पृश्यवर्गाचे दैनंदिन जीवन शेकडो वर्षांपासून होरपळत आहे. अस्पृश्यतेच्या भयानक गुलामगिरीमुळे अस्पृश्यवर्ग सामाजिकदृष्ट्या हीन बनला; आर्थिकदृष्ट्या दरिद्री झाला; राजकीयदृष्ट्या वरिष्ठांचा सेवकचाकर बनला; आणि शिक्षण-संस्कृतीपासून तो कायमचा दूर फेकला गेला अशी ही भारतीय अस्पृश्य दलितवर्गाची पूर्वीपासूनची अवस्था आहे

अस्पृश्यवर्गाची ही भयानक आणि हृदयद्रावक अवस्था पाहून त्यांना अस्पृश्यतेच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी, त्यांची सर्वांगीण प्रगती करण्यासाठी म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. गांधी व इतर काही थोर पुरुषांनी आपापल्या मार्गाप्रमाणे भगीरथ प्रयत्न केले. आजही अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम चालू आहेच.

## राज्यघटनेतील योग्य त्या तरतुदी

स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेतील आर्टिकल (कलम) १७ प्रमाणे 'अस्पृश्यता (Untouchability) नष्ट केलेली आहे; आणि अस्पृश्यता जो व्यवहारात पाळील त्याला कायद्याप्रमाणे शिक्षा होईल,' असे स्पष्ट केले आहे. राज्यघटनेच्या आर्टिकल (कलम) १५ प्रमाणे (१) कोणत्याही नागरिकाविरुद्ध केवळ, धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान यांच्यापैकी कोणत्याही आधारावर राज्य भेद-भाव (विभेद) करणार नाही. (२) कोणताही नागरिक केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान यांच्या अथवा यापैकी कोणत्याही आधारावर [क] दुकाने, सार्वजनिक उपहारगृहे, पथिक-निवास आणि सार्व-



जनिक करमणुकीची स्थाने यात प्रवेश; अथवा [ ख ] राज्यनिधीतून पूर्णत: वा अंशत: प्रतिफलित अथवा सर्वसाधारण जनतेच्या उपयोगाकरिता समर्पित अशा विहिरी, तलाव, स्नानघाट, रस्ते आणि सार्वजनिक गमनागमन स्थाने यांचा उपयोग, यांच्या संबंधात कोणतीही निर्योग्यता, निबंधन अथवा शर्त यांच्या आधीन असणार नाही. इ. इ.

आर्टिकल २९ प्रमाणे (२) राज्याकडून प्रतिपालित अथवा राज्यनिधीतून सहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणाही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात, भाषा, यांच्या अथवा यापैकी कोणत्याही आधारावर प्रवेश नाकारला जाणार नाही.

आर्टिकल ४६ प्रमाणे, 'अस्पृश्य (शेड्यूल्ड कास्टस), आदिवासी (शेड्यूल्ड-ट्राईब्ज) आणि इतर कमकुवत वर्ग (Weaker Section) यांची शैक्षणिक व आर्थिक प्रगती करण्याच्या दृष्टीने राज्यसरकार काळजी घेईल' असे मार्गदर्शक तत्त्वां (Directive principles) प्रमाणे मान्य केले आहे.

आर्टिकल (कलम) ३३० प्रमाणे, अस्पृश्य व आदिवासी (Scheduled castes and scheduled tribes) या जाती-जमातींना लोकसभेत राखीव जागा ठेवलेल्या आहेत.

आर्टिकल (कलम) ३३२ प्रमाणे अस्पृश्य (शेड्यूल्ड–कास्टस) व आदिवासी (शेड्यूल्ड–ट्राईब्ज) या जाती-जमातींना प्रत्येक राज्याच्या विधानसभेत राखीव जागा ठेवलेल्या आहेत.

आर्टिकल (कलम) ३३५ प्रमाणे मध्यवर्ती व राज्य सरकारी खात्यात, शासनयंत्रणेतील कार्यक्षमता राखली जाईल हे मान्य करूनच, अस्पृश्य व आदिवासी यांचा नोकरीतील हक्काचा विचार केला जाईल.

(टीप–या आर्टिकलला धरूनच मध्यवर्ती व राज्यसरकारांनी अस्पृश्य व आदिवासी या वर्गाला नोकरीत राखीव जागा ठेवलेल्या आहेत.)

आर्टिकल (कलम) ३३८ प्रमाणे अस्पृश्य व आदिवासी या जातीजमातीचे, यांना दिलेल्या हक्काचे योग्यरीतीने संरक्षण होते का नाही, हे पाहून त्यावर राष्ट्रपतींना 'अहवाल' सादर करण्यासाठी 'अस्पृश्य' व 'आदिवासी–खास अधिकारी' यांची नेमणूक राष्ट्रपतींनी करावयाची आहे. या खास अधिकाऱ्यांचे 'अहवाल' लोकसभेपुढे ठेवले जातील.

आर्टिकल ३४० प्रमाणे 'मागासलेल्या वर्गासंबंधी चौकशी करून योग्य तो रिपोर्ट करण्यासाठी एक कमिशन नेमण्याची तरतूद आहे.'

आर्टिकल ३३४ प्रमाणे ३३० व ३३२ आर्टिकलप्रमाणे अस्पृश्य व आदिवासी यांना लोकसभेत, राज्यविधानसभेत असलेल्या राखीव जागांची मुदत घटनेच्या अंमलापासून वीस वर्षांपर्यंत ठेवलेली आहे.

(टीप: ही मुदत पुढे दुरुस्ती करून वाढवली आहे.)

भारताच्या राज्यघटनेत अस्पृश्यवर्ग व आदिवासी या जाती-जमातींना वरील

आर्टिकलप्रमाणे दिलेली खास संरक्षणे थोडक्यात नमूद केलेली आहेत.

**अस्पृश्यता नष्ट करणारा कायदा :**

राज्यघटनेतील १७ आर्टिकल (कलमातील) मधील उद्दिष्टचे प्रत्यक्षात उतरविण्यासाठीच भारत सरकारने अस्पृश्यता नष्ट करणारा The untouchability (offences) Act 1955, (अस्पृश्यता (गुन्हे) कायदा १९५५), पास करून ता. ८ मे १९५५ रोजी राष्ट्रपतींची या कायद्याला संमती मिळाल्यावर अंमलात आला. या अस्पृश्यता निवारण करणाऱ्या कायद्याने प्रत्यक्ष व्यवहारात-पदोपदी दिसणारी व पाळली जाणारी अस्पृश्यता नष्ट केलेली असून, या कायद्यातील कलमांनी अस्पृश्यता पाळणे, अस्पृश्यता मानणे, अस्पृश्यता पाळण्यास मदत करणे, इत्यादि स्वरूपाची कृत्ये गुन्हे मानले असून, त्यासाठी कायद्याने शिक्षा किंवा दंड, किंवा दोन्हीही शिक्षा देण्याची तरतूदही त्यात केलेली आहे. या कायद्यातील कलमे :– ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ही महत्वाची आहेत. या कलमातील तरतुदींनी व कायद्याने तरी पूर्णतया अस्पृश्यता नष्ट केलेली आहे.

१९५५ चा अस्पृश्यता नष्ट करणारा हा कायदा देशव्यापी स्वरूपाचा आहे. पण हा अस्पृश्यता नष्ट करणारा कायदा अमलात येतो का? प्रत्यक्ष व्यवहारात या कायद्याची अंमलबजावणी होते का? हा प्रश्न महत्वाचा असून, त्याचे स्पष्ट उत्तर 'नाही' असेच द्यावे लागते.

भारतीय राज्यघटनेच्या आर्टिकल ३३८ प्रमाणे शेड्यूल्ड कास्टस, व शेड्यूल्ड ट्राईब्ज कमिशनर यांचे १९५०–५१ पासून ते आजपर्यंतचे वार्षिक अहवाल पाहिल्यावर, आजही खेडोपाडी अस्पृश्यतेचे स्वरूप कसे अस्तित्वात आहे याची पूर्ण कल्पना येते. त्यादृष्टीने या खास नेमलेल्या अधिकाऱ्यांचे आजपर्यंतचे अहवाल पाहून, अस्पृश्यता निवारणार्थ केलेल्या कायद्याची खेडोपाडी कशी अवस्था होते हें पूर्ण कळते. त्याप्रमाणे अस्पृश्य-वर्गांना घटनेने व इतर अन्य कायदे-कानूनें दिलेली संरक्षणे-सवलतीही अमलात येतात का नाही हे कळतें. या सरकारी अहवालाप्रमाणेच इतर बिन-सरकारी संस्थाचे कामासबंधीचे अहवाल पाहिले तरी 'आजच्या अस्पृश्यतेच्या अस्तित्वाची, त्यांच्या प्रश्नाची पूर्ण कल्पना येते' यादृष्टीने या अहवालाना महत्त्व आहे

आजही अस्पृश्यता नष्टे करण्याच्या संबंधातील राज्य घटनेतील कलमे, आणि १९५५ च्या अस्पृश्यता नष्ट करणाऱ्या कायद्याची कलमे यांना ग्रामीण भागातील खेडोपाडी प्रवेश मिळालेला नाही. याचे प्रत्यंतर भारतात खेडोपाडी अस्पृश्य-दलित व बौद्धांच्यावर होणाऱ्या भयंकर स्वरूपाच्या अत्याचार, अन्याय, व छळांच्या प्रकारांवरून येते.

**अत्याचार**

भारतात खेडोपाडी होणाऱ्या अत्याचाराचे थोडक्यात स्वरूप असे आहे–

१. अस्पृश्य-दलित वर्गीय कुटुंबाना घरात डांबून त्याना जाळणे २. एका एका अस्पृश्य व्यक्तीला जिवंत जाळणे ३. बौद्ध व दलीत व्यक्तीचे खून करणे ४. अस्पृश्य, दलित व बौद्धांची घरे पेटवणे ५. दलीत व बौद्ध स्त्रियांची वस्त्रे फेडणे, त्यांना नग्न करणे; त्यांना मारहाण करून नग्नावस्थेत त्यांची भर दिवसा रस्त्यातून धिंड काढणे. स्त्रियांच्यावर बलात्कार, अत्याचार करणे, व त्यांचा विनयभंग करणे, ६. दलीत व बौद्धांना मारपीट करणे, त्यांना जीव घेण्याच्या धमक्या देणे. ७. बौद्ध व दलितांच्या विहिरीत विष्टा टाकणे; इतर घाण पदार्थ व मेलेली मांजरी-कुत्री, त्यांची हाडे विहिरीत टाकून पिण्याचे पाणी घाण करणे. ८. त्यांच्या शेतातील-जमिनीतील उभी पिके कापून नेणे. ९. दलित व बौद्ध यांच्यावर ते केवळ सुधारणेच्या मार्गाने, आधुनिक युगाच्या मार्गाने–स्वतंत्र नागरिक म्हणून वागतो म्हणून त्यांच्यावर अत्याचार होतात. त्यांच्यावर सामुदायिक-बहिष्कार टाकला जाऊन त्यांच्या दैनंदिन-जीवनाची कोंडी केली जाते. १०. बौद्ध व अस्पृश्यानी गावात अस्पृश्य म्हणूनच वागावे व जगावे आणि स्पृश्य हिंदू गावकऱ्यांची रूढीबद्ध कामे करावीत असे त्यांच्यावर बंधन आणणे. ११. बौद्ध व दलितांना स्वतंत्र भारताचा स्वतंत्र नागरिक म्हणून त्यांना गावात वागू न देता त्यांच्या नागरिक स्वातंत्र्यावर दांडगाईने बंधने आणून, त्यांच्या व्यक्तिगत स्वातंत्र्याचा कोंडमारा करणे. बौद्ध व दलितांना हॉटेलात मुक्त प्रवेश नाकारणे. सार्वजनिक विहिरीवर त्यांना पाणी न भरू देणे. गावातील सार्वजनिक रस्त्याने त्यांच्या लग्नाची वा अन्य उत्सवप्रसंगाची मिरवणूक नेऊ न देणे. अस्पृश्याना मंदिरात प्रवेश न देणे. इत्यादि प्रकारचे अन्याय त्यांच्यावर होतात.

या व अशाच प्रकारच्या वेगवेगळ्या अन्यायाचे प्रकार एल. इलाया पेरूमल कमिटीच्या (१९६९) रिपोर्टात (प्रत्येक राज्यातील) दिलेले आहेत.

यु. एन. आय. च्या पहाणीप्रमाणे १९६७ ते १९७० या काळात सुमारे १,१०० इतक्या अस्पृश्यांचे खून करण्यात आले. त्यात उत्तरप्रदेशातील खूनाचा आकडा ३२२ इतका आहे. अस्पृश्यता पाळणे, त्यांच्यावर अत्याचार करणे, याप्रकरणी एकूण २५२२ गुन्ह्यांची नोंद, १९६८ ते १९७० या काळात शेडयूल्ड-कास्टस कमिशनरकडे झालेली कळते. त्याच्या पूर्वीच्या वर्षी १९०८ गुन्ह्याच्या अशाच नोंदी आहेत. अशाप्रकारचे अत्याचार दैनंदिन प्रसिद्ध होणाऱ्या काही वृत्तपत्रावरून कळतात. असेच अत्याचार अस्पृश्यांच्यावर स्वातंत्र्यपूर्व काळात होत होते आणि स्वातंत्र्याच्या गेल्या पंचवीस वर्षांच्या काल-खंडातही असे अत्याचार घडत आहेत. इतकेच नव्हे, तर स्वातंत्र्याच्या काळात अशा अत्याचारांचे स्वरूप वाढलेले आहे.

## अशा अत्याचाराचे मूळ

अशा अत्याचाराचे मूळ चातुर्वर्ण्य-प्रणित जातिव्यवस्थेच्या उच्च-नीच समाजरचनेत आहे. दुसरी गोष्ट अस्पृश्य दलित व बौद्ध स्वाभिमानाने स्वतंत्र नागरिकाप्रमाणे वागतो म्हणूनही त्यांच्यावर अन्याय होतात. तिसरी गोष्ट खेड्यातील दलित, बौद्ध हे आर्थिकदृष्ट्या दरिद्री आहेत. हे त्यांचे दारिद्र्यही त्यांच्या प्रश्नाच्या मुळाशी एक कारण आहे. खेड्यातील पंचायत, जिल्हा परिषदा, विधानसभा व लोकसभा यांच्या निवडणूकाच्यावेळीही मतदानावरून असे अत्याचार घडतात.

## पंचायत राज्यात दलितांना उपेक्षीत ठेवले

लोकशाही विकेंद्रीकरणात सत्तेचे विकेंद्रीकरण होण्याच्या ऐवजी, सत्तेचे केंद्रीकरणच झालेले आहे. त्यामुळे दलित. बौद्ध या पंचायत राज्यात सत्तेपासून, विकास योजनापासून खऱ्या अर्थाने उपेक्षितच राहिले आहेत. याउलट खेड्यात, तालुक्यात रूढीने परंपरेने, सत्तेचे मानसन्मानाचे स्थान भोगणारेच लोक आज खेड्यापासून जिल्ह्यापर्यंत सत्तेवर आले. त्यांच्याबरोबरच धनाने संपत्तीने, मोठ्या शेतीने, समाजात वर असलेले लोकच पंचायत राज्यात सत्तेवर आले; व गोर-गरीब सत्तेपासून दूर राहिले.

महाराष्ट्रात दलित व आदिवासी समाज्यावर समाजविकासाच्या दृष्टीने किती अन्याय झाला आहे, याची पुढील आकड्यावरून कल्पना येते.

महाराष्ट्रातील जिल्हापरिषदानी त्यांच्या उत्पन्नापैकी–

दहा जिल्हापरिषदांनी शून्य टक्के खर्च केला.

सात जिल्हापरिषदांनी एक टक्क्यापेक्षा कमी खर्च केला.

चार जिल्हापरिषदांनी एक ते पाच टक्क्यांपर्यंत खर्च केला.

तीन जिल्हा परिषदांनी पाच ते दहा टक्के खर्च केला.

या आकडेवारीवरून जिल्हा परिषदेच्या कारभारात दलित व आदिवासीयांच्यावर त्यांच्या विकासकार्यात कसा अन्याय होतो हे कळते. मग या समाजाची पंचायत राज्यात कशी प्रगती होणार हा मोठा प्रश्न आहे.

## दलितांचा–अस्पृश्यांचा प्रश्न कसा सुटणार ?

अस्पृश्यता नष्ट करणारा कायदा १९५५ साली सरकारने केला. राज्यघटनेनेही अस्पृश्यता नष्ट केली. पण हा कायदा प्रत्यक्ष अमलात येतच नाही, असे म्हणणे भाग पडते. एकतर या सामाजिक समता प्रस्थापित करणाऱ्या कायद्याचा प्रवेशच खेडेगावात झालेला नाही. (याला काही खेडी अपवाद असतील ) या कायद्याला गावच्या स्पृश्य–सवर्ण गावकऱ्यांनी वेशीच्या गावतटाच्या आत प्रवेशच मिळू दिला नाही. त्यात या कायद्याची अंमलबजावणी करणारे अधिकारी या अस्पृश्यता नष्ट करणारे कायद्याच्या अंमलबजावणीच्या बाबतीत टंगळमंगळ करतात. एकतर असे अधिकारी स्पृश्यवर्गी असल्याने, ते आपली इभ्रत स्पृश्य हिंदू समाजापुढे ठेवण्यासाठी, त्यांची मर्जी सांभाळण्यासाठी प्रयत्न करतात.

त्यामुळे या कायद्याच्या अंमलबजावणीत चुकारपणा होतो, त्यातच अशा अधिकाऱ्यांना दलित व बौद्ध समाजाबद्दल, त्यांच्या प्रश्नांबद्दल, सहानुभूती आपुलकी नाही. म्हणूनच अस्पृश्यता बंद करणारा कायदा कपाटात धूळ खात पडला आहे. (याला काही कर्तव्यदक्ष अधिकारी अपवाद असतील.)

अधिकाऱ्यांनी अस्पृश्यता नष्ट करणाऱ्या कायद्याच्या अंमलबजावणीच्या कामी अनास्था दाखविली, अंगचुक रपणा केला, तरी देखील सरकार कसे काय गप्प बसते? अशा कायद्याची अंमलबजावणी होते का नाही हे आस्थेने पाहणे सरकारचे कर्तव्य असते. सरकारने या कायद्याच्या या दलितांच्या प्रश्नाच्याबाबतीत लक्ष घातले नाही तर कायदा व हा प्रश्न तसाच पडून राहील.

## राजकीय पक्ष

भारतातील सर्वच राजकीय पक्षांनी अस्पृश्यांच्या प्रनांची निदान कागदोपत्री (पक्षीय जाहीरनाम्यात) जाण–नोंद घेतलेली आहे. यापेक्षा या पक्षांनी अद्याप पुढे पाऊल टाकलेले नाही. (या प्रश्नावर स. समाजवादी पक्षाने गेल्या वर्षी समता मार्ग काढले व समता परिषदा घेतल्या.)

अर्थात अशा राजकीय पक्षांच्यापुढे (रिपब्लिकन पक्ष सोडून) जोपर्यंत केवळ 'मताचे गणित' हाच प्रश्न आहे तोपर्यंत हे राजकीयपक्ष हा अस्पृश्यांना प्रश्न हाती घेऊ शकणार नाहीत असे आजपर्यंतच्या अनुभवावरून दिसते.

## सुशिक्षित वर्ग

आजच्या शहरी सुशिक्षित वर्गात अस्पृश्यांच्या प्रश्नाकडे लक्षच नाही. अस्पृश्यांचा प्रश्न सुटला काय, किंवा तसाच पडून राहिला काय, यावर हा सुशिक्षित वर्ग काहीच विचार करत नाही हे दुर्दैव आहे.

त्यातच शहरी युवक वर्ग, महिला मंडळ यांना तर या प्रश्नाची मुळीच जाण नाही. (याला युक्रांदची काही मंडळी अपवाद असतील.)

## खेड्यातला बागायत शेतकरी

खेड्यातला बागायत शेतकरी आपल्या शेतीच्या प्रगतीसाठी आधुनिक यांत्रिक आयुधे वापरतो. रासायनिक खते वापरते. इलेक्ट्रिक मोटार, ऑईल-इंजीन्स वापरतो. पण हाच बागायत शेतकरी मात्र अस्पृश्यांच्या, दलितांच्या प्रश्नावर सामाजिकदृष्ट्या प्रतिगामी बनतो. त्याच्यातील ही एक मोठी विकृती बनली आहे.

अस्पृश्यता बंद करण्याच्या प्रश्नावर अस्पृश्य दलितांच्या प्रश्नावर सरकारच्या राज्यघटना कायद्यापासून ते युवक बागायत शेतकऱ्यापर्यंत कसे उदासीन आहेत; त्यामुळे या मूलभूत प्रश्नाची कशी शोकांतिका झाली आहे; याची पूर्ण कल्पना येईल.

## इलाया पेरुमल कमिटीचा रिपोर्ट

मध्यवर्ती सरकारने अस्पृश्यांच्या सर्वांगिण प्रश्नाचा अभ्यास करून, सरकारला रिपोर्ट सादर करण्यासाठी श्री. एल. इलायापेरुमल यांचे चेअरमनशीप सात सभासदांची कमिटी १९६९ साली नेमली होती. या कमिटीने अस्पृश्यांच्या

सर्व प्रश्नांवर एक परिपूर्ण असा माहितीपूर्ण रिपोर्ट तयार करून सरकारला सादर केला आहे. त्याचे नाव इंग्रजीत असे आहे :–

Report of the Committee on Untouchability, Economic, and Educational Development of the Scheduled Castes, and Connected Documents–1969.

या रिपोर्टातील जमा केलेली माहिती, अस्पृश्यांच्या प्रश्नाचे मूलभूत स्वरुप :– सामाजिक, आर्थिक, व शैक्षणिक, या प्रश्नाचे स्वरूप स्वातंत्र्याच्या काळात कसे आहे; त्यावर काय काय उपाय योजना केलेल्या आहेत. त्याचा अभ्यास करून कमिटीने काही मोलाच्या शिफारशीही केलेल्या आहेत. या रिपोर्टातूनही अस्पृश्यांच्या दलिताच्या प्रश्नाचा अभ्यास केला तरी या प्रश्नाचे स्वरूप किती भयानक स्वरुपाचे आहे याची कल्पना येते. म्हणून या अस्पृश्यांच्या प्रश्नाची उकल करण्यासाठी, तो सोडविण्यासाठी त्यावर महत्त्वाचे उपाय केले पाहिजेत. गेल्या पंचवीस वर्षाच्या काळात – घटना अमलात आल्यापासूनच्या काळात हा अस्पृश्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी अनेक उपाय योजले होते व आहेत. पण या प्रश्नाचे स्वरूप व त्यावर योजलेले उपाय पहाता हे उपाय फारच अपुरे वाटतात. फार तर या उपायांना अस्पृश्यता प्रतिबंधक (preventive remedies) उपाय म्हणता येईल. या प्रतिबंधक उपायांनी हा प्रश्न सर्वदृष्टीने सुटणे कठीण आहे. यासाठीच हा अस्पृश्यांचा–दलितांचा प्रश्न सोडविण्यासाठी मूलगामी–मूळातूनच हा अस्पृश्यतेचा रोग नष्ट करणारे उपाय (Curative Remedies) यावर विचार केला पाहिजे व असे मूलगामी स्वरूपाचे उपायच अमलात आणले पाहिजेत, त्याशिवाय हा जटील प्रश्न सुटणार नाही.

अस्पृश्यांच्या दलितांच्या प्रश्नाचा त्यादृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यानी मूलत: विचार करून या प्रश्नाच्या सोडवणूकीसाठी मूलभूत स्वरूपाचे उपाय सुचविले होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुचविलेला उपाय.

मद्रास येथे ता. २३-९-१९४४ रोजी श्री. रावबहादूर एन. शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली शेड्यूल्ड कास्टस फेडरेशन (या राजकीय पक्षाची) च्या कार्यकारिणीची बैठक झाली होती. या बैठकीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर हजर होते. या बैठकीत पास झालेला एक महत्त्वाचा ठराव होता. तो अस्पृश्यांच्या प्रश्नावर मूलगामी उपाय म्हणूनच सुचविला होता तो ठराव असा—

ठराव नं. ११ :–(अ) अस्पृश्य वर्ग हिंदू-खेड्याच्या तटाच्या बाहेर परके लोक म्हणून राहातात. त्याना चरितार्थाचे कसलेही साधन नाही. हिंदूच्या दृष्टीने ते (अस्पृश्य) एकदम अल्पसंख्य आहेत. जोपर्यंत अस्पृश्यवर्ग या परिस्थितीत आपले जीवन जगतो, तोपर्यंत त्याला हिंदूचा छळ, दडपेगिरी सहन करूनच जीवन जगावे लागणार आहे. त्यामुळे या वर्गाला स्वतंत्रपणे जीवनाचा सर्वस्वी आनंदोपभोग घेता येणार नाही.

(ब) स्वराज्यात त्यांच्यावर अधिक

अत्याचार होऊ नयेत म्हणून अस्पृश्य वर्गांना हिंदूच्या जुलूम व दडपशाहीपासून अधिक चांगले संरक्षण देण्यासाठी व स्वराज्यात त्यांच्या जीवनाची यापेक्षा अधिक ससेहोलपट होऊ नये व त्यांचा पूर्ण विकास व्हावा, त्याना आर्थिक व सामाजिक स्थैर्य मिळावे व अस्पृश्यतेचे निवारण व्हावे म्हणून ही शेड्यूल्ड कास्टस फेडरेशनची कार्यकारिणी खालील मागण्याप्रमाणे घटनेत तरतूद असावी अशी मागणी करते.

(१) आजची अस्पृश्यांची वसतिस्थाने पूर्णतया हालवून त्यांचीच स्वतंत्र खेडी निर्माण करावीत. अस्पृश्यांची ही खेडी हिंदू-खेड्यापासून पूर्णतया स्वतंत्र असतील.

(२) स्वतंत्र खेड्यात अस्पृश्यवर्गांच्या वसाहती स्थापन करण्यासाठी घटनेतच एक स्वतंत्र सेटलमेंट कमिशनची तरतूद व्हावी.

(३) सरकारी शेतीस लायक अशी सर्व पडीक जमीन ताब्यात घेऊन ती कमिशनकडे द्यावी. त्या जमिनीत अस्पृश्यांच्या नवीन वसाहती निर्माण कराव्यात.

(४) अस्पृश्यांच्या स्वतंत्र वसाहतीची योजना पूर्ण करण्यासाठी खाजगी मालकीच्या जमिनी देखील लँड-ॲक्विझिशन ॲक्टखाली खरेदी करण्याचा कमिशनला अधिकार द्यावा.

(५) या स्वतंत्र वसाहतीच्या योजनेसाठी दरसाल कमीतकमी पाचकोटी रुपयांची तरतूद मध्यवर्ती सरकारने करावी, अशी घटनेत तरतूद करावी; आणि हे योजनेचे काम पूर्ण करण्यासाठी ती मदत सेटलमेंट कमिशनरकडे द्यावी.

याप्रमाणे हा महत्त्वाचा मूलगामी ठराव आहे. या ठरावात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा एक विचार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना या मूलभूत विचाराची तरतूद राज्यघटनेत बहुसंख्य पक्षाच्या विरोधी भूमिकेमुळे करता आली नाही. त्याप्रमाणेच अस्पृश्यांना दलितांना त्याच्यामताने आणखी मूलभूत अशी संरक्षणे पाहिजे होती. त्याचीही त्यात तरतूद करता आली नाही. यामुळेच डॉ. बाबासाहेब पुढे पुढे राज्यघटनेच्या विरोधी बोलत असत. विशेषत: त्यांनी राज्यसभेतील एका भाषणात राज्यघटनेच्या विरोधी प्रखर भाषण केले होते. याचा अर्थच असा की की डॉ. बाबासाहेब यांना अस्पृश्यांचा-दलितांचा सर्वांगीण उद्धार-प्रगती करण्याच्या दृष्टीने घटनेत आणखी मूलभूत अशा तरतूदी करावयाच्या होत्या; पण केवळ सत्तेवर असलेल्या बहुसंख्य पक्षाच्या विरोधी भूमिकेमुळे त्यांना, त्या तरतुदी करता आल्या नाहीत. अस्पृश्यांना संरक्षणे देण्यासाठी त्यांनी घटनेत ज्या थोड्या काही तरतूदी करून घेतल्या, त्याच त्या काळाच्या परिस्थितीत व वेळेच्या दृष्टीने महत्त्वाच्या होत्या असे म्हणण्याची पाळी येते. म्हणूनच घटनेतील आजच्या तरतूदीमुळे 'अस्पृश्यांचा' प्रश्न मुळीच सुटू शकत नाही हे स्पष्टच आहे.

राज्यघटना पूर्ण झाल्यावर समारोपाचे भाषण करताना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी स्पष्ट शब्दात इशारा दिला होता की,

'राज्यघटनेने आपल्याला फक्त राजकीय समानत्व मिळाले; परंतु आपल्या देशात जोपर्यंत सामाजिक विषमता व आर्थिक विषमता आहे; आणि ती जोपर्यंत नष्ट होत नाही, तोपर्यंत घटनेनं उभा केलेला डोलारा कधी कोसळून धुळीस मिळेल हे सांगता येत नाही.'

त्यांच्या या इशाऱ्यातील मूलभूत विचार पाहिला असता घटनेत आणखी काय काय तरतूदी पाहिजे होत्या याची त्यावरून कल्पना येते. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब यांनी १९५५ च्या 'अस्पृश्यता (गुन्हे) कायदा' यावर केलेल्या भाषणाचा व त्यांनी आणखी केलेल्या काही सूचनांचा विचार केल्यावर, या कायद्यात काय काय बदल पाहिजे होते याची कल्पना येते. अर्थात कायद्यात कितीही चांगल्या व कडक तरतूदी केल्या तरी, कायदा, त्याची अंमलबजावणी व प्रत्यक्ष व्यवहार यांच्यात विसंगती पडते, तोपर्यंत केलेला कायदा हा केवळ कागदोपत्रीच पडून राहातो. त्याचा ज्यांच्यासाठी कायदा केला, त्याला काहीही उपयोग होत नाही अशी खरी वस्तुस्थिती आहे.

आजच्या परिस्थितीत अस्पृश्य व दलितांच्या प्रगतीसाठी खालील मुख्य योजना करणे भाग आहे.

भारतीय राज्यघटनेने व कायद्याने अस्पृश्यांचा-दलितांचा प्रश्न आजही सुटलेला नाही. या प्रश्नाचे स्वरूप ग्रामीण भागातील 'खेड्यात' भयंकर स्वरूपाचे आहे. (शहरात या प्रश्नाचे स्वरूप थोडे वेगळे आहे.) जातीय विचारांनी व रूढी, परंपरांनी भरलेली भारतीय खेडीच मूलतः नष्ट केली पाहिजेत. त्याशिवाय अस्पृश्यांच्या प्रश्नांची खरी कोंडी फुटणार नाही. पण ही खेडी कशी नष्ट करणार? खेडी कशी नष्ट होणार? जोपर्यंत भारतीय खेड्यांचे अस्तित्व आहे, तोपर्यंत अस्पृश्यांचा-दलितांचा प्रश्न, त्यांच्यावरील अत्याचार व अन्याय चालू राहाणारच आहेत. खेड्यात अस्पृश्य, दलित व बौद्ध स्वतंत्र देशाचा, स्वतंत्र नागरिक म्हणून सुखासमाधानाने राहू शकत नाही, राहू शकणार नाही. अशा परिस्थितीत त्यांना मूलभूत प्रश्न कसा सोडविणार त्यावरच विचार केला पाहिजे.

## स्वतंत्र खेडी निर्माण करावी

कधी कधी संकटकाळी सरकारच्याच धोरणाने नवीन खेडी निर्माण केली जातात. त्यांची उदाहरणेच द्यावयाची झाल्यास, धरणग्रस्तांच्यासाठी नवी खेडी, भूकंपग्रस्तांच्यासाठी नवी खेडी, पुरग्रस्तांच्यासाठी नवी खेडी, अशी नवी नवी खेडी सुरक्षित जागी सरकारकडूनच निर्माण केली जातात. संकटाच्या प्राप्त परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी हा उपाय केला जातो. असे जर होऊ शकते, तर मग अस्पृश्यताग्रस्त, अत्याचारग्रस्त अशा अस्पृश्य, दलित व बौद्ध यांचे जीवन सुधारण्यासाठी-प्रगती करण्यासाठी, त्यांना अस्पृश्यतेतून मुक्त करण्यासाठी त्यांची स्वतंत्र खेडी निर्माण करावयास काय हरकत आहे?

अशी स्वतंत्र खेडी निर्माण करताना धरणग्रस्ताप्रमाणे यांनाही जवळची सरकारी जंगल-पडिक व सीलींगमुळे शिल्लक राहिलेल्या जमिनी त्यांच्या

चरितार्थासाठी द्याव्यात. त्याशिवाय तेथे छोटे-मोठे स्वतंत्र उद्योगधंदेही काढून द्यावेत.

जर गावातील स्पृश्य हिंदूंना खेड्याच्या तटाच्या-वेशीच्या बाहेर बौद्ध, दलित व अस्पृश्य यांच्या वस्त्या-वाड्या चालतात, तर मग त्यांचीच स्वतंत्र खेडी का चालू नयेत ? पुरातन काळापासून आजपर्यंत आदिवासींची स्वतंत्र खेडी, स्वतंत्र गावे आहेतच ना ? ते त्यांच्या खेड्यात स्वतंत्र नागरिक म्हणून सुखासमाधानाने राहातात ना ?

## दलितांचे शहरीकरण करावे

या प्रश्नावर दुसरा एक मूलगामी स्वरूपाचा उपाय म्हणजे खेड्यात राहणाऱ्या अस्पृश्य, दलित व बौद्धांचे शहरीकरण (आर्बनायझेशन) करावे. खेड्यातील अशी दलितांची कुटुंबे शहरात, तालुक्याच्या ठिकाणी, जेथे जेथे उद्योगधंदे, कारखाने व नवीन औद्योगिक परिसर निर्माण झालेला आहे व होत आहे अशा औद्योगिक केंद्राच्या परिसरांच्या क्षेत्रात आणून त्यांच्या वस्त्या निर्माण कराव्यात असे शहरीकरण करताना त्यांच्या एका एका पाच माणसाच्या कुटुंबातील किमानपक्षी एका व्यक्तीला अशा औद्योगिक केंद्रात नोकरी दिली जावी; म्हणजे त्यांच्या कुटुंबाचा कमीत कमी पोटापाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. (या औद्योगिक परिसरात सहकारी साखर कारखानेही गृहीत धरलेले आहेत) अशा शहरीकरणाच्यावेळी औद्योगिक परिसराच्या आजू-बाजूला असलेल्या सरकारी किंवा बिन-सरकारी जमिनी कायद्याने सरकारने ताब्यात घ्याव्या, व त्या जमिनीत सहकार घरबांधणी सोसायटीच्या तत्त्वावर आधारावर त्यांची घरबांधणी करावी. त्यामुळे अशा शहरीकरणातून झोपडपट्ट्या निर्माण होण्याची भीती राहाणार नाही. हाही या प्रश्नावर मूलगामी उपाय आहे.

## जमिनींचे व उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण करावे


या प्रश्नावर आणखी एक उपाय म्हणजे सर्वच भारतीय जमिनीचे व उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण करावे. अशा राष्ट्रीयीकरणातूनही या अस्पृश्यांच्या प्रश्नाची कोंडी फुटू शकेल. या राष्ट्रीयीकरणातून समाजवादी समाजरचना निर्माण करता येईल. त्यामुळे भारतीय ग्रामीण भागाचा तोंडावळाच बदलण्यास मदत होईल. त्यातून भावनिक जवळीक निर्माण होण्यास मदत होईल.

आजच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत सामाजिक न्याय नाही. याउलट त्यातून दलितांची सामाजिक, आर्थिक व राजकीय पिळवणूक होते. ग्रामीण अर्थव्यवस्थेची पुनरर्चना केली पाहिजे. ती करावयाची म्हणजे जमिनीचे राष्ट्रीयीकरण भाग आहे. त्याचबरोबर उद्योगधंद्याचेही राष्ट्रीयीकरण केले पाहिजे.

अस्पृश्यांच्या, दलितांच्या प्रश्नांची कोंडी फोडून त्यांना भारताचे स्वतंत्र नागरिक म्हणून सुखा-समाधानाचे जीवन आणावयाचे असेल तर त्यावर वर म्हटल्याप्रमाणे मूळगामी स्वरूपाचे उपायच करणे भाग आहे त्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही.

● ● ●

# जातीसंस्था आणि आनुवंशिकता



माधव गाडगीळ

कित्येक पिढ्या एकमेकांशी बिलकूल विवाहसंबंध न ठेवलेल्या जाती हे हिंदुसमाजाचे खास वैशिष्टच आहे. जातीय उच्चनीचतेची भावनाही आपल्या समाजात खोलवर रूजलेली आहे. अशा परिस्थितीत काही जाती नैसर्गिक-रीत्याच कनिष्ठ आहेत, का केवळ परि-स्थितीमुळे निकृष्ट अवस्थेला पोचलेल्या आहेत हा प्रश्न फार जिव्हाळ्याचा

आहे. या प्रश्नाचा उहापोह अनुवंशशास्त्राच्या दृष्टीने करण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात केलेला आहे.

जातिभेद आणि अनुवंशिक भेद यासंबंधी अनेक गैरसमज प्रसृत आहेत. मानव हा अतिशय संस्कारक्षम प्राणी असल्यामुळे मानवातील सर्व भेद बाह्य संस्कारामुळेच निर्माण झालेले असतात असा अनेकांचा, विशेषतः समाजशास्त्रज्ञांचा, समज आहे. हे मान्य केल्यास जाती-जातीतील फरक हे पूर्णतः परिस्थितीजन्य ठरत असल्यामुळे अनेक जातिभेदाचे विरोधक ही भूमिका स्वीकारतात. परंतु कोणतेही गुणधर्म हे प्रकृति आणि परिस्थिती यांच्या संयोगापासून निर्माण होतात असे अनुवंशशास्त्र सांगते. त्यामुळे जातिभेदाच्या विरोधकांची ही अतिरेकी भूमिका चुकीची ठरते. या उलट, विषमता हा निसर्गनियम आहे आणि त्यामुळे जातिसंस्था समर्थनीय ठरते असा दुसरा समज आहे. विषमता किंवा जास्त युक्तिकतेने, विविधता हा निसर्गनियम आहे हे अनुवंशशास्त्र मान्य करते. परंतु त्यावरून केलेले जातिभेदाचे समर्थन हे अगदी अपुऱ्या माहितीवर व चुकीच्या मीमांसेवर आधारलेले आहे. जातीजातीत फरक असले तरी केवळ फरक आहेत म्हणून जातिभेद योग्य ठरत नाहीत. जातिभेदाची युक्तायुक्तता जातीजातीतील फरक कशा प्रकारचे आहेत यावर अवलंबून आहे. ह्या प्रश्नाला प्रत्यक्ष उत्तर देण्याइतका पुरावा आपल्याकडे नाही. परंतु निसर्गतः उत्पन्न होणारे व कृत्रिम प्रजननाने निर्माण झालेले आनुवंशिक फरक कसे असतात, कोणत्या परिस्थितीत उद्भवतात व काय वेगाने उद्भवतात यावर बरीच माहिती उपलब्ध आहे. अनुवंशशास्त्राची ही पार्श्वभूमी व भारतीय समाजातील ऐतिहासिक परिस्थिती विचारात घेऊन जातीजातीत कसल्या प्रकारचे फरक असतील ह्या प्रश्नाचे उत्तर सुचवण्याचा प्रयत्न येथे केला आहे.


आपल्याकडे अनेक जातीत त्या त्या जातीच्या व्यवसायाला पोषक अशी संस्कृति निर्माण झालेली आहे. ह्या संस्कृतीचा अनुवंशिक तत्त्वावर परिणाम होणे अपरिहार्य आहे हा तिसरा महत्त्वाचा गैरसमज. अनुवंशशास्त्र हा समज कसा चुकीचा आहे हे दाखवून देते. जातिसंकर होऊन जाती नाहीशा झाल्यास त्यांचे अनुवंशिक परिणाम काय होतील याचाही विचार या लेखात केला आहे. तटस्थ भूमिकेतून या सर्व विषयाचा विचार केल्यावर आजच्या परिस्थितीत जातिसंस्थेला कोणताही शास्त्रीय आधार नाही असा निष्कर्ष अपरिहार्य ठरतो.

## प्रकृति आणि परिस्थिती

विविधता हा सर्व जीवनसृष्टीचा आणि इतर जीवांप्रमाणे मानवजातीचाही महत्त्वाचा गुणधर्म आहे. विशेषतः लैंगिक पुनरुत्पादन असलेल्या जीवजातींमध्ये हुबेहूब एका व्यक्तीसारखी दुसरी व्यक्ती सापडणे अगदी अशक्य आहे. व्यक्तीव्यक्तींतील असे फरक सर्व प्रकारच्या

गुणधर्माबाबत आढळून येतात. उदाहरणार्थ, मनुष्य प्राण्यामध्ये हाताच्या बोटावरील रेषांच्या ठेवणीपासून ते स्वभावाच्या एकलकोंडेपणापर्यंत सर्व प्रकारचे फरक व्यक्तीव्यक्तीं : दृष्टीस पडतात. हे भेद आनुवंशिक प्रकृती आणि सभोवतालची परिस्थिती यांच्या परस्पर प्रक्रियेतून निर्माण होतात. यातील काही भेदात प्रकृतीचा भाग मोठा असतो, तर इतरात बाह्य संस्काराचा वाटा महत्त्वाचा असतो. हातावरील रेषांची ठेवण जवळ जवळ शंभर टक्के आनुवंशिक प्रकृतीवर अवलंबून असते. त्वचेचा रंग हा बऱ्याच प्रमाणात आनुवंशिक असतो परंतु त्यात परिस्थितीप्रमाणे थोडेफार बदल होऊ शकतात, तर तर्कशुद्ध वाद घालण्याची कला ही मोठ्या प्रमाणात बाह्य संस्कारामुळेच अंगात येऊ शकते. प्रत्येकच गुणधर्मात प्रकृतीचा किंवा संस्काराचा काहीना काही हिस्सा असतो. माणसाचे अनेक शारीरिक गुणधर्म हे ७० ते ९० टक्क्यापर्यंत आनुवंशिक प्रकृतीवर अवलंबून असतात हे आता निश्चित ठाऊक झालेले आहे. मानसिक गुणधर्माबाबत अजून पुरेशी माहिती उपलब्ध नाही. मानसिक प्रवृत्ती ठरवण्यात प्रकृती आणि बाह्यसंस्कार या दोहोंचाही वाटा असणारच. परंतु ह्याची कशी विभागणी झाली आहे ह्या प्रश्नाचे उत्तर अगदी अलीकडेच मिळू लागले असल्याने हा प्रश्न अजून बऱ्याच अंशी विवाद्य आहे.

माणसाच्या निरनिराळ्या वंशात आणि जातींसारख्या वेगवेगळ्या समुदायात काही ना काही शारीरिक फरक आढळून येतात. उदाहरणार्थ आफ्रिकेतील काळ्या वंशाचे लोक हे युरोपातील गोऱ्या वंशाच्या लोकांपेक्षा वर्णाने काळे, जास्त कुरळ्या केसांचे आणि ओठ अधिक जाड असलेले आहेत बुद्धिक्षमता मोजण्यासाठी मानसशास्त्रज्ञांनी ज्या



कसोटच्या निर्माण केलेल्या आहेत त्या-वरून गोऱ्या लोकांची बुद्धिक्षमता काळ्यांपेक्षा सरासरीने पंधरा गुणांनी अधिक भरते. हिंदुसमाजातील जातींचा अभ्यास केल्यास असेच फरक परंतु थोड्या कमी प्रमाणात आढळतील. उदाहरणार्थ, कायस्थ प्रभूंचा वर्ण अस्पृश्यांपेक्षा थोडा उजळ असेल आणि मानसशास्त्रज्ञांच्या कसोटचांप्रमाणे त्यांची बुद्धिक्षमताही सरासरीने जास्त ठरेल. आता बुद्धिक्षमतेतील फरकात आनुवंशिक प्रकृतीचा वाटा किती आणि बाह्य संस्काराचा वाटा किती हा महत्त्वाचा प्रश्न आहे. यात आनुवंशिक-तेचा भाग मोठा आहे असे जातिभेदाचे पुरस्कर्ते मानतात, तर उलट हे फरक केवळ बाह्य संस्कारातील फरकांमुळे निर्माण झालेले आहेत असे जातिभेदाचे विरोधक मानतात. अनुवंशशास्त्राच्या ज्ञानाच्या आधारे याबाबतची खरी वस्तुस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

## जीव सृष्टीतील भेद

मानव हा जीवसृष्टीच्या उत्क्रान्तीतून निर्माण झाला आहे. त्याच्या संस्कृतीच्या विकासामुळे आज त्याने जगात खास स्थान मिळविले असले, तरी जीव-शास्त्राचे सर्व मूलभूत नियम त्यालाही लागू पडतात. तेव्हा सर्वसामान्य जीव-सृष्टीत किती आनुवंशिक विविधता आहे हे प्रथम पाहणे उपयुक्त ठरेल. DNA या सेन्द्रिय आम्लाचे परमाणु हे आनु-वंशिकतेचा पाया आहेत. प्रत्येक प्राण्याच्या शरीरात ह्या परमाणूंच्या अनेक प्रती आढळतात. हे परमाणु आकाराने दोन पेडाच्या वेणीसारखे असतात आणि ते पेड हजारो वेळा गुंफून ही लांबलचक वेणी बनलेली असते. प्रत्येक प्राण्याच्या आयुष्याच्या सुरवातीला त्याच्या आईबापांकडून DNA च्या परमाणूच्या संचाची एकेक प्रत त्याला मिळते. या परमाणूत त्याच्या भविष्यातील संभाव्य विकासाची सर्व माहिती लिहून ठेवलेली असते. या माहितीप्रमाणे त्या प्राण्याची जीवित-यंत्रणा चालवण्याबद्दल हुकूम निघतात. या हुकमांच्या अंमलबजावणीतून प्राण्याचा विकास होत राहतो. परंतु नक्की कोणते हुकूम निघायचे आणि त्यांची कशी अंमलबजावणी व्हावयाची यावर बाह्यपरिस्थितीचा ताबा असतो. अशा आनुवंशिकतेच्या व बाह्य परि-स्थितीच्या क्रिये-प्रक्रियेतून प्रत्येक प्राण्याच्या आयुष्याचा धागा उलगडत राहतो. या आनुवंशिकतेच्या खलित्या-तील एकेका वाक्यास जनुक अथवा gene अशी संज्ञा आहे. DNA च्या दहा-पंधरा वळणांनी एकेक जनुक बनलेला असतो. अशा या वळणांतील अणुरचनेत अनेक सूक्ष्म भेद असू शकतात आणि यातूनच प्राण्यांप्राण्यांतील आनुवंशिक फरक निर्माण होतात. आनुवंशिक फरकांच्या या परमाणूंच्या पातळीवरील अभ्यासाला गेल्या पाचदहा वर्षांत मोठी चालना मिळाली असून त्यातून जीवसृष्टीतील आनुवंशिक भेदा-बाबत नेमकी माहिती मिळण्यास सुरवात झालेली आहे.

प्राणिशास्त्रांत जाति या शब्दाला हिंदुधर्मातील जातींपेक्षा थोडा वेगळा अर्थ आहे जर दोन प्राण्यांच्या संयोगाने पूर्ण सुफल अशी प्रजा निर्माण झाली तर ते दोन प्राणी एकाच जातीचे समजतात. अशी प्रजा निर्माण झालीच नाही किंवा ती खेचरांप्रमाणे वांझोटी असली तर ते प्राणी वेगवेगळ्या जातीचे समजतात. या व्याख्येनुसार सर्व मानव हे एकाच मनुष्यजातीत मोडतात. निसर्गात कोणत्याही एका जातीचे प्राणी मोठ्या प्रदेशावर विखुरलेले असतात आणि संपूर्ण जात ही सतत जननसंबंध येणाऱ्या अनेक समुदायांपासून बनलेली असते हिंदुसमाजातील जननसंबंध पोटजातींपुरते मर्यादित असल्याने या पोटजाती जीवजातींच्या समुदायासारख्या आहेत. प्राण्यांच्या प्रत्येक समुदायात मोठ्या प्रमाणावर अनुवंशिक भेद आढळून येतात. एका समुदायातील दोन प्राण्यांची तुलना केल्यास त्यांच्यामध्ये साधारणपणे दहा ते पंधरा टक्के जनुकांच्यात फरक आढळतात. संपूर्ण समुदायाचा विचार केल्यास तीस टक्के जनुकांच्यात विविधता आढळते. या आनुवंशिक विविधतेत परिस्थितिजन्य फरकांची भर पडून अखेर व्यक्त होणारी विविधता याहून बरीच अधिक असू शकते.

एकाच जातीतील दोन समुदायांत कमीजास्त प्रमाणात भेद आढळतात. कधी ते एकाच समुदायाचे दोन भाग असल्यासारखे असतात, तर कधी त्यांच्या अनेक जनुकांत मोठ्या प्रमाणावर फरक असतात. सामान्यतः एकमेकांपासून अगदी वेगळे असलेले समुदाय हे भौगोलिकदृष्ट्या फार वेगळ्या परिस्थितीतील असतात. हिंदुसमाजातील पोटजातींच्या बाबतीतही हा नियम लागू पडतो. उदाहरणार्थ, पंजाबातील एक पोटजात 'क' हिची पंजाबातील दुसरी पोटजात 'च' व तेलंगणातील तिसरी पोटजात 'त' हिच्याशी तुलना केल्यास, पंजाबी 'क' व 'च' मधील भेद हे पंजाबी 'क' व तेलंगणी 'त' किंवा पंजाबी 'च' आणि तेलंगणी 'त' यांच्यातील भेदांपेक्षा बरेच कमी असतील. हा नियम 'क' आणि 'त' हे दोन्हीही ब्राह्मण असतील व 'च' चांभार असेल तरीही लागू पडतो. याचे कारण पंजाबी व तेलंगणी ब्राह्मण हे जननदृष्ट्या पूर्ण वेगळे समुदाय आहेत. याउलट पंजाबी ब्राह्मण आणि चांभार हे जातिसंस्थेच्या स्थापनेपूर्वी एकाच समुदायातील असण्याची दाट शक्यता आहे.

ही आनुवंशिक विविधता शारीरिक गुणधर्मांपुरतीच मर्यादित नाही, तर मानसिक गुणधर्मातही असे फरक आढळून येतात. यादृष्टीने उंदरांच्या भांडकुदळपणाच्या आनुवंशिकतेबद्दल बरेच संशोधन झालेले आहे. हा भांडकुदळपणा बऱ्याच अंशी परिस्थितीवर अवलंबून असतो. फार दाटीवाटीने वाढलेले उंदीर जास्त भांडकुदळ असतात. परंतु ही भांडकुदळ प्रवृत्ती आनुवंशिकतेवरही अवलंबून असते. कृत्रिम प्रजननाने अगदी दाटीवाटीतही

शांतपणे राहणाऱ्या पोटजाती तयार करता येतात. अशा पोटजाती निर्माण करण्याचे तंत्र अगदी साधे आहे. व या तंत्रामागची तत्त्वे समजून घेणे आपल्या पुढील विश्लेषणाला अत्यावश्यक आहे.

### कृत्रिम प्रजनन


एकाच उदराच्या गटातून एक अगदी शांत व दुसरी अतिशय भांडकुदळ अशा पोटजाती तयार करावयाच्या आहेत असे धरू या. अशा कार्यक्रमाला सुरवात करताना या गटातील प्रत्येक उंदराचा भांडकुदळपणा कितपत आहे याचे मोजमाप करावे लागेल. उदाहरणार्थ, एक उंदीर दिवसभरात दुसऱ्या उंदरांना किती वेळा चावतो हे पाहून त्यातील जास्तीतजास्त चावरे उंदीर हे अधिक भांडकुदळ असे मानता येईल. आपले प्रजनन यशस्वी व्हावयाचे असेल तर असे मोजमाप त्या उंदरांच्या आनुवंशिक गुणधर्मांशी मिळते जुळते पाहिजे. जर सर्व उंदीर सारख्याच परिस्थितीत वाढले असतील तरच त्याचा कमीजास्त भांडकुदळपणा परिस्थितीजन्य नसून आनुवंशिक आहे असे मानता येईल. आता हे उंदीर सर्वसाधारणत: सारख्या परिस्थितीत वाढलेले आहेत असे धरू या. त्यातील कमीतकमी भांडकुदळ असे उंदीर निवडून त्यांचे एकमेकात जनन करू. तसेच काही जास्तीतजास्त भांडकुदळ उंदीर निवडून त्यांची एकमेकांच्यात लग्ने लावून देऊ. या अतिरेकी उंदरांखेरीज मध्यम प्रतीचे उंदीर असतील त्यांना ठार करू किंवा निदान सक्तीचे ब्रह्मचर्य पाळायला लावू. पिढयान् पिढया हा कार्यक्रम चालू ठेवला तर लवकरच—म्हणजे साधारणत: दहा पिढयात—उंदरांच्या अतिशय शांत आणि अतिशय भांडकुदळ अशा पोटजाती आपण निर्माण करू शकू. मात्र या कार्यक्रमाच्या यशासाठी पुढील अटी पाळल्या जाणे आवश्यक आहे.

१. भांडकुदळपणाचे मापन व्यवस्थित झाले पाहिजे.

२. सर्वांना समान परिस्थितीत वाढवले पाहिजे.

३. अगदी थोडया विविक्षित गुण असलेल्या व्यक्तींनाच प्रजोत्पादन करू दिले पाहिजे.

४. वरील तीन्ही अटी पिढयान्



पिढ्या सातत्याने पाळल्या गेल्या पाहिजेत.

## माणसातील आनुवंशिक भेद

जीवसृष्टीचाच एक भाग असलेल्या मनुष्य प्राण्यात आनुवंशिक भेद मोठ्या प्रमाणावर आढळतात. डोळ्यांचा रंग, लठ्ठ होण्याची प्रवृत्ती असे अनेक गुणधर्म आनुवंशिक असल्याचे आपल्या नजरेस नेहमीच येते. शास्त्रीय संशोधनातून अशा शारीरिक गुणधर्मांची आनुवंशिकता पूर्णपणे सिद्ध झालेली आहे. याखेरीज अनेक मानसिक गुणधर्मही काही प्रमाणात आनुवंशिक असल्याचे आढळून आले आहे. उदाहरणार्थ, बुद्धिमत्तेचे मापन करण्यासाठी मानसशास्त्रज्ञांनी बुद्धिक्षमता (intelligence quotient) नावाचे मोजमाप तयार केलेले आहे. कोणत्याही व्यक्तीला विविक्षित कसोट्या देऊन तिची बुद्धिक्षमता ठरवता येते. आता या कसोट्या बुद्धीचे नक्की कोणते पैलू मोजतात हा प्रश्न वादग्रस्त आहे. परंतु हे मोजमाप कोणत्या तरी मानसिक गुणधर्माचे गमक आहे हे निश्चित. अशी मोजलेली बुद्धिक्षमता किती हिश्श्याने आनुवंशिक आहे व किती हिश्श्याने बाह्य परिस्थितीवर अवलंबून आहे याचा बराच अभ्यास झाला आहे. तंतोतंत सारखी असणारी जुळी भावंडे व सख्खी भावंडे कधी कधी वेगळ्या घरात वाढवली जातात. अशा भावंडांचा काळजीपूर्वक अभ्यास करून ही बुद्धिक्षमता कितपत आनुवंशिक आहे हे ठरवणे शक्य आहे. बुद्धिक्षमता ही मोठ्या प्रमाणात आनुवंशिक असते असा या अभ्यासाचा निष्कर्ष आहे. जर आनुवंशिकदृष्ट्या अगदी सारख्या बुद्धीची मुले अगदी वेगळ्या परिस्थितीत वाढली तरी त्यांच्या बुद्धिक्षमतेत साधारणत: सत्तर टक्के साधर्म्य शिल्लक राहते. इतरही अनेक मानसिक प्रवृत्ती काही अंशी आनुवंशिक असल्याचे आढळून आले आहे. यांच्यात अंतर्मुख वा बहिर्मुख प्रवृत्ती, चित्तदाह, उदासीनता आणि मनोभाजनासारखे मानसिक आजार होण्याची प्रवृत्ती यांचा समावेश आहे.

## वांशिक भेद

वेगवेगळ्या मानववंशाची तुलना करता त्यांच्यात आनुवंशिक फरक आढळून येतात. उदाहरणार्थ, मंगोलियन वंशाच्या चिनी-जपानी लोकांचे डोळे बारीक, कांति पिवळट, गालाची हाडे उंच व केस काळे आणि सरळ असतात, तर आफ्रिकेतील निग्रोंची त्वचा काळी, केस कुरळे, ओठ जाड व हातपाय लांब असतात गेली काही लक्ष वर्षे या वेगवेगळ्या वंशाचे लोक वेगवेगळ्या नैसर्गिक परिस्थितीत रहात आहेत. या नैसर्गिक परिस्थितील भेदातूनच वेगवेगळ्या वंशातील फरक निर्माण झाले आहेत. हे कसे निर्माण झाले असतील हे त्वचेच्या रंगाच्या संदर्भात समजावून घेऊ. सामान्यत: उष्ण प्रदेशातील लोक काळे व थंड प्रदेशातील लोक गोरे असतात. असे फरक उष्ण प्रदेशात काळ्या कातडीमुळे व थंड प्रदेशात गोऱ्या कातडीमुळे काही खास फायदा होत असला तर निर्माण होतील. अशा

पद्धतीचा फायदा अनेक प्रकारे मिळू शकेल. यातील एक माहिती असलेला घटक म्हणजे पारजम्बु (ultra violet) किरणांचा परिणाम. हे किरण उष्ण प्रदेशात जास्त प्रमाणात जमिनीपर्यंत पोचतात, तर थंड प्रदेशात या किरणांचा पुरवठा कमी असतो. हे किरण कातडीखाली वाजवीपेक्षा जास्त प्रमाणात पोचल्यास त्यातून त्वचेचा कर्करोग निर्माण होण्याची भीति असते; परंतु त्यांचा पुरवठा कमी झाल्यास शरीरात पुरेसे ' ड ' जीवनसत्व निर्माण होत नाही. आपल्या कातडीतील रंगद्रव्य हे किरण शोषून घेतात. पारजम्बु किरणांचा जास्त मारा असतो तेथे ते कातडीत शोषले जाणे अवश्य असते, एरवी त्वचेचा कर्करोग होण्याचा धोका असतो. यामुळे उष्ण प्रदेशात कातडीत भरपूर रंगद्रव्य असणे श्रेयस्कर आहे. उलट थंड हवेच्या प्रदेशात मुळातच कमी असलेले पारजम्बु किरण कातडीखाली पुरेशा प्रमाणात पोचण्यासाठी कमी रंगद्रव्य असण्याची आवश्यकता आहे.

उष्ण प्रदेशात राहणाऱ्या माणसांवर गेल्या हजारो पिढ्या सूर्यकिरणांचा भरपूर मारा सतत चालू आहे. अशा समाजात ज्या व्यक्ती जास्त उजळ असतील त्यांना त्वचेचा कर्करोग होण्याची शक्यता जास्त असते. अशा रोगग्रस्त व्यक्ती जगून त्यांना मुले होण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे त्यांचा उजळ रंग पुढील पिढीत कमी प्रमाणात उतरला जाईल. असे पिढ्यान् पिढ्या होत राहिल्यावर उजळ रंगाची प्रवृत्ती उष्ण प्रदेशातून पूर्णपणे नाहीशी होणे अपेक्षित आहे. हा नैसर्गिक क्रम अनेक दृष्टीने कृत्रिम प्रजननासारखाच आहे. नैसर्गिकरीत्या असे बदल होण्यास कृत्रिम प्रजननाप्रमाणेच पुढील चार अटी पूर्ण झाल्या पाहिजेत.

(१) कमी जास्त गुणधर्मांचे मोजमाप निसर्गातर्फे झाले पाहिजे. उदाहरणार्थ, कमीजास्त उजळ व्यक्तींना कमीजास्त कर्करोग झाला पाहिजे.

(२) कमीजास्त उजळपणा हा आनुवंशिक गुणधर्मांशी निगडित पाहिजे. सर्व व्यक्तींना साधारण सारख्याच प्रमाणात ऊन लागल्यास ही अट पुरी होईल.

(३) काही विशिष्ट व्यक्तींचे प्रजोत्पादन इतरांपेक्षा जास्त पाहिजे. उदाहरणार्थ, कर्करोगाची भीती कमी असलेल्या जास्त काळसर व्यक्तींचे प्रजोत्पादन जास्त असावे.

(४) हे फरक पिढ्यान् पिढ्या टिकून राहिले पाहिजेत.

एकूण नैसर्गिक बदलासाठी आवश्यक असलेल्या अटी कृत्रिम प्रजननासाठी आवश्यक असलेल्या अटींसारख्याच आहेत. तथापि नैसर्गिक परिस्थितीत या अटी कृत्रिम परिस्थितीइतक्या काटेकोरपणे पाळल्या जाणार नाहीत. विशेषत: कृत्रिम प्रजननांत काही निवडक व्यक्तींनाच प्रजोत्पादन करू देऊन इतरांना पूर्ण खच्ची करणे शक्य असते. नैसर्गिक परिस्थितीत प्रजोत्पादनातील फरक इतके मोठे असत

नाहीत. त्यामुळे कृत्रिमरीत्या जे बदल दहा-वीस पिढयांत निर्माण होतात, ते बदल नैसर्गिक परिस्थितीत निर्माण होण्यास शेकडो पिढयांचा कालावधी जावा लागतो. भूगर्भशास्त्रज्ञांना प्राण्यांचे जे अश्मीभूत अवशेष (fossils) सापडतात, त्यावरून अशा कालमानाचा अंदाज बांधता येतो. नैसर्गिक बदलास पाचशे ते हजार पिढ्या तरी लागतात असा या अभ्यासाचा निष्कर्ष आहे.

निरनिराळ्या वंशांत जसे अनेक शारीरिक फरक निर्माण झालेले आहेत, तसेच मानसिक फरकही निर्माण होऊ शकतील. अमेरिकेच्या गवताळ मुलखांतील रेड इंडियन गव्यासारख्या मोठ्या पशूंची शिकार करूनच रहात. शिकार करणे एकट्यादुकट्याचे काम नव्हे. तेव्हा रेड इंडियनांच्यात यशस्वी शिकार करण्यास समूहप्रिय प्रवृत्ती फायदेशीर ठरेल. जर (१) अमेरिकेत समूहप्रिय व्यक्ती शिकारीत जास्त यशस्वी होत असल्या, (२) त्यामुळे जास्त खायला मिळून त्यांची शरीरप्रकृती अधिक धडधाकट राहिली, (३) त्यामुळे त्यांना जास्त बायका मिळाल्या व जास्त मुले झाली आणि (४) ही परिस्थिती पिढ्यान् पिढ्या सतत टिकून राहिली, तर त्यांच्या वंशात समूहप्रियता सतत वाढत राहील. या उलट ऑस्ट्रेलियातील आदिवासी मोठ्या पशूंची शिकार जवळजवळ करीत नाहीत. ते मुख्यत: कंदमुळे, कीटक व बारीक पशू खाऊन राहतात. अशा वैयक्तिक शिकारीस एकलकोंडी प्रवृत्ती जास्त उपयुक्त ठरेल व या वंशात एक्कलकोंडी मनोवृत्ती निसर्गत: वाढत राहू शकेल. हे फरक शेकडो पिढ्या टिकले तर या दोन वंशात आनुवंशिक मानसिक फरक निर्माण होऊ शकतील.

## वांशिक उच्चनीचता

अशा रीतीने वंशावंशांत मानसिक फरकही असू शकतील. परंतु हे फरक अजमावणे व त्यातील आनुवंशिकतेचा हिस्सा ठरवणे फार अवघड आहे. आज या विषयावर काहीही निश्चित माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे वंशावंशांत आनुवंशिक मानसिक फरक आहेतच किंवा नाहीतच असे ठासून विधान करणे अशास्त्रीय ठरेल. समजा, असे फरक असले तरी मानवाचे व्यक्तिमत्त्व इतके गुंतागुंतीचे व समृद्ध आहे की त्यात एकाला वरिष्ठ व दुसऱ्याला कनिष्ठ ठरवणे चूक आहे. फार तर एका विशिष्ट गुणात एकाहून दुसरा कमी आहे असे आपण म्हणू शकू. हाच नियम जास्तच मोठ्या प्रमाणात मानवसमाजांना आणि वंशांना लागू होतो. मानवी समाजात व वंशात इतकी विविधता आढळते की एक संपूर्ण समाज दुसऱ्या समाजापेक्षा श्रेष्ठ असे म्हणणे अयोग्य ठरेल.

मानवसमाजातील गटांची उच्चनीचता ही केवळ कोणाच्या हाती किती सत्ता असते यावर ठरवली जाते. सत्तेच्या दृष्टीने वरचढ असलेला गट

स्वत:ला इतर गटांहून साहजिकच वरिष्ठ समजतो; परंतु नैसर्गिक उत्क्रांतीस लागणाऱ्या कालमानाच्या तुलनेने सत्ता ही अगदी क्षणभंगुर असते. त्यामुळे सत्तास्पर्धेतील वर्चस्व हे आनुवंशिक वरिष्ठतेवर अवलंबून असणे केवळ अशक्य आहे. एखाद्या गटास सत्ताप्राप्ती होते ती तात्कालीन विशिष्ट परिस्थितीमुळेच होते अशी इतिहासाची साक्ष आहे. परिस्थिती प्रतिकूल झाल्यावर त्या गटाचे वर्चस्व नाहीसे होते व एकदा वरचढ असलेले समाज काही पिढ्यातच नेस्तनाबूत झालेले अनेकदा आढळतात. एकेकाळी पूर्व युरोपीयांवर वरचढ असलेले तुर्की आता त्यांच्यापुढे नमलेले आहेत. पश्चिम युरोपीयांना पराभूत करणारे अरब त्यानंतर त्यांच्याच पारतंत्र्यात कित्येक पिढ्या होते. चिन्यांवर हल्ला चढवणारे जपानी आता त्यांची सलोखी करू पहात आहेत.

## जातींचा उगम

इसवी सनापूर्वी पंधराव्या शतकाच्या सुमारास आर्य टोळ्यांचा ओघ भारताकडे सुरू झाला. हे आर्य मध्य आशियातील गुराखी लोक होते. ते प्रथम भारतात आले तेव्हा सिंधू नदीच्या खोऱ्यात मोहोंजदारो-हरप्पाची उच्च नागर संस्कृती नांदत होती आणि भारताच्या रानावनात अनेक आदिवासी टोळ्या रहात होत्या. आर्यांनी नागर संस्कृतीच्या लोकांना दस्यु आणि शिकारी टोळ्यांना नाग असे नाव दिले. आर्यांजवळ घोडा हे वेगवान वहान होते, लोखंडी हत्यारे होती. आणि भटक्या गुराखी टोळ्यांची चढाऊवृत्ती होती. यांच्या बळावर त्यांनी दस्यु आणि नाग लोकांवर वर्चस्व स्थापन केले. हे त्यांचे वर्चस्व काही आनुवंशिक वरिष्ठतेमुळे प्राप्त झाले नसून त्यांच्या मध्य आशियातील विशिष्ट परिस्थितीमुळे प्राप्त झाले हे उघड आहे.

आर्यांच्या आगमनाच्यावेळी भारतातील कोणत्याच समाजात जातिसंस्था नव्हती. आर्य, दस्यु व नाग यांच्या मिश्रणाने बनलेल्या समाजात ही संस्था हळूहळू उत्पन्न झाली. काही अंशी या जाती वेगवेगळ्या उपवंशातून निर्माण झाल्या, तर काही अंशी त्या व्यवसायामधून निर्माण झाल्या. या जातीसंस्थेत आर्य टोळ्यांनी साहजिकच उच्च जातींचा मक्ता घेतला. स्थायिक झालेल्या समाजात उशिरा-उशिरा सामावल्या गेलेल्या शिकारी टोळ्यांपासून शूद्र जाती निर्माण झाल्या. आर्य, दस्यु आणि नाग हे सर्व कोकेशियन या मानववंशाचे भाग आहेत. परंतु हजारो पिढ्या वेगळ्या परिस्थितीत राहिल्यामुळे त्यांच्यात अनेक फरक निर्माण झालेले होते निरनिराळ्या जातीत या निरनिराळ्या उपवंशांचे रक्त कमी जास्त प्रमाणात मिसळले गेल्याने जातीजातींतही असे फरक निर्माण झाले. मानववंशशास्त्रज्ञांनी जातीजातीतील शारीरिक फरकांचा अभ्यास बारकाव्याने केला असून त्यांना अनेक जातीत काही ना काही फरक आढळून आले आहेत. हे फरक त्या जाती वेगवेगळ्या उपवंशापासून निर्माण झाल्यामुळे दिसून

येतात असा त्यांचा निष्कर्ष आहे. जाती जातींत केवळ असे वंशोद्भव फरक असतील तर एखादी जात वरिष्ठ किंवा कनिष्ठ असे म्हणण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

प्रत्येक जातीत त्या त्या जातीच्या व्यवसायाला पोषक अशी आनुवंशिक गुणवत्ता निर्माण झाली असेल तर मात्र त्यातून जातीजातींची आनुवंशिक उच्चनीचता संभवते. तेव्हा प्रत्येक जातीच्या व्यवसायामुळे किंवा ज्याला जातिधर्म म्हणता येईल त्यामुळे त्या जातीच्या आनुवंशिक घटनेवर काय परिणाम होईल हे पहाणे आवश्यक आहे.

### जातिधर्माचा परिणाम

या प्रश्नाचा साकल्याने विचार करता प्रत्येक जातीत त्याला जातीच्या व्यवसायाला पोषक असे आनुवंशिक गुणधर्म निर्माण झाले असतील अशी शक्यता वाटत नाही. कारण :

(१) ज्या ज्या जातींचा उगम वेगवेगळया उपवंशांतून झाला, त्या त्या जातींतील फरक हे त्या उपवंशाच्या मूळ परिस्थितीतील फरकांमुळे निर्माण झालेले असल्याने ते जातींच्या विविक्षित व्यवसायांना पोषक असण्याची शक्यता नाही. उदाहरणार्थ, अनेक शूद्र जाती भारताच्या रानात राहणाऱ्या शिकारी टोळयांपासून निर्माण झाल्या असाव्यात. त्यांच्यात जी आनुवंशिक वैशिष्टये असतील, ती हजारो पिढया शिकारी आयुष्यक्रम कंठल्याने नैसर्गिक बदलातून निर्माण झालेली व शिकारी पेशास पोषक अशीच असतील. उच्चजाती ज्यातून निर्माण झाल्या त्या आर्य टोळयांची आनुवंशिक वैशिष्टये ही त्यांच्या मूळच्या गुराखी पेशास अनुरूप असतील. सत्तास्पर्धेत हरल्यामुळे भंगी-कामासारखे हलके व्यवसाय हा शूद्रांचा जातीधर्म बनला. अशा रीतीने लादल्या गेलेल्या जातिधर्माला पोषक अशी वैशिष्टयें त्यांच्या आनुवंशिक घटनेत उच्च जातीतील लोकांपेक्षा जास्त प्रमाणात असण्याची सुतराम् शक्यता नाही.

(२) ज्या जातींचा उगम हा व्यवसायातून झाला त्या जाती, तसेच वेगवेगळया उपवंशातून निर्माण झालेल्या जातीही त्यांचा जातिविशिष्ट व्यवसाय गेल्या शे-दीडशे पिढया सातत्याने अनुसरत आहेत. माणसाची संस्कृती अतिशय लवचिक असल्याने प्रत्येक जातीत त्या त्या जातीच्या व्यवसायाला अनुरूप अशी संस्कृती जातिसंस्थेच्या स्थापनेनंतर थोडयाच पिढयांत निर्माण झाली असावी. अशा संस्कृतीचा जातीच्या आनुवंशिक गुणधर्मांवर प्रत्यक्ष परिणाम होतो असा समज मोठया प्रमाणावर प्रचलित आहे. बाह्य संस्कारांचा आनुवंशिक तत्त्वावर प्रत्यक्ष परिणाम होतो हा समज साहजिक आहे आणि मेंडेलच्या संशोधनावर आधारलेले अनुवंशशास्त्र विसाव्या शतकांत निर्माण होईपर्यंत तो सर्वत्र मान्य केला गेला होता. या समजाप्रमाणे कोणत्याही प्राण्याचे आनुवंशिक तत्व (DNA) हे बाह्य परिस्थितीला अनुरूप अशाप्रकारे, त्या

परिस्थितीच्या प्रत्यक्ष परिणामाने बदलले जाते आणि असा बदल DNA तच झाल्याने तो लगेच पुढच्या पिढीत उतरतो. हे खरे असते, तर बाह्य संस्कारांचा परिणाम होऊन काही पिढ्यांतच जातींची आनुवंशिक घटना त्या जातीच्या व्यवसायाला अनुरूप अशी बनली असती. परंतु आधुनिक अनुवंशशास्त्राच्या ज्ञानाप्रमाणे बाह्य परिस्थितीमुळे DNA त असे बदल बिलकूल घडून येत नाहीत, आणि म्हणून बाह्य परिस्थितीचा अनुवंश तत्त्वावर असा प्रत्यक्ष परिणाम होऊ शकत नाही. बाह्य परिस्थितीचा परिणाम हा अप्रत्यक्ष असतो. त्वचेच्या रंगाच्या संदर्भात सांगितल्याप्रमाणे काही विविक्षित गुणधर्मांच्या व्यक्तींनी जास्त प्रमाणांत प्रजोत्पादन केल्यास ते गुणधर्म असलेल्या व्यक्तींचे प्रमाण समुदायांत वाढत जाऊन संपूर्ण समुदायाची आनुवंशिक घटना ही बाह्य परिस्थितीला अनुरूप अशाप्रकारे हळूहळू बदलू शकते.

(३) याचा अर्थ असा की जातीजातींत त्यांच्या व्यवसायाला पोषक असे खास गुणधर्म निर्माण होण्यास त्या जातीच्या व्यवसायाला आनुवंशिकदृष्ट्या विशेष लायक अशा लोकांची प्रजोत्पत्ती इतरांपेक्षा पिढ्यान्‌पिढ्या जास्त असली पाहिजे. परंतु मानवसमाजांत एखाद्या व्यक्तीचे प्रजोत्पादन हे त्याच्या कुळाच्या सामाजिक स्थानावर बऱ्याच प्रमाणांत अवलंबून असल्याने आनुवंशिक गुणधर्माचा आणि प्रजोत्पादनाचा असा मेळ जमणे अवघड होते.

उदाहरणार्थ, वेदादिग्रंथ स्मरणांकित करून सांभाळणे हे ब्राह्मणांचे महत्त्वाचे कर्तव्य होते. तेव्हा ज्याची स्मरणशक्ती तल्लख तो चांगला ब्राह्मण असे समजण्यास हरकत नाही. वर चर्चा केल्याप्रमाणे ब्राह्मणजातीत स्मरणशक्तीचा तल्लखपणा सातत्याने वाढवयाचा असेल तर खालील अटी पुऱ्या होणे आवश्यक आहे.

(अ) जन्मजात स्मरणशक्ती तल्लख असलेली मुले जन्मजात स्मरणशक्ती तल्लख नसलेल्या मुलांपासून वेगळी ओळखता आली पाहिजेत.

(आ) अशा तल्लख मुलांनी इतरापेक्षा जास्त प्रमाणावर प्रजोत्पादन केले पाहिजे.

(इ) असे प्रजोत्पादनातील फरक पिढ्यान्‌ पिढ्या टिकून राहिले पाहिजेत.

पहिल्या दोन अटींप्रमाणे अगदी दरिद्री कुटुंबात जर एखादा तल्लख स्मरणशक्तीचा मुलगा जन्मला तर त्याच्या जन्मजात गुणांना तावडतोब मान्यता मिळून त्याच्या उत्तम शिक्षणाची सोय झाली पाहिजे. अशा शिक्षणाने ती घनपाठी बनला की समाजात त्याला मान्यता मिळून पुष्कळ लोकांनी त्याला आपल्या मुली बायका म्हणून दिल्या पाहिजेत आणि या बायकांना भरपूर मुले झाली पाहिजेत. या उलट जर एखाद्या राजमान्य श्रीमंत कुटुंबात मठ्ठ मुलगा जन्मला तर त्याच्या बापाला त्याला उच्चपदी पोचवणे अशक्य असले पाहिजे. त्या मुलाने आपल्या मठ्ठपणाला

साजेसे असे ब्रह्मचर्य जन्मभर पाळले पाहिजे. शिवाय, तिसऱ्या अटीप्रमाणे ही परिस्थिती सातत्याने टिकून राहिली पाहिजे. केवळ दोन-तीन हजार वर्षांपूर्वी काही पिढ्या ही परिस्थिती असली तर तिचा काहीच परिणाम आज शिल्लक असणार नाही. ही परिस्थिती नष्ट झाल्यावर त्यावेळी निर्माण झालेले फरक तेव्हाच नाहीसे होतील. आता हिंदुसमाजाच्या इतिहासात या तीन अटी पाळल्या गेल्या असणे फार कठीण आहे. मृच्छकटिकातील हुषार परंतु दरिद्री ब्राह्मणाची स्थिती विचारात घेता अशा दरिद्री कुटुंबातल्या गुणवान् व्यक्तींना आपला विकास करून घेण्याची संधि विशेषसी मिळाली असेल असे वाटत नाही. (ई) जातिव्यवस्था ही आर्य भारतात आल्यानंतर निर्माण झाली व बुद्ध कालानंतर तिला आजचे स्वरूप आले. म्हणजे या गोष्टीस फार तर शंभर-सव्वाशे पिढ्या लोटल्या असाव्यात. कृत्रिम प्रजननात एवढ्या पिढ्यात वाटेल तेवढे बदल घडवता आले असते. परंतु आपण वर पाहिल्याप्रमाणे कृत्रिम प्रजननात अगदी निवडक म्हणजे एखाद्या टक्का व्यक्तींनाच प्रजोत्पादन करू दिले जाते, जातीव्यवस्थेच्या इतिहासात अशी परिस्थिती निश्चितच नव्हती. तेव्हा जातीव्यवस्थेमुळे झालेले बदल हे फार तर नैसर्गिक बदलाच्या गतीने घडू शकतील. भूगर्भशास्त्राच्या पुराव्याप्रमाणे असे अर्थपूर्ण बदल होण्यास पाचशे ते हजार पिढ्या तरी सहज लोटाव्या लागतात. जातिसंस्थेच्या शंभर-सव्वाशे पिढ्यात काहीही मोठे नैसर्गिक बदल घडून येण्यास तोकड्या आहेत.

## जातिसंकराचे परिणाम

वेगवेगळ्या जातीत थोड्याफार प्रमाणात आनुवंशिक फरक आढळून येतात. तसेच कोणत्याही जातीतील आनुवंशिक विविधता ही संपूर्ण समाजातील आनुवंशिक विविधतेपेक्षा कमीच असते. आंतरजातीय विवाहातून जी प्रजा निर्माण होईल तिच्यामध्ये ही आनुवंशिक विविधता जास्त प्रमाणात असेल. अशी जास्त आनुवंशिक विविधता असलेली प्रजा नेहमीच जास्त सुदृढ निपजते असा अनुवंशशास्त्राचा अनुभव आहे. जातिसंकरापासून निर्माण झालेली प्रजा अशीच जास्त सुदृढ निपजावी.

## निष्कर्ष

मानव जातीत आनुवंशिक विविधता —पाहिजे तर विषमता म्हणा—मुबलक आहे. अशी विविधता शारीरिक आणि मानसिक या दोनही—गुणधर्माबाबत आढळते. याच्याच जोडीला परिस्थितिजन्य विविधतेची भर पडून मानवाचे सपन्न व्यक्तिमत्व निर्माण होते. हे व्यक्तिमत्व इतके गुंतागुंतीचे आहे की त्यात कोणाला उच्चनीच ठरवणे वेडगळपणाचे आहे. विशेषतः संपूर्ण समाजांना उच्चनीच ठरविणे हे तर पूर्णपणे अशास्त्रीय आहे.

आजचा हिंदूसमाज हा वेगवेगळ्या उपवंशापासून बनलेला आहे. हजारो पिढ्या वेगळ्या परिस्थितीत राहिल्यामुळे आर्य व नाग यासारख्या लोकांत आनुवंशिक फरक निर्माण झाले होते.

पुढे या वेगवेगळ्या उपवंशांतून जाती निर्माण झाल्यावर जाती-जातीतही हे आनुवंशिक फरक उतरले गेले. तथापि हे वांशिक फरक त्या त्या जातीच्या व्यवसायाला योग्य असे फरक असण्याचे काहीच कारण नाही.

जातीजातीच्या संस्कृतीत त्या त्या जातीच्या व्यवसायाला पोषक असे फरक निर्माण झाले आहेत. परंतु बाह्य संस्काराचा आनुवंशिक तत्त्वावर प्रत्यक्ष परिणाम होत नसल्याने हे फरक जातीच्या आनुवंशिक घटनेत उतरणार नाहीत. जातिधर्माला पोषक असे बदल नैसर्गिकरीत्या घडून येण्यास जातीच्या विशिष्ट व्यवसायाला योग्य गुण असलेल्या व्यक्तींना त्यांच्या कुळाचे सामाजिक स्थान काहीही असले तरी इतराहून जास्त प्रजोत्पादनाची संधि मिळाली पाहिजे. इतिहासांत हे सातत्याने घडले असणे कठीण आहे. आणि घडले असले तरी त्यातून अर्थपूर्ण बदल होण्यास पाचशे-हजार तरी पिढ्या लागतील. जाती निर्माण झाल्यास एवढा काळ लोटलेला नाही. एवंच जाती-जातीत फरक असले तरी ते त्याच्या व्यवसायाला खास पोषक असे फरक असणार नाहीत; आणि आनुवंशिकतेच्या दृष्टीने जातीचे काहीच समर्थन करता येत नाही. उलट जाती नष्ट झाल्यास जातिसंकरातून जी प्रजा निर्माण होईल ती मात्र आनुवंशिक दृष्टया जास्त सुदृढ असण्याचा संभव आहे. ●

पूरक वाचन–

1. Ambedkar B. R. Who Are the Sudras ? Thacker and Co., Bombay ( 1946 ).

2. Dobzansky, Th. Mankind Evolving. Columbia University Press, New york ( 1962 ).

3. Ghurye G. S. Caste and Class in India. Popular, Bombay (1957).

4. Kosambi D. D. An Introduction to the Study of Indian History. Papular, Bombay (1956).

5. Lerner I. M. Heredity, Evolution and Society. W. H. Freeman, San Fransisco (1968).

6. Parsons P. A. Genetic Analysis of Behaviour. Methuen, London (1967).

7. Simpson G. G. Meaning of Evolution. Yale Univesity Press, New Haven (1949).

● ● ●

# मागासलेले वर्ग, घटनात्मक तरतूद व इतर सवलती

रा. प. नेने

१. मागासलेल्या वर्गांवर होणाऱ्या अन्यायांपैकी अस्पृश्यता हा एक अत्यंत घोर अन्याय आहे. या अन्यायाला शासकीय मान्यता नसल्याची ग्वाही देण्याकरिता भारतीय राज्य घटनेतील कलम १७ (भाग ३) प्रमाणे अस्पृश्यता संपूर्णतया नष्ट झाल्याचे जाहीर करण्यात आले आहे. या कलमास अनुसरून संसदेत मान्य करण्यात आलेल्या कायद्याने अस्पृश्यता पाळणे हा हस्तक्षेपी आणि दंडनीय गुन्हा ठरविण्यात आला आहे.

२. घटनेतील भाग १६ मधील कलमानुसार (कलम ३३०, ३३२, ३३४, ३३५, ३३८, ३३९, ३४१, ३४२) व या कलमानुसार करण्यात आलेल्या ठरावानुसार मागासलेल्या वर्गांच्या हितरक्षणाकरिता काही तरतुदी करण्यात आल्या आहेत त्याचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे :

(अ) लोकसभा व विधानसभा यांच्या निवडणुकांच्यावेळेस अनुसूचित जाती व जमाती यांच्या उमेदवाराकरिता त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार जागा राखून ठेवल्या पाहिजेत. या तरतुदीची मुदत घटना सुरू झाल्यापासून (२६–१–५०) दहा वर्षेपर्यंत असावी असे आरंभी ठरविण्यात आले होते. परंतु पुढे करण्यात आलेल्या दुरुस्तीनुसार ही मुदत आता घटना सुरू झाल्यापासून तीस वर्षेपर्यंत असावी असे ठरविण्यात आले आहे.

(आ) मध्यवर्ती सरकारच्या नोकऱ्यांचे बाबतीत प्रत्यक्ष खात्यामार्फत नोकऱ्यांसाठी भरणा करण्यात येणार असेल तर अनुसूचित जातीसाठी १२½ टक्के जागा राखून ठेवल्या पाहिजेत. प्रत्यक्ष खात्यामार्फत जर या नेमणुका होणार नसतील अथवा खुल्या स्पर्धेने जर नेमणुका होणार नसतील तर १६⅔ टक्के जागा अनुसूचित जातींकरिता राखून ठेवल्या पाहिजेत. अनुसूचित जमातीकरिता ५ टक्के जागा राखून ठेवल्या पाहिजेत.

(इ) नोकरीकरिता नेमणूक करताना कमाल वयोमर्यादेची जर अट असेल तर अनुसूचित जाती-जमातींचे बाबतीत ही वयोमर्यादा तीन वर्षांनी वाढविण्यात यावी. (महाराष्ट्रात ५ वर्षांनी वाढविण्यात आली आहे)

(ई) नोकऱ्यांकरिता निवड करताना जर परीक्षा घेण्यात येणार असेल

व या परीक्षेकरिता काही शुल्क असेल किंवा अन्य कोणत्या कारणाकरिता जर शुल्क असेल तर नेमलेल्या शुल्काच्या ½ रक्कम अनुसूचित जातीच्या व जमातींच्या उमेदवारांकडून घेण्यात यावी.

(उ) अनुसूचित जाती व जमाती यांच्या हिताचे रक्षण होत आहे किंवा नाही व त्यांच्याकरिता करण्यात आलेल्या तरतुदींची अंमलबजावणी होते की नाही याचेवर देखरेख ठेवण्याकरिता एका खास अधिकाऱ्याची नेमणक करण्यात यावी.

(ऊ) अनुसूचित जाती व जमातींची राज्यवार विस्तृत यादी करण्यात यावी. (१९५० साली एक प्राथमिक यादी करण्यात आली व १९५६ मध्ये दुसरी अधिक विस्तृत यादी करण्यात आली आहे.)

(ए) घटना सुरू झाल्यापासून दहा वर्षांनी अनुसूचित जमातींच्या परिस्थितीबद्दल व या जमाती ज्या विभागात विशेषत्वेकरून रहातात त्यातील शासकीय कारभाराबाबत अहवाल तयार करण्याकरिता एका आयोगाची नेमणूक करण्यात यावी. (श्री काकासाहेब कालेलकरांच्या अध्यक्षतेखाली अशा आयोगाची नेमणूक करण्यात आली होती)

(ऐ) अनुसूचित जमातींच्या खास हितरक्षणाकरिता काही भागात इतर लोकांच्या मुक्त संचाराच्या हक्कांवर योग्य बंधने घालण्याचा अधिकार सरकारकडे राखून ठेवण्यात आला आहे.

(ओ) अनुसूचित जमातींच्या हितसंवर्धनाकरिता आखण्यात येणाऱ्या योजनांची योग्य तऱ्हेने अंमलबजावणी करण्याकरिता राज्य सरकारांना आदेश देण्याचे अधिकार मध्यवर्ती सरकारकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

मागासलेल्या वर्गांच्या प्रगतिकरिता मुख्यत: महाराष्ट्र राज्य पातळीवर काही कल्याणकारी योजना आखण्यात आल्या आहेत व सवलती देण्यात आल्या आहेत त्यांचा संक्षिप्त तपशील पुढीलप्रमाणे :

१. शैक्षणिक : (अ) शासकीय शिक्षण संस्थामध्ये प्रवेशासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता काही जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत. त्यांचे प्रमाण खालीलप्रमाणे—

| | |
|---|---|
| ★ अनुसूचित जाती व (नव) बुद्ध. | १३% |
| ★ अनुसूचित जमाती | ७% |
| ★ विमुक्त जाती व भटक्या जमाती | ४% |
| ★ इतर मागासलेले वर्ग (एकूण १८८ जाती या वर्गात मोडतात) | १०% |

(आ) राज्यपातळीवरील सरकारी नोकऱ्यामध्ये निवड करण्याकरिता हेच प्रमाण राखून ठेवण्यात आले आहे.

(इ) अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यांना आरंभापासून शेवटपर्यंत कोणत्याही

प्रकारचे सरकारमान्य शिक्षण-शुल्क (प्रवेश फी, शिक्षण-फी, टर्म फी, वाचनालय फी, वैद्यकीय तपासणी फी इ.) व परीक्षा-शुल्क द्यावे लागत नाही. विद्यार्थी एकदा नापास झाला तरीसुद्धा ही सवलत चालू राहते.

(ई) राहाण्याचा व जेवणाचा खर्च, पुस्तके व लेखन-साहित्य खरेदी करण्याचा खर्च भागविण्यासाठी, शालान्त परीक्षेनंतर उच्च शिक्षणासाठी मध्यवर्ती सरकारतर्फे अनुसूचित जाती व जमातींकरिता शिष्यवृत्त्या ठेवण्यात आल्या आहेत. परीक्षेत प्रावीण्य(६०% गुण) मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना इतरांपेक्षा अधिक रकमेची शिष्यवृत्ति मिळते.

(उ) अनुसूचित जमाती व विमुक्त व भटक्या जमातींच्या विद्यार्थ्यांकरिता सरकारतर्फे काही जिल्ह्यांमध्ये आश्रमशाळा चालविण्यात येतात. त्यांत शेतीकाम, विणकाम, सूतकताई इत्यादी विषयांचे शिक्षण विनामूल्य घेता येते. आश्रमशाळांना जोडून असलेल्या वसतिगृहांत विद्यार्थ्यांना राहण्याची व जेवणाची सोय विनामूल्य केली जाते.

(ऊ) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निवांतपणे अभ्यास करिता यावा या करिता मुंबई, पुणे व नागपूर या शहरातून चालविण्यात येत असलेल्या विनामूल्य अभ्यासगृहांना सरकारी अनुदान मिळते.

(ए) शिक्षण घेत असलेल्या मागासलेल्या विद्यार्थ्यांकरिता शासनामार्फत वसतिगृहे चालविण्यात येतात. तसेच खासगी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या वसतिगृहांना काही अटींवर वेगवेगळ्या कारणांकरिता (इमारतीचे बांधकाम अथवा भाडे, विद्यार्थ्यांच्या जेवण-खाणाचा खर्च इ.) अनुदान देण्यात येते.

२. आर्थिक उन्नतीकरिता योजना:

(अ) सर्व मागासवर्गीयांना त्यांच्या विशिष्ट क्रमानुसार सरकारी पडीक जमिनीचे शेतीकरिता वाटप करण्यात येते.

(आ) शेतजमिनीच्या सुधारणेसाठी ज्या प्रकारची सुधारणा करणे आवश्यक असेल त्यानुसार ठराविक रक्कम मंजूर करण्यात येते. तसेच विहीर खोदणे, विहीर दुरुस्ती, अवजारे, ऑईल इंजिन, पंप इ. घेण्याकरिता कर्ज व अनुदान देण्याची तरतूद आहे.

(इ) सुधारलेल्या पद्धतीने शेती करण्याचे शिक्षण देण्याकरिता ठाणे जिल्ह्यात कोसबाड येथे एक शिक्षण केंद्र चालविण्यात येते.

(ई) शिवणकाम, सुतारकाम, दोरकाम, चामडीकाम, वेतकाम इ. व्यवसाय मागासवर्गीयांना शिकविण्याकरिता स्थायिक व फिरती शिक्षण केंद्रे चालविण्यात येतात.

(उ) सर्व मागास वर्गीयांसाठी वैयक्तिक व सहकारी घरबांधणीसाठी मदतीच्या काही योजना आहेत. त्यात विनामूल्य जमीन देण्यापासून तो घरबांधणीच्या खर्चाकरिता दीर्घ मुदतीचे बिनव्याजी कर्ज व अनुदान देण्यापर्यंत वेगवेगळ्या स्वरूपाची मदत दिली जाते.

३. वैद्यकीय मदत : वर्गीकृत क्षेत्रा तील अनुसूचित जमातींना वैद्यकीय मदत देणाऱ्या खासगी संस्थांना साधन-सामुग्री खरेदी करण्याकरिता व इतर खर्चाकरिता विशिष्ट प्रमाणात अनुदान देण्यात येते.

४. आंतरजातीय विवाह करणाऱ्या वधूवरांचा सरकारी खर्चाने सत्कार करण्यात येतो.

५. अनुसूचित जाती-जमातींकरिता बालवाड्या विनामूल्य चालविल्या जातात.

६. अस्पृश्यता निवारणासाठी महाराष्ट्रातील बहुसंख्य जिल्ह्यांत (२०) सरकारी सेवक नेमण्यात आले आहेत व स्वयंस्फूर्त संस्थांमार्फतही प्रचारक कामे करीत असतात. यांच्या मानधन इ. चा खर्च सरकारकडून दिला जातो.

७. अनुसूचित जमातींच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी १९६२ पासून एका संशोधनसंस्थेची स्थापना करण्यात आली आहे. तसेच अनुसूचित जमातींच्या समस्यांकडे अधिक तातडीने लक्ष पुरविले जावे याकरिता एक स्वतंत्र महासमिती निर्माण करण्यात आली आहे.

## हे सर्व असले तरी

वरील तरतुदी व विविध योजना यावरून मागासलेल्या वर्गांच्या समस्या बिकट आहेत व त्यावर उपाय-योजना करण्याची आवश्यकता आहे याची जाणीव शासनास आहे असे म्हणता येईल. परंतु निव्वळ जाणीव असल्याने अथवा सद्हेतूने प्रत्यक्ष हित साधता येते असे नाही. अंमलबजावणी जर चोख नसेल तर योजना कागदोपत्रीच रहातात किंवा त्यांचा लाभ फार मर्यादित लोकांनाच मिळतो. उदाहरणार्थ, अस्पृश्यता हा दंडनीय गुन्हा आहे, परंतु त्याबाबत आलेल्या तक्रारी नोंदवून घेण्यास जर पोलिसांनी नकार दिला, अथवा नोंदविल्यानंतर जर चौकशी रीतसरपणे करण्याकडे दुर्लक्ष केले तर कायद्याचे प्रत्यक्ष संरक्षण मिळत नाही. अलीकडे मागासवर्गीयांवर वेगवेगळ्या अयोग्य कारणांकरिता वेगवेगळ्या स्वरूपाचे हल्ले होत असल्याच्या बातम्या प्रसिद्ध होत असतात. प्रसिद्धी न मिळणारे गुन्हे यापेक्षा कितीतरी अधिक आहेत. यावरून कायद्याची अंमलबजावणी किती सदोष आहे हे लक्षात येईल.

कायदे जसे धाब्यावर बसविता येतात त्याचप्रमाणे योग्य अंमलबजावणीच्या अभावी योजनाही निष्प्रभ बनू शकतात. योजनांकरिता मंजूर असलेल्या रकमांचे वाटप कित्येकदा इतक्या उशीरा करण्यात येते की, दिलेल्या अवधीत त्या रकमा खर्च करणे अशक्य असते आणि म्हणून योजना अंमलात आणल्या जात नाहीत अथवा अर्धवटच अवस्थेत सोडून द्याव्या लागतात. वेगवेगळ्या पातळींवरील भ्रष्टाचारामुळे व नियमावलीच्या जंजाळाटामुळे गरीब अशिक्षित व्यक्तीस आपला योग्य ती मदत मागण्याकरिता केलेला अर्ज योग्य अधिकाऱ्यापर्यंत पोहोचविताही येत नाही. वर दिलेल्या

मलपृष्ठ २ वर

## मागासलेले वर्ग...

( पृष्ठ ८० वरून )

शेत-जमिनीच्या सुधारणेसाठी असलेली मदत १९६७–६८ साली फक्त ५३ शेतकऱ्यांना मिळाली, विहिरींसाठी वाटप करण्यात आलेल्या रकमांतून फक्त ३९ विहिरी खोदता अगर दुरुस्त करता आल्या आणि ऑईल एंजिन्स् व पंप फक्त २१ शेतकऱ्यांना मिळाले, यावरून अधिक कोणाला या योजनांची गरज भासत नव्हती असे मानणे हास्यास्पद ठरेल.

वर्षानुवर्षे दडपले गेलेले लोक केवळ औपचारिक शालेय अथवा विद्यालयीन शिक्षण मिळाल्याने उच्चवर्णीयांशी सर्व बाबतीत अकस्मातपणे तुल्यबलाने स्पर्धा करू शकतील अशी अपेक्षा ठेवणे योग्य ठरणार नाही. म्हणून नोकऱ्यांवर नेमणूक करीत असताना चाचणीचेबाबत जर सहानुभूतीची दृष्टी नसेल तर गुण-वत्ता तुलनेने अपुरी या सबबीखाली निवड करण्याचे बाबत शक्य तेवढे दिवस टाळाटाळ करणे अधिकाऱ्यांस सहज शक्य असते. निवड झाल्यानंतर जबाबदारीची कामे देण्याचे मुद्दाम टाळणे हेही तितकेच शक्य असते.

घरबांधणीकरिता अथवा शेतीकरिता ग्रामपंचायतीच्या कक्षेतील जमीन मागासवर्गीयांना देण्यास ग्रामपंचायती-वर निवडून आलेले प्रगत वर्गांचे प्रति-निधी कित्येकदा पोकळ सबबी पुढे करून आड येतात. म्हणून पडीक जमिनीचे वाटप त्वरेने करता येत नाही. खाजगीरीत्या चालविण्यात येणाऱ्या वसतिगृहांना दर विद्यार्थ्यामागे अनुदान दिले जात असूनही स्वतःचा नफा वाढविण्याकरिता निकृष्ट प्रतीचे जेवण देण्यास चालक मागेपुढे पहात नाहीत यामुळे विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडते किंवा त्यांना खाण्यासाठीं इतरत्र खर्च करावा लागतो.

वरील थोडक्यात उल्लेखिलेल्या उणीवांव्यतिरिक्त इतर अनेक उणीवा योजनांच्यात व त्यांच्या अंमलबजावणीत असण्याची शक्यता आहे. तसेच मागास वर्गाच्या विकासाकरिता आवश्यक असणाऱ्या खर्चाची जबाबदारी भारत सरकार जसजशी राज्य सरकारांवर टाकत जाईल तसतसे 'उपलब्ध रकमेच्या अभावी' या योजनांना नाम-धारी स्वरूप येण्याचाही धोका आहे. या सर्व परिस्थितीची दखल घेऊन सर्व मागास वर्गीयांनी या व अधिक योजनांच्या मागण्यांसाठी संघटित प्रयत्न अत्यंत जागरुकतेने केले पाहिजेत.

● ● ●

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर